



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह


सोलापूर | रविवार, २ फेब्रुवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ८६ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त

सविस्तर वृत्त - पान २ आणि ३ वर...

**नवी दिल्ली :** भाजपाप्रणीत रालोआ सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला पूर्ण अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी शनिवारी लोकसभेत मांडला. अर्थसंकल्पात गरीब, मध्यमवर्ग, शेतकरी, युवा, महिला या वर्गांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. अर्थमंत्र्यांनी १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर आयकर भरावा लागणार नाही तसेच पगारदार वर्गाला १२.७५ लाख रुपयांच्या उत्पन्नावर कोणताही कर लागणार नाही, अशी घोषणा केली. सोबतच शेतकऱ्यांसाठी किसान क्रेडिट कार्ड कर्जमर्यादा ५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली. इलेक्ट्रॉनिक वस्तू, ३६ जीवनरक्षक औषधे, कर्करोगावरील औषध, मोबाईल, बॅटरी, एलईडी आणि इलेक्ट्रिक गाड्या स्वस्त केल्या आहेत.














सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पंतप्रधान धन-धान्य योजना जाहीर

## १.७ कोटी शेतकऱ्यांना होणार फायदा

◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी शनिवारी पंतप्रधान धन-धान्य कृषी योजनेची घोषणा केली. या योजनेचा लाभ कमी उत्पादकता आणि सरासरीपेक्षा कमी कर्जाचे निकष असलेल्या १०० जिल्ह्यांना होणार आहे. या योजनेचा फायदा देशातील १.७ कोटी शेतकऱ्यांना होणार आहे.

युवक, महिला आणि शेतकऱ्यांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण समृद्धी आणि लवचिकता कार्यक्रम सरकार सुरू करेल. नाफेड आणि एनसीसीएफ पुढील चार वर्षे डाळी खरेदी करतील. सरकारी डाळींमध्ये आत्मनिर्भरतेसाठी सहा वर्षांचा कार्यक्रम राबवला जाणार आहे. यात तूर, उडीद आणि मसूरवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल. भाजीपाला, फळांची उत्पादकता वाढवण्यासाठी आणि किफायतशीर भाव देण्यासाठी एक व्यापक कार्यक्रम सुरू केला जाईल, असे सीतारामन् म्हणाल्या. (वृत्तसंस्था)



## कापूस उत्पादनाला चालना देणार

उच्च उत्पादकता देणाऱ्या बियाणांसाठी राष्ट्रीय मिशन सुरू केले जाणार असल्याची माहिती सीतारामन् यांनी दिली. बिहारमध्ये कमळाच्या बियाणांचे उत्पादन आणि प्रक्रिया सुधारण्यासाठी मखाना बोर्ड स्थापन केला जाणार आहे. विशेष आर्थिक क्षेत्रे आणि खोल समुद्रांमध्ये मत्स्यपालन क्षेत्राच्या शाश्वत उत्पादकतेसाठी सरकार सक्षम चौकट आणेल. कापूस उत्पादनाला चालना देण्यासाठी पाच वर्षांच्या मोहिमेची घोषणा सीतारामन् यांनी केली.



केंद्रीय अर्थसंकल्प लोकसभेत सादर करण्यापूर्वी त्याच्या प्रती अतिशय कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत संसदेत आणण्यात आल्या



## ठळक वैशिष्ट्ये

- वार्षिक **१२ लाख** रुपयांपर्यंतचे उत्पन्न **करमुक्त**
- आयटीआर, टीडीएसच्या मर्यादेत वाढ. टीडीएसची मर्यादा **१० लाखांपर्यंत** वाढवली.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी व्याजावरील टॅक्स डिडक्शनची मर्यादा ५० हजारावरून **१ लाख रुपये** करणार.
- नव्या आयकर विधेयकाची घोषणा
- संरक्षण क्षेत्रासाठी **६.८१ लाख कोटींची** तरतूद
- कृषी क्षेत्रासाठी **पंतप्रधान धन धान्य योजना**
- कापूस उत्पादकतेसाठी **पाच वर्षांचा आराखडा**
- डिजिटल शिक्षणासाठी सरकारी माध्यमिक शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांना **ब्रॉडबॅण्ड सुविधा**
- **एमएसएमईसाठी** कर्ज हमी कव्हर ५ कोटींवरून **१० कोटी**
- ईव्ही बॅटरी उत्पादनासाठी ३५ अतिरिक्त भांडवली वस्तू आणि मोबाईल फोन बॅटरी उत्पादनासाठी २८ वस्तूंना मूलभूत **सीमाशुल्कातून सूट**
- विमा क्षेत्रात **एफडीआय मर्यादा** ७४ टक्क्यांवरून **१०० टक्क्यापर्यंत** वाढवली
- सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी **क्रेडिट गॅरंटी** ५ कोटींवरून **१० कोटी**
- चर्मोद्योग क्षेत्रात **२२ लाख रोजगारांची निर्मिती**
- उडान योजनेद्वारे पुढील १० वर्षांत **१२० नवीन शहरे** जोडण्याची योजना
- देशातील **५२ पर्यटनस्थळांचा विकास** करणार
- देशातील आयआयटी संस्थांमध्ये **६५०० जागा** वाढविणार
- देशात तीन एआय सेंटर्स सुरू होणार. शिक्षणासाठी **५०० कोटी** रुपयांची तरतूद
- येत्या ५ वर्षांत वैद्यकीय महाविद्यालयात **७५ हजार जागांची भर** पडणार
- ३६ जीवरक्षक **औषधे स्वस्त होणार**
- १०० जिल्ह्यांमध्ये **धनधान्य योजना.** कमी उत्पादन असलेल्या १०० जिल्ह्यांचा समावेश
- 'हील इन इंडिया' योजनेतून **वैद्यकीय पर्यटनाला चालना**
- २०२५-२६ मध्ये **२०० डे-केअर कॅन्सर केंद्रे**
- **५ लाख महिला** आणि एससी/एसटी उद्योजकांसाठी नवीन **अर्थसहाय्य योजना**

# आकाशाला गवसणी घालण्यासाठी १३ हजार कोटींची तरतूद



◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

२०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात भारताच्या अवकाश क्षेत्रासाठी एक दूरगामी विचारसरणीचा दृष्टिकोन मांडण्यात आला आहे, ज्यात अंतराळ संशोधन, उपग्रह तंत्रज्ञान आणि भू-स्थानिक क्षमतांना बळकटी देण्याच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण आर्थिक वचनबद्धता आहे. या आर्थिक वर्षासाठी अवकाश विभागाला १३,४१६.२० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत, जे मागील अर्थसंकल्पांपेक्षा लक्षणीय वाढ आहे आणि भारताच्या अवकाश महत्त्वाकांक्षा वाढवण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेला बळकटी देते.

**मुख्य अर्थसंकल्पीय वाटप**

चालू अर्थसंकल्पात भांडवली खर्चासाठी ६,१०३.६३ कोटी रुपये राखून ठेवण्यात आले आहेत, तर महसूल खर्चासाठी ७,३१२.५७ कोटी रुपये वाटप करण्यात आले आहेत. हे अवकाश क्षेत्राच्या पायाभूत सुविधा आणि ऑपरेशनल गरजा दोन्ही पूर्ण करण्यासाठी केंद्रित प्रयत्न दर्शवते. २०२४ मध्ये अंतरिम अर्थसंकल्पात वाटप केलेल्या १३,०४२.७५ कोटी रुपयांच्या तुलनेत २०२५-२६ च्या वाटपात आर्थिक वर्ष २३ मध्ये मंजूर केलेल्या १३,७०० कोटी रुपयांपेक्षा किंचित कमी असूनही स्थिर वाढ दिसून येते.

भारताच्या अवकाश तंत्रज्ञानातील प्रभावी कामगिरी, जसे की यशस्वी चांद्रयान-३ आणि आदित्य-एल१ सौर प्रकल्प यामुळे देशाच्या वाढत्या अवकाश क्षमता अधोरेखित होतात, त्यानंतर निधीमध्ये ही वाढ झाली आहे. (वृत्तसंस्था)

# संरक्षणासाठी ६.८१ लाख कोटी

## मागील वर्षीच्या तुलनेत नऊ टक्क्यांनी वाढ



◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

देशाची लष्करी क्षमता वाढवण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात या क्षेत्राला चालना देण्याची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी केली. संरक्षणासाठी अर्थसंकल्पात २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सीतारामन् यांनी ६,८१,२१० कोटी रुपयांची तरतूद केली. मागील वर्षाच्या तुलनेत हे प्रमाण साडेनऊ टक्क्यांनी जास्त आहे. मागील वर्षी संरक्षणासाठी ६,२१,९४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

संरक्षण क्षेत्रासाठीची तरतूद भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या अंदाजे १.९१ टक्के आहे. यापैकी नवीन शस्त्रे, विमाने, युद्धनौका आणि इतर लष्करी उपकरणांची खरेदी करण्यासाठी भांडवली अर्थसंकल्पाअंतर्गत १.८ लाख कोटी रुपये वाटप करण्यात आले आहेत.

**मागील वर्षाच्या तुलनेत काय?**

२०२४ मध्ये संरक्षणासाठी ६.५१ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. २०२३-२४ मध्ये वाटप केलेल्या ५.९४ लाख कोटी रुपयांपेक्षा ती ४.७९ टक्क्यांनी जास्त आहे. यंदाच्या आर्थिक वर्षात संरक्षणासाठीच्या तरतुदीत ६० हजार कोटी रुपयांची वाढ करण्यात आली. ही वाढ सैन्याचे आधुनिकीकरण आणि धोरणात्मक तयारीच्या दिशेने उचललेले एक मजबूत पाऊल असल्याचे दर्शवत आहे. (वृत्तसंस्था)

### संरक्षण खर्चाचे विवरण

- भांडवली अर्थसंकल्प : सशस्त्र दलांच्या आधुनिकीकरणासाठी **१.८० लाख कोटी**
- स्वदेशी खरेदी : देशांतर्गथ संरक्षण उद्योग खरेदीसाठी **१.१२ लाख कोटी**
- पेन्शन : सेवानिवृत्तांच्या निवृत्तीवेतनात **१४ टक्के वाढ**
- माजी सैनिक योगदान आरोग्य योजना : **८,३१७ कोटी**
- संरक्षण संशोधन आणि विकास : तरतूद **१२ टक्क्यांची वाढ**
- तटरक्षक दल भांडवली अर्थसंकल्प : तरतूद **४३ टक्क्यांची वाढ**
- सीमा रस्ते संघटना : **७,१४६ कोटी** रुपयांची तरतूद


# महिला व बाल विकास मंत्रालयाला २६,८८९ कोटींची वाढीव तरतूद

यंदाच्या अर्थसंकल्पात महिला आणि बाल विकास मंत्रालयाला २६,८८९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, जी २०२४-२५ मध्ये २३,१८२.९८ कोटी रुपयांच्या सुधारित अंदाजापेक्षा जास्त आहे.

संपूर्ण खर्चापैकी सर्वांत मोठी तरतूद सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० साठी आहे, ज्यात कुपोषणाचा सामना करण्यासाठी आणि बालपणीच्या संगोपनाला बळकटी देण्यासाठी २१,९६० कोटी रुपये मिळाले आहेत. २०२४-२५ च्या सुधारित अंदाजात २०,०७०.९० कोटी रुपयांची तरतूद या उपक्रमांना करण्यात आली होती.

किशोरवयीन मुलींसाठी योजना समाविष्ट असलेल्या या उपक्रमाची पुनर्रचना तीन प्राथमिक क्षेत्रांत करण्यात आली आहे; यात मुले आणि किशोरवयीन मुलींसाठी पोषण समर्थन, बालपणीच्या काळजी आणि शिक्षण आणि अंगणवाडी पायाभूत सुविधांचा समावेश आहे.

सलग आठवा अर्थसंकल्प सादर करताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् म्हणाल्या की, सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० कार्यक्रम विविध जिल्ह्यांतील आणि ईशान्य भागातील ८ कोटींहून अधिक मुले, एक कोटी गर्भवती आणि स्तनपान देणाऱ्या महिला आणि २० लाख किशोरवयीन मुलींना पोषण सहाय्य प्रदान करतात.




**मिशन वात्सल्यचे बजेट वाढले**

बाल संरक्षण सेवांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या मिशन वात्सल्यचे बजेट गेल्या वर्षीच्या १,३९१ कोटी रुपयांवरून १,५०० कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. असुरक्षित मुलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. हे संस्थात्मक आणि कुटुंब-आधारित काळजी चाईल्डलाईन आणि चाईल्ड ट्रॅकिंग सिस्टम सारख्या प्रायोजकत्व, पालक काळजी, दत्तक आणि आपत्कालीन सेवांद्वारे प्रदान करते.

**मिशन शक्तीला ३१५० कोटी**

महिला सक्षमीकरणासाठी मिशन शक्तीला ३,१५० कोटी रुपये वाटप करण्यात आले आहे, ज्यात सबल आणि समर्थ असे दोन प्रमुख घटक आहेत. बेटी बचाओ बेटी पढाओ, वन स्टॉप सेंटर्स, नारी अदालत, महिला हेल्पलाईन आणि महिला पोलिस स्वयंसेवक यासारख्या उपक्रमांचा समावेश असलेल्या सबल योजनेला ६२९ कोटी रुपये वाटप करण्यात आले. संकटात सापडलेल्या महिलांसाठी स्वधार गृह, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, कामगार महिला वसतिगृहे, राष्ट्रीय पाळणाघर योजना यासारख्या कार्यक्रमांचा समावेश असलेल्या समर्थला २,५२१ कोटी रुपये वाटप करण्यात आले आहे.

# देशभरात तयार होणार ५० नवी पर्यटन स्थळे

सीतारामन् यांनी शिक्षण, आरोग्य, कर, पर्यावरण, विज्ञान-तंत्रज्ञान, पर्यटन यासारख्या अनेक क्षेत्रात महत्त्वाच्या घोषणा करताना, पर्यटन क्षेत्रासाठी खास घोषणा केल्या आहेत. याअंतर्गत ५० नवीन पर्यटन स्थळ विकसित केली जातील. प्रादेशिक हवाई कनेक्टिव्हिटी अंतर्गत १२० नवीन विमानतळ जोडले जातील. होम स्टेसाठी मुद्रा कर्ज, भारतात हिल इन इंडिया अंतर्गत व्हिसा नियम, भारतात उपचार घेण्यासाठी सोप्या पद्धतीने व्हिसा देणार आदींचा समावेश आहे.

**होम स्टेसाठी मुद्रा कर्ज**

प्रवासाचा अनुभव अधिक सुलभ करण्यासाठी आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी अर्थमंत्र्यांनी होम स्टेसाठी मुद्रा कर्जामध्ये वाढ करण्याची घोषणा केली. तरुणांसाठी हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील करिअरला चालना दिली जाईल. सीतारामन् यांनी सांगितले की, होमस्टेसाठी मुद्रा कर्जाव्यतिरिक्त, हॉटेल्सचाही समरसता योजनेत समावेश केला जाईल.

**भारतातील व्हिसा नियम सुलभ**

खाजगी क्षेत्रासोबत भागीदारी करून वैद्यकीय पर्यटन आणि 'हील इन इंडिया'ला प्रोत्साहन दिले जाईल. यासाठी काही परदेशी पर्यटकांना व्हिसा सूट देण्यात येणार आहे.



### पर्यटन स्थळांना संधी

पर्यटनाला चालना देताना मोदी सरकारने २०२५-२६ वर्षाच्या अर्थसंकल्पात ५० नवीन पर्यटन स्थळे तयार करण्याची घोषणा केली. ही पर्यटन स्थळे राज्यांच्या सहकार्याने विकसित केली जाणार आहेत.

# महिला उद्योजकांना आर्थिक बळ



## उद्योग सुरू करणाऱ्या महिलांना २ कोटींपर्यंत कर्ज

## ५ लाख महिलांना होणार फायदा

◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी शनिवारी सलग आठव्यांदा अर्थसंकल्प सादर करीत लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योगांसाठी अनेक घोषणा केल्या. यात महिला उद्योजकांना आर्थिक पाठबळ देण्यात येणार आहे. उद्योग सुरू करणाऱ्या महिलांना २ कोटीपर्यंतचे कर्ज कोणत्याही हमीशिवाय सुलभ अटींवर दिले जाणार आहे. यासाठी १० हजार कोटींची तरतूद करण्यात येणार आहे.

महिलांसह अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या लोकांना छोटे आणि मध्यम उद्योग सुरू करण्यासाठी पाच वर्षांच्या कालावधीसाठी २ कोटी रुपयांपर्यंतच्या मुदत कर्जाची सुविधा मिळणार आहे. देशातील ५ लाख महिलांना याचा फायदा होणार आहे. महिलांना त्यांच्या उद्योगांचा विस्तार करण्यासाठी डिजिटल प्रशिक्षण, विपणन समर्थन आणि सरकारी योजनांशी जोडण्याची सुविधा देखील दिली जाईल. ज्या महिला पहिल्यांदाच उद्योजक बनणार आहे, त्यांना सक्षम बनवण्याच्या उद्देशाने ही योजना आणण्यात आली, असे अर्थमंत्र्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### स्वावलंबी बनवण्याचे मोदी सरकारचे उद्दिष्ट

या योजनेंतर्गत महिलांना कोणत्याही हमीशिवाय सुलभ अटींवर कर्ज उपलब्ध करून दिले जाईल, जेणेकरून त्या स्वतःचे छोटे आणि मध्यम उद्योग सुरू करू शकतील. देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावण्यासाठी या योजनेंतर्गत महिलांना सक्षम बनविले जाणार आहे. कर्जाचा लाभ मिळालेल्या महिला उद्योजकांनी प्रशिक्षण दिले जाणार आहे.


# युवाशक्तीला काय मिळाले...




अर्थमंत्र्यांनी नव उद्यमींना प्रोत्साहन देण्यासाठी १० हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत. सोबतच स्टार्टअपसाठी 'फंड ऑफ फंड्स' योजनेच्या आणखी एका टप्प्याची घोषणा करण्यात आली. उद्योग आणि अंतर्गत व्यापार संवर्धन विभागाने आतापर्यंत १.५ लाखाहून अधिक स्टार्टअपला मान्यता दिली आहे. सरकार एक कोटी 'गिग' श्रमिकांच्या मदतीसाठी ई-श्रम मंचावर ओळखपत्र आणि नोंदणीची व्यवस्था करेल. ई-कॉमर्स कंपन्यांसाठी डिलिव्हरी सेवा प्रदान करणारे कर्मचारी 'गिग' या श्रेणीत येतात. म्हणजेच स्विगी, झोमॅटो असो किंवा कोणत्याही सामानाची डिलिव्हरी करणारे बॉय असो, त्यांना ई-श्रम ओळखपत्र प्रदान केले जाणार आहे. या श्रमिकांना पंतप्रधान जन आरोग्य योजनेंतर्गत स्वास्थ्य सुविधा प्रदान केल्या जातील आणि याचा फायदा जवळपास एक कोटी श्रमिकांना होणार आहे.







# अर्थमंत्र्यांची खास मधुबनी पेंटिंगची साडी

## पद्मश्री दुलारीदेवींनी दिली होती भेट

अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी आठव्यांदा देशाचा अर्थसंकल्प सादर केला. यावेळी सीतारामन् यांनी क्रीम रंगाची मधुबनी साडी नेसली होमी. त्याला सोनेरी काठ आहेत. बिहारमध्ये राहणाऱ्या पद्मश्री विजेत्या दुलारी देवी यांनी त्यांना ही साडी भेट दिली होती. वास्तविक, दोन महिन्यांपूर्वी अर्थमंत्री क्रेडिट आऊटरीच कार्यक्रमासाठी मधुबनी येथे आल्या होत्या. त्यानंतर दुलारी देवी यांनी त्यांना ही साडी भेट दिली.

दुलारी देवी बिहारच्या मधुबनी जिल्ह्यातील रांटी या छोट्याशा गावात राहतात. दुलारी देवी यांना २०२१ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांना मधुबनी चित्रकलेतील योगदानाबद्दल केंद्र सरकारने हा सन्मान दिला होता.

आपण ही साडी बजेटच्या दिवशी घालणार असल्याचे सीतारामन् यांनी सांगितले होते. त्यानुसार अर्थमंत्र्यांनी तीच साडी नेसली. बिहारमध्ये यावर्षी विधानसभा निवडणूक होणार आहे. अशा स्थितीत बिहारमधील प्रसिद्ध मधुबनी पेंटिंग असलेली साडी त्याच्याशी जोडली जात आहे.

### अर्थमंत्र्यांची साडी चर्चेत

अर्थमंत्री सीतारामन् या त्यांच्या साड्यांमुळे चर्चेत असतात. विशेषतः अर्थसंकल्प सादर करताना त्या जी साडी घालतात, त्याचे काहीतरी वैशिष्ट्य असते. बजेट सादर करताना त्यांनी लाल, निळ्या, पिवळ्या, तपकिरी आणि ऑफ-व्हाईट रंगाच्या साड्या परिधान केल्या आहेत. या साड्या भारतीय संस्कृती आणि वारसा दर्शवतात.

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | रविवार, २ फेब्रुवारी २०२५

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त

## अर्थसंकल्पातून नोकरदारांना मोठा दिलासा | इलेक्ट्रॉनिक वस्तू, ३६ जीवनरक्षक औषधे, मोबाईल, एलईडी स्वस्त | संरक्षण, महामार्ग, कृषी, शिक्षण, आरोग्य क्षेत्रासाठी मोठी तरतूद



**◆ नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

**भाजपाप्रणीत रालोआ सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला पूर्ण अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी शनिवारी लोकसभेत मांडला. अर्थसंकल्पात गरीब, मध्यमवर्ग, शेतकरी, युवा, महिला या वर्गांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. अर्थमंत्र्यांनी १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर आयकर भरावा लागणार नाही तसेच पगारदार वर्गाला १२.७५ लाख रुपयांच्या उत्पन्नावर कोणताही कर लागणार नाही, अशी घोषणा केली. सोबतच शेतकऱ्यांसाठी किसान क्रेडिट कार्ड कर्जमर्यादा ५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली. याशिवाय, इलेक्ट्रॉनिक वस्तू, ३६ जीवनरक्षक औषधे, कर्करोगावरील औषध, मोबाईल फोन, बॅटरी, एलईडी आणि इलेक्ट्रिक गाड्या स्वस्त करून सीतारामन् यांनी सर्वसामान्यांनाही मोठा दिलासा दिला आहे.**

मला हे जाहीर करताना आनंद होत आहे की, तुम्हाला आता १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर आयकर भरावा लागणार नाही, असे सीतारामन् यांनी सांगितले. या निर्णयामुळे मंदावलेली वाढ आणि महागाई या आव्हानांना तोंड देणाऱ्या मध्यमवर्गाला दिलासा मिळाला आहे. सध्या वार्षिक ७ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या पगारदारांना कोणतेही दायित्व नाही, ज्यावर ७५ हजार रुपयांची मानक वजावट म्हणजे स्टॅण्डर्ड डिडक्शन लागू आहे.

अर्थमंत्री सीतारामन् यांनी आपल्या भाषणात अधोरेखित केले की, कृषी, एमएसएमई, गुंतवणूक आणि निर्यात हे विकसित भारत २०४७च्या प्रवासातील इंजिन आहेत. हा अर्थसंकल्प प्रामुख्याने विकासाला गती देणे, सर्वांगीण विकास साध्य करणे, खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणे, देशांतर्गत संवेदनशीलता बळकट करणे आणि मध्यमवर्गाची खर्च क्षमता वाढवणे या पाच महत्त्वाच्या मुद्द्यांना केंद्रित करून तयार करण्यात आला आहे.

वार्षिक उत्पन्न कर सवलत मर्यादा १२ लाख रुपयांपर्यंत वाढविण्याची घोषणा करदात्यांना मोठा दिलासा देणारी आहे. टीडीएसची मर्यादा कमी करण्याची आणि कर परतावा भरण्याची वेळमर्यादा २ वर्षांवरून ४ वर्षे करण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांसाठी टीडीएस सवलतीची मर्यादा ५० हजार रुपयांवरून १ लाख रुपये करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् शनिवारी लोकसभेत अर्थसंकल्प सादर करीत असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राजनाथसिंह, अमित शाह आणि नितीन गडकरी त्यांचे भाषण काळजीपूर्वक ऐकत होते

### धन-धान्य कृषी योजना

अर्थमंत्र्यांनी शेतकऱ्यांसाठी पंतप्रधान धन-धान्य योजनेची घोषणा केली. त्या म्हणाल्या की, पंतप्रधान धन-धान्य कृषी योजनेंतर्गत कृषी उत्पादकता असलेले १०० जिल्हे निवडले जातील. त्या जिल्ह्यांमध्ये उत्पादकता वाढण्यास, शेतीत विविधता आणण्यास, सिंचन आणि कापणीनंतरची साठवण क्षमता मजबूत करण्यास मदत केली जाईल. या योजनेचा लाभ १.७ कोटी शेतकऱ्यांना होईल. सोबतच किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ५ लाख रुपये करण्यात आली आहे. यामुळे शेतकरी ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज घेऊ शकतील. याअगोदर ही मर्यादा ३ लाख रुपये होती.

### ईव्ही बॅटरी उत्पादनाला चालना

देशांतर्गत बॅटरी उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) बॅटरी उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या प्रमुख भांडवली वस्तूंवर शून्य मूलभूत सीमाशुल्क जाहीर केले. सीतारामन् यांनी ईव्ही बॅटरी उत्पादनासाठी ३५ भांडवली वस्तू आणि मोबाईल फोन बॅटरी उत्पादनासाठी २८ अतिरिक्त भांडवली वस्तूंना मान्यता दिली.

### आरोग्य, औषध क्षेत्राला पाठिंबा

अर्थसंकल्पात आरोग्यसेवा क्षेत्राला मोठा दिलासा देण्यात आला आहे, ज्यात ६ कॅन्सर औषधांचा पूर्णपणे शुल्कमुक्त औषधांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. या निर्णयाचा उद्देश आवश्यक औषधे अधिक परवडणारी आणि सुलभ बनवणे आहे. ◂(वृत्तसंस्था)

## अर्थसंकल्पाचा शेअर बाजारावर परिणाम नाही

**मुंबई :** मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला पूर्ण अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी शनिवारी लोकसभेत मांडला. आज सादर झालेल्या अर्थसंकल्पादरम्यान



बाजारात चढ-उतार दिसून आला. त्यानंतर सेन्सेक्स-निफ्टी सपाट पातळीवर बंद झाले. सेन्सेक्स पाच अंकांच्या किरकोळ वाढीसह ७७,५०५ वर बंद झाला, तर निफ्टी २६ अंकांच्या घसरणीसह २३,४८२ वर स्थिरावला. दुपारच्या व्यवहारात सेन्सेक्स आणि निफ्टी घसरले. पण, दुपारी दोनच्या सुमारास ते सपाट पातळीवर आले. सीतारामन् संसदेत अर्थसंकल्प मांडत असताना सेन्सेक्समध्ये ३०० अंकांची वाढ दिसून आली. निफ्टी ८८ अंकांनी वाढून व्यवहार करीत होता. ■

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या किंवा** ९८२३०४८०६६ व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधा.

सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# रेल्वेसाठी २.५५ लाख कोटींची तरतूद

### कोणतीही मोठी घोषणा नाही

**◆ नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

भारतीय रेल्वे ही देशाची जीवनरेखा आहे. अर्थसंकल्पात रेल्वेसाठी मोठ्या घोषणा अपेक्षित होत्या; मात्र यावेळी सरकारने रेल्वे अर्थसंकल्पात कोणत्याही मोठ्या घोषणा केल्या नाहीत. केंद्रीय अर्थसंकल्पात रेल्वे मंत्रालयासाठी २.५५ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी ३,४४५ कोटी रुपये महसुलावर आणि २,५२,००० कोटी रुपये भांडवली खर्चावर खर्च केले जातील. अशाप्रकारे रेल्वे अर्थसंकल्पात एकूण २,५५,४४५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

रेल्वे अर्थसंकल्पात पेन्शन फंडात ६६ हजार कोटी रुपये ठेवण्यात आले आहेत. नवीन रेल्वेलाईन टाकण्यासाठी ३२,२३५ कोटी रुपये खर्च केले जातील. या मार्गांच्या दुपदरीकरणासाठी ३२ हजार कोटी रुपये आणि त्यांचे गेज लाईन्समध्ये रूपांतरित करण्यासाठी ४,५५० कोटी रुपयांचे बजेट



निश्चित करण्यात आले आहे.

रेल्वे सिग्नलिंग आणि टेलिकॉमसाठी ६,८०० कोटी रुपये, पॉवर लाईन्ससाठी ६,१५० कोटी, कर्मचारी कल्याणासाठी ८३३ कोटी रुपये देण्यात आले आहेत. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी ३०१ कोटी रुपये खर्च केले जातील. ४५ हजार कोटी रुपये रेल्वे सुरक्षा निधीत हस्तांतरित जातील.

रेल्वे अपघात कमी करण्यासाठी रेल्वे मंत्रालय विशेष पावले उचलणार आहे. याअंतर्गत देशातील प्रमुख रेल्वे मार्गांवर कवच असलेले अद्यायावत मॉडेल बसवण्याचे काम जलदगतीने केले जाईल.

**रेल्वेला कुठून किती पैसे मिळणार?**

रेल्वे अर्थसंकल्पाच्या अंदाजानुसार, १ लाख ८८ हजार रुपयांची कमाई मालवाहतुकीतून होईल.

ही आकडेवारी मागील वर्षीच्या तुलनेत आठ हजार कोटी रुपये अधिक असेल, तर प्रवासी तिकिटांतून ९२,८०० कोटींची कमाई होईल. हे मागील वर्षीच्या तुलनेत १२,८०० कोटी अधिक असेल.

**भांडवली खर्चात वाढ नाही**

रेल्वेशी संबंधित एका सूत्रांनुसार, येत्या अर्थसंकल्पात रेल्वेच्या भांडवली खर्चासाठी (कॅपेक्स) २० टक्क्यांनी वाढ अपेक्षित होती. रेल्वेच्या अंदाजानुसार मागील अर्थसंकल्पात या योजनेत मिळालेल्या २.६५ लाख कोटी रुपयांपैकी रेल्वेने ८० टक्के निधी खर्च केला आहे. ◂(वृत्तसंस्था)

## वित्तीय तूट ४.८ टक्के

**नवी दिल्ली :** आर्थिक वर्ष २०२५ साठी वित्तीय तूट जीडीपीच्या ४.८ टक्के आणि आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ४.४ टक्के राहण्याचा अंदाज आहे, असे निर्मला सीतारामन् यांनी शनिवारी सांगितले. पुढील आर्थिक वर्षासाठी बाजारातील कर्ज ११.५४ लाख कोटी रुपये असण्याचा अंदाज आहे, असे सीतारामन् यांनी संसदेत अर्थसंकल्प सादर करताना सांगितले. सर्व गैर-वित्तीय क्षेत्रांवरील नियामक सुधारणांसाठी सरकार एक उच्चस्तरीय समिती स्थापना करेल. नॅबफिड (नॅशनल बँक फॉर फायनान्सिंग इन्फ्रास्ट्रक्चर अॅण्ड डेव्हलपमेंट) कॉर्पोरेट बॉण्डसाठी आंशिक कर्ज वृद्धी सुविधा स्थापन केली जाईल. गुंतवणुकीसाठी राज्यांत असलेले अनुकूल वातावरण जाणून घेण्यासाठी गुंतवणूक मैत्री निर्देशांक यावर्षी सुरू केला जाईल. ■





### किती वेतनावर किती कर?

| | |
|---|---|
| ४ लाखांपर्यंत | ० टक्के |
| ४-८ लाख | ५ टक्के |
| ८-१२ लाख | १० टक्के |
| १२-१६ लाख | १५ टक्के |
| १६-२० लाख | २० टक्के |
| २०-२४ लाख | २५ टक्के |
| २४ लाखांच्या वर | ३० टक्के |

नवीन कर प्रणालीअंतर्गत १२ लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नासाठी ( ७५ हजार रुपयांच्या मानक वजावटीसह पगारदार करदात्यांसाठी १२.७५ लाख रुपये) शून्य कर स्लॅब लागू होईल. ■

### काय झाले स्वस्त



**१) दागिने २) इलेक्ट्रॉनिक वाहने ३) कॅन्सरचा उपचार, वैद्यकीय उपकरण ४) एलईडी आणि एलसीडी टीव्ही ५) चामडी वस्तू ६) लहान मुलांची खेळणी ७) भारतात तयार केलेले रेडिमेड कपडे ८) विमा ९) मोबाईल १०) ३६ जीवनरक्षक औषधे**

### काय झाले महाग

**१) आयातीत कपडे २) घर खरेदी**

# त्या आल्या, त्यांनी पाहिले आणि जिंकले!

**श्यामकांत जहागीरदार**

**◆ नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी शनिवारी संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पातून १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न आयकरातून मुक्त करण्याची घोषणा करीत देशातील मध्यमवर्गाला नवीन वर्षाची अनमोल भेट दिली, असे मानले जात आहे. त्या (संसदेत) आल्या, त्यांनी (खासदारांना) पाहिले आणि (मध्यमवर्गाला) जिंकले, असे सीतारामन् यांच्या या अर्थसंकल्पाचे वर्णन करावे लागेल.

सीतारामन् यांनी एकाच पंतप्रधानांच्या नेतृत्वात सलग आठवा अर्थसंकल्प सादर करीत महिला अर्थमंत्री म्हणून इतिहास घडवला. त्यांच्या अर्थसंकल्पावर चार दिवसांनी होत असलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीचा तसेच या वर्षअखेर होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीचा प्रभाव जाणवला.

सीतारामन् यांनी अर्थसंकल्पातून बिहारवर घोषणांचा वर्षाव केला. मोदी सरकारला बिहारमधील जनता दल संयुक्तचा पाठिंबा आहे, हेही यामागचे एक कारण असू शकते. त्यामुळे सीतारामन् बिहारबाबत घोषणा करीत असताना विरोधी पक्ष टोले मारत होते.

अर्थमंत्री सीतारामन यांनी काही दिवसांपूर्वी बिहार जिल्ह्यातील मधुबनी दौऱ्यात मिथिला आर्ट इन्स्टिट्यूटला भेट दिली हाती. त्यावेळी प्रसिद्ध पेंटिंग कलाकार पद्मश्री दुलारीदेवी यांनी त्यांना मधुबनी शैलीतील चित्र असलेली रेशमी साडी भेट दिली होती. तुम्ही अर्थसंकल्प सादर कराल, त्या दिवशी ही साडी घाला, अशी विनंती दुलारीदेवी यांनी केली होती. त्यांची विनंती मान्य करीत अर्थसंकल्प सादर करण्यासाठी सीतारामन् आज संसदेत ही साडी परिधान करून आल्या होत्या. सीतारामन् यांनी १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्याची घोषणा करताच सत्ताधारी भाजपा आणि रालोआतील मित्रपक्षांच्या सदस्यांनी मेज थपथपवून जोरदार स्वागत केले. यावेळी सर्वाधिक काळ मेज थपथपवले गेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही मेज थपथपवण्यापासून राहवले नाही. ■

### निर्मला सीतारामन् यांनी आठव्यांदा अर्थसंकल्प सादर करीत घडवला इतिहास

**आधीच मिळाले होते संकेत**

सीतारामन् यावेळच्या आपल्या अर्थसंकल्पातून आयकराबाबत मोठी घोषणा करतील, याचे संकेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणातून तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी शुक्रवारी संसदेत आल्यावर पत्रकारांशी बोलताना दिले होते. संसदेत येण्याआधी मी लक्ष्मीमातेचे दर्शन घेतले होते. देशातील गरीब आणि मध्यमवर्गावर लक्ष्मीमातेचा आशीर्वाद राहो, अशी विनंती मी केली होती, असे मोदी म्हणाले होते. अप्रत्यक्षपणे मोदी यांनी अर्थसंकल्पातून मध्यमवर्गाला मोठा दिलासा मिळेल, त्यांचा आर्थिक फायदा होईल, असे संकेत दिले होते. त्याची प्रचिती आज सीतारामन् यांच्या अर्थसंकल्पातून आली. ■

# ‘आप’ सोडलेल्या आठ आमदारांचा भाजपात प्रवेश

**◆ नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

आम आदमी पक्ष (आप) सोडून गेलेल्या आठ आमदारांनी शनिवारी भाजपामध्ये प्रवेश केला. एक दिवस आधी, या आमदारांनी निवडणुकीत तिकिटे न मिळणे आणि भ्रष्टाचार या कारणावरून राजीनामा दिल्याचे त्यांनी सांगितले होते.

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. या नेत्यांच्या भाजपामध्ये प्रवेश करण्याने आपची डोकेदुखी वाढली आहे. आपचे आमदार ऋतुराज झा यांनी भाजपावर या आमदारांना आमिष दाखवल्याचा आरोप केला होता. त्यांनी सांगितले होते की मलाही पक्ष सोडण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. पण मी शेवटच्या श्वासापर्यंत पक्षातच राहीन.

‘आप’ने २१ नोव्हेंबर ते २० डिसेंबर दरम्यान, म्हणजेच ३० दिवसांत एकूण पाच यादींमध्ये ७० उमेदवारांची नावे जाहीर केली होती. यामध्ये २६ आमदारांचे तिकीट कापण्यात आले तर चार आमदारांचे मतदारसंघ बदलण्यात आले. दिल्लीत ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. मतमोजणी ८ फेब्रुवारीला होणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

### लक्ष्मीची पावले सर्वसामान्यांच्या घरी घेऊन येणारा अर्थसंकल्पः उपमुख्यमंत्री शिंदे



अर्थसंकल्प हा लक्ष्मीची पावले सर्वसामान्यांच्या घरी घेऊन येणारा अर्थसंकल्प असल्याचे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. लक्ष्मी येती घरा तोचि दिवाळी दसरा अशी भावना आज प्रत्येक घराघरात निर्माण झाली असेल, कारण १२ लाखापर्यंतचे उत्पन्न आयकर मुक्त झाल्याने सर्वसामान्याना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे यंदाचा अर्थसंकल्पातून छप्पर फाड के मिळाल्याची भावना घरोघरी व्यक्त होत असावी असे मत शिंदे यांनी व्यक्त केले.

### ग्रामीण भारताचा चेहरामोहरा बदलणारा, नागरिककेंद्रीत अर्थसंकल्प : मुख्यमंत्री फडणवीस



देशातील मध्यमवर्गासाठी स्वप्नवत अर्थसंकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केला आणि १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करुन एक मोठा दिलासा मध्यमवर्गाला दिला. ग्रामीण भारताचा चेहरामोहरा बदलणारा आणि नागरिककेंद्रीत गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारा हा अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते म्हणाले,’ हा अर्थसंकल्प विकसित भारताच्या दिशेने नेणारा, सर्वसमावेशक आणि विकसित भारताचा ऐतिहासिक अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प अर्थव्यवस्थेला अधिक प्रगल्भ करणारा ठरेल. अर्थव्यवस्थेला आणखी सदृढ करणारा, मध्यमवर्गीय, पगारदार, युवा आणि शेतकरी, कष्टकरी या सगळ्यांना दिलासा देणारा आहे. या अर्थसंकल्पातील तरतुदींमुळे महाराष्ट्राच्या अनेक महत्वाकांक्षी धोरणांना बळ मिळेल. विशेषतः महाराष्ट्र हे स्टार्टअपचे कॅपिटल असल्याने नवीन धोरणांचा मोठा लाभ मिळेल,

प्राप्तीकराची मर्यादा वाढविल्याने तो पैसा अर्थव्यवस्थेत येईल आणि त्याम ुळे मागणी वाढेल. करपात्र उत्पन्नाची मर्यादा ७ वरून १२ लाख करणे हा निर्णय ऐतिहासिक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातच ही मर्यादा अडीच लाखांवरून सात लाख करण्यात आली होती. ती आता १२ लाख करण्यात आली. हा प्रवास निश्चितच भारतीय अर्थव्यवस्थेसाठी परिणामकारक आहे. यातून मध्यमवर्गीय, पगारदार, युवक यांना मोठा दिलासा मिळणार आहे. एका मोठ्या वर्गाच्या हाती उत्पन्नाचा मोठा वाटा राहणार आहे. ज्यामुळे बाजारपेठांत चैतन्य निर्माण होईल. खरेदी वाढेल, म ागणी वाढेल, उत्पादन वाढेल, रोजगार वाढतील.

### विकसित भारताची पायाभरणी :उपमुख्यमंत्री पवार



केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला मोठा विकासनिधी मिळाल्याने राज्यातील पायाभूत प्रकल्पांची मजबूत पायाभरणी, विकासाला चालना मिळणार आहे, बारा लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करुन मध्यमवर्गीय देशवासियांना मोठी भेट दिली आहे. असे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले.ते म्हणाले,’ अर्थसंकल्पातील नव्या कररचनेमुळे १२ लाख उत्पन्न असलेल्या करदात्यांना ८0 हजारांची सूट दिल्याने त्यांना शंभर टक्के करमाफी मिळणार आहे. १८ लाख उत्पन्नधारकांना ७0 हजारांचा फायदा होणार आहे.

## प्रासंगिक

मंगेश पाठक

# चौफेर विकासाचा संकल्प

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी काल, शनिवारी लोकसभेत सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे देशाच्या चौफेर विकासाचा संकल्प होय. केवळ औपचारिकता पार पाडण्यासाठी त्यांनी अर्थसंकल्प सादर केलेला नाही. गेली पाच वर्षे देशाने ज्या गतीने आर्थिक प्रगती साधली, त्या पृष्ठभूमीवर सादर केल्या जाणाऱ्या या अर्थसंकल्पाकडे सगळ्यांचेच डोळे लागले होते. आपल्याला काय मिळणार, कुठल्या सोईसुविधा उपलब्ध होणार, कररचनेत बदल होईल का, शेतकऱ्यांसाठी काय असेल, मध्यमवर्गीयांना दिसला मिळेल का, असे अनंत प्रश्न जनतेच्या मनात असताना काल सादर झालेला अर्थसंकल्प विकासाची व्यापक दिशा ठरवणारा, सर्व स्तरातील जनतेला, विशेषत: मध्यमवर्गीय करदात्यांना दिलासा देणारा आणि बेरोजगारांना आश्वस्त करणारा आहे, ही आनंदाची बाब म्हटली पाहिजे. कृषी क्षेत्रापासून तर वाहन उद्योगापर्यंत अर्थमंत्र्यांनी अनेक मोठ्या घोषणा करून केंद्रातल्या मोदी सरकारचा मानस स्पष्ट केला आहे. आगामी काळात देश कुठल्या दिशेने जाणार, हे सहज लक्षात यावे, एवढा सरळ आणि स्पष्ट असलेला अर्थसंकल्प यापूर्वी क्वचितच सादर झाला असेल. मध्यमवर्गीय माणसाच्या पदरी नेहमीच निराशा पडते. परंतु, यावेळी त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्यात आल्याचे दिसते आहे. यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन्, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सरकारचे अभिनंदन करावेच लागेल. नेहमीची जी कररचना आहे, त्यात कुठलाही बदल न करता ती आहे तशीच कायम ठेवण्याची घोषणा न करता सर्वसामान्यांना मिळालेला मोठा दिलासा समाधानकारकच आहे. करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढवून मिळेल, अशी अपेक्षा सर्वसामान्य लोकांना होती. ती बरोबरही होती. पण, सरकारकडून ती एकदम बारा लाखांपर्यंत वाढविली जाईल, अशी अपेक्षा कुणी केली नव्हती. फारतर आठ लाख आणि जास्तीत जास्त दहा लाखांपर्यंत मर्यादा वाढेल असा एक मतप्रवाह होता. सगळ्यांना अशी अपेक्षा नव्हती. पण, सरकारने जबरदस्त कृपा केली आणि अनपेक्षित सुखद धक्का दिल्याने जनमानस आनंदित झाले आहे. सरकारने अतिशय पारदर्शक अर्थसंकल्प तयार केला आणि तो संसदेत सादर केला, यासाठीही सरकारचे कौतुक करावेच लागेल.

अपेक्षेप्रमाणे बिहार आणि आंध्रप्रदेशसाठी विशेष घोषणा अर्थसंकल्पात आहेत. त्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीची तरतूदही अर्थसंकल्पात करण्यात आली आहे, ही आनंदाची बाब असताना विरोधकांनी मात्र टीकेची झोड उठवली आहे. वास्तविक, देशात कुठेही मोठी निवडणूक नाही. असे असतानाही कोट्यवधी आयकरदात्यांसाठी करमुक्त उत्पन्नाची मर्यादा बारा लाखांवर नेऊन सरकारने मध्यमवर्गीय करदात्यांची आपल्याला चिंता आहे, हे कृतीने दाखवून दिले आहे. सगळे काही निवडणुकांवर डोळा ठेवूनच करायचे असते तर सरकारने आता सवलती दिल्या नसत्या. पण, या देशातील १४० कोटी नागरिकांचे भले झाले पाहिजे, ही मोदी सरकारची प्रामाणिक भावना आहे आणि म्हणूनच सरकारने जनताभिमुख असा अर्थसंकल्प सादर केला.

देशातील सुमारे ४८ कोटी मध्यमवर्ग आहे. तो भारतीय जनता पक्षाचा पाठीराखा आहे. गेल्या तीन निवडणुकांमध्ये मध्यमवर्गाने मोदी यांच्या सरकारच्या पाठीशी आपली ताकद उभी केली होती; परंतु सरकारने हा वर्ग आपल्याला सोडून जात नाही, असे गृहीत धरून सामान्यजनांच्या अपेक्षा आतापर्यंत फारशा गांभीर्याने घेतल्या नव्हत्या. दहा वर्षांमध्ये मध्यमवर्गाचे उत्पन्न वाढत होते; परंतु वाढणारे उत्पन्न प्राप्तिकरात जात होते. त्यामुळे हा वर्ग काहीसा नाराज झाला होता. दिल्लीत हा वर्ग जास्त आहे. त्याचा विचार करून तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या महिन्यात मास्टरस्ट्रोक मारला होता. त्यांनी आठवा वेतन आयोग स्थापन करण्याची घोषणा केली. आता दिल्ली विधानसभेपाठोपाठ बिहार विधानसभेचीही निवडणूक आहे. सरकार आता कोणतीच जोखीम पत्करायला तयार नाही. त्यामुळे आपल्या पाठीराख्या मध्यमवर्गाला एकीकडे खूश करायचे आणि त्याला त्याच्या आवडीच्या गोष्टीत मोठ्या प्रमाणात खर्च करायला लावायचा, ही नीती अर्थसंकल्पात वापरण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात खर्च करणारा हाच घटक देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात हातभार लावत असतो. मग तो करभरणा असो वा बाजारातील खरेदी; इतर घटकांपेक्षा या घटकांच्या हातून होणारी उलाढाल मोठी असते. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबरच करातून वाचणारा पैसा बाजारात कसा येईल, याची तजवीज करण्यात आली. त्यासाठी इलेक्ट्रिक वाहने, मोबाईल, टीव्हीचे



सुटे भाग स्वस्त करताना मोठे टीव्ही मात्र महाग करून ठेवले. मोदी सरकार एकदाचे करदात्यांना पावले. पूर्वीच्या तीन लाख रुपयांच्या करमुक्त मर्यादेच्या तुलनेमध्ये आता चार लाखांचे उत्पन्न करमुक्त असेल. त्याव्यतिरिक्त गृहकर्ज, मेडिक्लेम, ठरावीक गुंतवणुकीवर १२ लाखांपर्यंतच्या कमाईवर नोकरदारांना छदामही भरावा लागणार नाही. पुढे जो काही कर द्यावा लागेल, तो सवलत, सुटीच्या माध्यमातून पुन्हा वसूल करता येईल.

गेल्या वर्षी देशात अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर करदात्यांनी नाराजी व्यक्त केली होती, कारण त्यांना महागाई, कर्जाचे हप्ते आणि कराच्या ओझ्याची चिंता होती. गेल्या वर्षी तीन लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त होते. यंदा वाढीव एक लाख रुपयांवर सूट मिळणार आहे. पूर्वी सात लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त होते. ते आता १२ लाख रुपयांपर्यंत झाले आहे. प्रमाणित वजावटी विचारात घेऊन ही सवलत असेल. तज्ज्ञांच्या मते वाचलेला हा पैसा पुन्हा बाजारात फिरेल, तो बँकेत गुंतवला जाईल अथवा नोकरदार वर्ग ही बचत बाजारात खर्च करेल. त्यामुळे सुस्तावलेल्या अर्थव्यवस्थेला गती मिळेल आणि विकसित भारतासाठी मोठा वृद्धिदर गाठणे सोपे होईल. केंद्र सरकारने आज तिसऱ्या कार्यकाळातील दुसरा पूर्ण अर्थसंकल्प मांडला. या अर्थसंकल्पातून सरकारने अनेक मोठ्या घोषणा केल्या. केंद्र सरकारने अर्थसंकल्पामधून गोरगरिबांना दिलासा देण्याचे काम केले आहे. तसेच शेतकरी, महिला आणि नोकरदारांसाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. एवढेच नव्हे तर, रुग्णांसाठीही केंद्र सरकारने आपले हात मोकळे केले आहेत. केंद्र सरकारने एक दोन नव्हे तर, गंभीर आजारावरील ३६ औषधे करमुक्त केली आहेत. त्यामुळे ही औषधे स्वस्तात मिळणार आहेत. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये कॅन्सर डे केअर सेंटर बनवण्याचा निर्णयही केंद्र सरकारने घेतला आहे. कॅन्सरवरील उपचारासाठीची औषधे आता स्वस्त होणार आहेत. सहा जीवनरक्षक औषधांवरील सीमा शुल्क पाच टक्के करण्यात आले आहे.

अर्थमंत्र्यांनी देशातील विमा क्षेत्रातील गुंतवणूक परकीय गुंतवणूकदारांसाठी खुली करताना ही रक्कम भारतातच वापरण्याचे बंधन घातले आहे. त्यामुळे आरोग्य विमा क्षेत्रात स्पर्धा होणार असली, तरी आरोग्य विमा जीएसटीमुक्त करण्याची मागणी मात्र विचारात घेतली गेली नाही. या सरकारने कृषीसह सर्वच क्षेत्रांमध्ये 'एआय' तंत्रज्ञान वापरण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. वैद्यकीय शिक्षणाच्या जागा कमी असल्यामुळे विद्यार्थी या शिक्षणापासून वंचित राहतात. आर्थिक स्थिती चांगली असलेली मुले खाजगी मेडिकल कॉलेजमध्ये शिकतात; मात्र गरीब कुटुंबातून आलेली मुले वेगळ्या क्षेत्रांत जातात. आता सीतारामन् यांनी मोठा दिलासा दिला आहे. त्यांनी येत्या पाच वर्षांमध्ये वैद्यकीयच्या दहा हजार जागा वाढवणार असल्याची घोषणा केली आहे. विद्यार्थ्यांसाठी ही मोठी गोष्ट ठरणार आहे. या विद्यार्थ्यांना सरकारी वैद्यकीय कॉलेजमध्ये शिक्षण मिळणार असून खाजगी कॉलेजमध्ये पैसा खर्च करण्याची गरज पडणार नाही.

महिलांसाठी या अर्थसंकल्पामध्ये बरेच काही आहे. सरकार दहा हजार कोटी रुपयाचे योगदान देऊन 'स्टार्ट अप्स'साठी निधीची व्यवस्था करणार आहे. सरकार पहिल्यांदा पाच लाख महिला, एससी आणि एसटी उद्योजिका घडवण्यासाठी दोन कोटी रुपये कर्ज देईल. महिलांना सहज अटींवर विनातारण कर्ज मिळेल. त्यामुळे त्यांना छोट्या आणि मध्यम आकाराचा व्यवसाय सुरू करता येईल. महिलांना उद्योग वाढवण्यासाठी डिजिटल ट्रेनिंग, विपणन सहकार्य आणि सरकारी योजनांशी जोडण्याची संधी दिली जाईल.

सीतारामन् यांनी अर्थसंकल्प मांडताना शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा केली. यात शेतकरी क्रेडिट कार्डची मर्यादा दोन लाखांनी वाढवली. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकाराचे दरवाजे ठोठावण्याची गरज भासणार नाही. युरिया उत्पादनात आत्मनिर्भरता वाढवण्यासाठी सरकार बंद पडलेले तीन युरिया प्रकल्प पुन्हा सुरू करणार आहे. युरिया पुरवठा वाढवण्यासाठी आसामच्या नामरूप येथे १२.७ लाख मेट्रिक टन वार्षिक क्षमतेचा प्रकल्प लावला जाईल. त्यामुळे युरियाची आयात कमी होईल; परंतु गेल्या वर्षभरात खतांच्या अनुदानात केलेली कपात आणि त्यामुळे महाग झालेल्या खतांवर उपाय सापडत नाही. कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाला चालना देण्यासाठी मात्र अर्थसंकल्पात तरतूद नाही. डाळ आणि कापसासाठी धोरण जाहीर केले असले, तरी पूर्वीचा अनुभव लक्षात घेता शेतकरी या धोरणाला किती प्रतिसाद देतात, यावरच सगळे काही अवलंबून राहील. कमी उत्पादकता असलेल्या शंभर जिल्ह्यांची निवड करून उत्पादकता वाढवण्यावर भर देण्याचा सरकारचा प्रयत्न चांगला आहे. त्या अर्थाने अर्थसंकल्पाचे स्वागत करता येते.

देशातील जनतेला धार्मिक स्थळी आवर्जून जाता यावे, म्हणून सरकारतर्फे धार्मिक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. सरकारच्या कररचना आणि गुंतवणुकीबाबतच्या धोरणावर भांडवली बाजाराने नकारात्मक प्रतिक्रिया नोंदवली. गेल्या चार सत्रांमध्ये तेजी अनुभवणाऱ्या गुंतवणूकदारांना अर्थसंकपल्पाने निराश केले आहे. सीतारामन् यांनी भाषणामध्ये नवीन प्राप्तिकर कायद्याचा ओझरता उल्लेख केला. पुढील आठवड्यात हे विधेयक सादर होईल, असे त्यांनी सांगितले. या विधेयकासाठी तज्ज्ञांची एक समिती अगोदरच बनवण्यात आली आहे. नवीन कायदा हा दोन अथवा तीन भागांत असेल. त्यासाठी गेल्या सहा महिन्यांपासून कसरत सुरू होती. सरकार याविषयीचे विधेयक सादर करणार आहे. त्यानंतर करदाते आणि तज्ज्ञांच्या हरकती, प्रतिक्रियेनंतर त्यात सुधारणा करण्यात येईल. आता या नवीन प्राप्तिकर कायद्यामुळे जुना कायदा इतिहासजमा मानण्यात येत आहे. प्राप्तिकर कायद्याचे सुधारित स्वरूप हे अत्यंत सोपे आणि सुटसुटीत असेल. हे विधेयक व्यक्ती, संस्था, उद्योग आणि सरकारला विविध न्यायालयीन कचाट्यातून बाहेर काढण्याचे काम करेल. त्यापोटी नाहक खटले दाखल करण्याची वेळ येऊ नये यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. या पृष्ठभूमीवर अर्थसंकल्प चांगला आहे, मात्र त्यात काही अभिनव पावले दिसली नाहीत, असे वाटते.

पुणे

## रविवारची पत्रे

### वसंत पंचमीचे महत्त्व

वसंत पंचमी हा उत्सव माघ शुद्ध पंचमी या तिथीला साजरा करतात. सर्व ऋतूंचा राजा असणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनाची चाहूल वसंत पंचमीच्या दिवशी लागते. या दिवशी विद्येची अधिष्ठात्री देवता महासरस्वती आणि श्री लक्ष्मी यांचा जन्मदिन साजरा करण्यात येतो. ही तिथी वागेश्वरी आणि श्री पंचमी या नावानेही प्रसिद्ध आहे.

अशी मान्यता आहे की सृष्टीची रचना केल्यानंतर जेव्हा ब्रह्मदेवाने आपल्या संसाराकडे बघितले तेव्हा त्यांना सगळीकडे निर्जनता आणि शांतता जाणवली. हे बघून ते उदास झाले. तेव्हा श्रीविष्णूच्या आज्ञेने त्यांनी आपल्या कमंडलातून पाणी घेऊन पृथ्वीवर शिंपडले. त्या पाण्यामुळे पृथ्वीवर कंपन होऊन त्यातून एक चार भुजा असलेली देवी प्रकट झाली. त्या देवीच्या एका हातात वीणा, दुसरा हात वरमुद्रेत आणि इतर दोन हातात ग्रंथ आणि माळ होती. जेव्हा देवीने वीणा वादन केले त्यानंतर पृथ्वीवरील सर्व जीवजंतूंना वाणी प्राप्त झाली.



त्या क्षणानंतर देवीला सरस्वती असे म्हटले गेले. तसेच सरस्वतीला वागेश्वरी, भगवती, शारदा, वीणा वादिनी यासह अनेक नावे आहेत. संगीताची जन्मदात्री म्हणूनही सरस्वतीची पूजा केली जाते.

शाळा, महाविद्यालयांमध्ये या दिवशी सरस्वतीची पूजा केली जाते. लहान मुलांवर ज्ञानाचा संस्कार व्हावा तसेच सरस्वतीचा आशीर्वाद मिळावा म्हणून त्यांना या दिवसापासून पाटीवर अक्षर गिरवणे शिकवले जाते. विद्यारंभ संस्कारासाठी हा सर्वोत्कृष्ट दिवस मानला जातो. तसेच सर्व प्रकारच्या शुभकार्यासाठीही हा दिवस शुभ मुहूर्त मानला जातो.

या दिवशी पहाटे अभ्यंग स्नान करून पूजा करतात. कलशाची स्थापना करून त्यात सरस्वती देवीला आवाहन करून तिचे पूजन करतात. पिवळ्या रंगाची फुले देवीला अर्पण करतात. पिवळ्या रंगाचे वस्त्र परिधान करण्याला या दिवशी विशेष महत्त्व आहे. नवीन पिकांच्या लोंब्या आणून त्याचा नैवेद्य अर्पण करतात.

या दिवशी विद्यार्थी, कलाकार, गायक, संगीतकार आणि लेखक तसेच इतर भक्त देवी सरस्वतीची उपासना करतात. गायक सुंदर स्वर मिळावा यासाठी प्रार्थना करतात. आपणही सर्वांनी देवी सरस्वतीकडे आपल्या मुलांसाठी सात्त्विक बुद्धी, विद्यार्जन, स्मरणशक्ती प्रदान करण्याची प्रार्थना करू या. आदर्श अशा रामराज्यासाठी सगळ्यांची बुद्धी सात्त्विक कर, उत्तम वाणी सगळ्यांना प्राप्त व्हावी अशी प्रार्थना करू या.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

### विद्या प्राप्ती हेच आदर्श विद्यार्थी जीवन

आदर्श विद्यार्थी जीवन म्हणजे शिस्तबद्ध, प्रेरणादायी आणि उद्दिष्टपूर्तीसाठी सतत प्रयत्नशील राहणारे जीवन. विद्यार्थी जीवन हे मनुष्याच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे, कारण याच काळात व्यक्तिमत्त्व घडते, भविष्याचे स्वरूप ठरते आणि जीवनातील महत्त्वाच्या मूल्यांची शिकवण मिळते. एक आदर्श विद्यार्थी तो असतो जो ज्ञानाची प्राप्ती किंवा शिक्षणाला जीवनाचा पहिला आदर्श मानतो. ज्याला शिक्षणाची इच्छा नाही तो आदर्श विद्यार्थी होऊ शकत नाही. हे ज्ञानच माणसाला नम्र, सहिष्णू आणि सदाचारी बनवते. शिक्षण घेऊनच विद्यार्थी भविष्यात सक्षम नागरिक बनू शकतो. आदर्श विद्यार्थी नेहमीच शिस्तबद्ध असतो. त्याच्यामध्ये वेळेचे व्यवस्थापन, उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योजना बनवणे आणि शालेय कामे योग्य प्रकारे पूर्ण करणे यासारखे गुण असतात. शिस्त म्हणजे नियमितता, परिश्रम आणि आत्म-नियंत्रण. शिस्तबद्ध विद्यार्थी वर्गातच नाही तर जीवनाच्या विविध क्षेत्रांत यश प्राप्त करतो. यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वातसुद्धा सकारात्मक परिवर्तन घडते.

आदर्श विद्यार्थ्याला चांगली पुस्तके आवडतात. पुस्तकात नमूद केलेल्या गोष्टी तो लक्षात ठेवतो आणि त्या आपल्या जीवनात लागू करतो. तो चांगल्या गुणांचा अंगीकार करतो. वाईटापासून दूर राहतो. त्याचे मित्रही चांगल्या गुणांनी परिपूर्ण असले पाहिजेत. आदर्श विद्यार्थी हा सरळ आणि सत्यवादी असावा. त्याने आळशी होऊ नये. मेहनती आणि समर्पित असणे आवश्यक आहे. अभ्यासासोबतच खेळ आणि इतर उपक्रमांमध्येही सहभागी व्हावे. शाळेत होणाऱ्या सर्व प्रकारच्या उपक्रमांत सहभागी होऊन व्यक्तिमत्त्व घडवावे. आदर्श विद्यार्थी नेहमी आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवतो.

वेळेचे नियोजन आणि त्याचे काटेकोर पालन, अभ्यास, खेळ आणि विश्रांती यामध्ये संतुलन राखणे, फक्त पाठांतर न करता, समजून घेण्यावर भर देणे, नवीन गोष्टी शिकण्याची आणि आत्मसात करण्याची जिज्ञासा बाळगणे. अडचणींना संधी मानून त्यावर मात करण्याची वृत्ती, नेहमी आनंदी राहून, इतरांना प्रेरणा देणे, नियमित व्यायाम, योगा आणि ध्यान यामुळे शरीर व मन स्वस्थ ठेवणे, पोषणमूल्य असलेले अन्न घेणे आणि सुसंस्कृत सवयी जोपासणे, गुरुजनांच्या शिकवणीचे पालन करणे, पालकांचे मार्गदर्शन आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, मित्र, सहकारी आणि समाजाशी चांगले संबंध ठेवणे, जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करणे. आदर्श विद्यार्थी जीवन म्हणजे अशी जीवनशैली ज्यामध्ये विद्यार्थी त्याचा अभ्यास, वर्तन आणि नैतिक मूल्ये सुसंगत आणि संतुलित पद्धतीने विकसित करतो. आदर्श विद्यार्थी नेहमीच शिस्तबद्ध असतो. वेळेचा योग्य वापर करणे, नियमित अभ्यास करणे आणि शाळा किंवा महाविद्यालयाच्या नियमांचे पालन करणे महत्वाचे आहे. नियमितपणे गृहपाठ आणि प्रकल्प वेळेवर पूर्ण करणे आणि वर्गात उपस्थित राहणे. आदर्श विद्यार्थी जीवन म्हणजे जीवनातील प्रत्येक क्षणाला महत्त्व देऊन, ज्ञान आणि शिस्त यांच्या माध्यमातून स्वतःचे भविष्य घडवणे. जीवन केवळ स्वतःसाठीच नव्हे, तर कुटुंब, समाज आणि राष्ट्रासाठीही महत्त्वाचे आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### आरोग्य विमा : सामान्य व विशेष विमाधारक वागणूक

अभिनेता सैफ अली खानला लीलावती रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला आहे. मात्र पाच दिवसांसाठी त्याचं हॉस्पिटल बिल ३५ लाख रुपयांवर गेलं आहे आणि विमा कंपनीने त्याचा इतक्या मोठ्या रकमेचा वैद्यकीय दावा तत्काळ मंजूर केला आहे. यावरून मुंबईतील एका वैद्यकीय व्यावसायिकाने प्रश्न उपस्थित केले होते. आता तर मुंबई असोसिएशन ऑफ मेडिकल कन्सल्टंट्सने या संघटनेने सुद्धा इन्शुरन्स रेग्युलेटरी ॲण्ड डेव्हलमेंट अथॉरिटी ऑफ इंडिया जी भारतातील इन्श्युरन्स सेक्टरची देखरेख करणारी सरकारी संस्था आहे, जिचे प्राथमिक ध्येय पॉलिसीधारकांचे हित सुरक्षित ठेवणे आणि इंडस्ट्रीची वाढ सुनिश्चित करणे आहे यांना पत्र लिहून आपली नाराजी व्यक्त केल्याची बातमी वाचण्यात आली. यामध्ये संघटनेने सर्वसामान्य वैद्यकीय विमा पॉलिसीधारकांना या विमा कंपन्यांद्वारा मिळणारी वागणूक त्याच्या दावा मंजुरी बाबतच्या येणाऱ्या अडचणीवर, त्याच वेळी सेलिब्रिटीज यांना देण्यात येणारी विशेष वागणूक यावर प्रामुख्याने प्रकाश टाकला आहे.

मुंबई असोसिएशन ऑफ मेडिकल कन्सल्टंट्स या संघटनेने उचललेले मुद्दे आज सर्व सामान्यांना आरोग्य विमा दावा मंजूर होण्याबाबत तसेच यात येणाऱ्या अडचणी बाबतचे आहे. आज या क्षेत्रातील बहुतांश आरोग्य विमा विकणाऱ्या कंपन्यांद्वारा सर्व सामान्यांचे दावे मनमानी तऱ्हेने नाकारले जातात त्यासाठी अस्पष्ट पॉलिसी कलमांचा गैरवापर करतात जे की सर्व सामान्य पॉलिसी घेणाऱ्याला माहीत नसतात. त्या शिवाय आरोग्य विमा दावा देण्याबाबतच्या प्रक्रियेत प्रचंड विलंब करतात. त्याशिवाय काही वेळेस असे दिसून येते एकतर्फीपणे दाव्याची रक्कम पुरेशा औचित्याशिवाय यामधील कमी केली जाते. मग याबाबत प्रश्न विमा कंपन्यांना विचारले तर कंपनी द्वारा नियमावर बोट ठेवले जाते. सोबतच आरोग्य विमा घेण्यापूर्वी पॉलिसीच्या अटी आणि शर्तींचे काळजीपूर्वक पुनरावलोकन केले होते का? असे सुनावले जाते. आज सर्व सामान्य माणूस आरोग्य विमा न घेण्याची मागील काही कारणे म्हणजे विमा कंपन्यांवर विश्वास नसणे, आरोग्य विमा घेण्याची प्रक्रिया जटिल, मुख्यतः दावा करण्याची प्रक्रिया अतिशय क्लिष्ट असणे, पॉलिसीमधील छुप्या अटी व शर्ती असणे ही आहेत. अभिनेता सैफ अली खानच्या दाव्यामुळे आरोग्य विमा कंपन्या आणि यातील त्रुटी, दावा मंजूर करण्याबाबत सर्व सामान्य पॉलिसीधारकांना भेडसावणाऱ्या यातील अडचणी, यातील भेदभाव या इन्शुरन्स रेग्युलेटरी ॲण्ड डेव्हलमेंट अथॉरिटी ऑफ इंडिया जी भारतातील इन्श्युरन्स सेक्टरची देखरेख करणारी सरकारी संस्था आहे तिच्या तसेच केंद्र सरकार समोर आल्यात. या प्रकरणातून देशातील सर्व सामान्यांना आरोग्य विमा संबंधित दावा मंजुरीबाबत येणाऱ्या अडचणी केंद्र सरकार तसेच आयआरडीए येत्या काळात दूर करेल अशी आशा आहे.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

### कारखान्यातील कामगारांची सुरक्षा आवश्यक

कारखान्यात वाढणाऱ्या अपघातांच्या घटनांमुळे कामगाराच्या सुरक्षेविषयी धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. कारखान्यातील अनेक कामगार धोक्याचे काम करीत असतात. त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी ही कारखान्यातील यंत्र सुरक्षा आधारित असते. कारखान्यातील कामगारांच्या सुरक्षेकडे लक्ष देण्यासाठी कर्मचारी, अधिकारी नियुक्त केले जातात. परंतु कंपनीच्या फिटनेस बाबतीत अनेक कारखान्यांचे दुर्लक्ष होत असल्याने तेथे अपघाताच्या घटना वाढण्याचे प्रमाण वाढले आहे. कारखान्यात अनेक अत्याधुनिक यंत्रे बसविले असतात. त्यांच्या देखभालीकडे दुर्लक्ष केले जात असल्याने कामगारांना अपघाताला सामोरे जावे लागते. यात अनेक कामगारांना आपला जीवही गमवावा लागतो, तर काहींना अपंगत्व येते. अपघाताच्या घटनांमुळे कारखान्यातील कामगारांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालेले आहे. कारखान्यात काम करणारा कामगार धोक्याचे ठिकाणी काम करीत असताना कामगारांना सुरक्षा विषयक नियम आणि सुरक्षा देणारी व्यवस्था कारखाना प्रशासनाद्वारे देणे गरजेचे असते. परंतु कित्येक कारखान्यात याकडे दुर्लक्ष केले जाते. परंतु कारखान्यातील कामगार सुरक्षा विषयक धोरण कागदोपत्री असल्याने त्यामुळे धोका पत्करला जात असतो. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कारखान्यामध्ये केला जात असून सुद्धा कामगारांना मोठा धोका पत्करावा लागत असतो. सुरक्षेविषयी निष्काळजीपणामुळे अनेक कामगारांना अपघातात जीव गमवाव लागतो. धोक्याचे काम करत असताना प्रशासनाद्वारे कामगारांच्या सुरक्षेची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच कारखान्यातील यंत्राच्या देखभालीकडे दुर्लक्ष न करता आवश्यक त्या सुरक्षा आणि सुविधेकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

### धर्माधिष्ठित समाज आणि शिक्षणाची आवश्यकता!

एक बातमी वाचली आणि मन सुन्न झाले. वारंवार तोच विचार मनात येत आहे. एका कोवळ्या वयाच्या बालिकेने पाश्चात्त्य विचारांच्या आणि ऑनलाईन गेमच्या अधीन जाऊन, मृत्यूनंतरच्या गूढ गोष्टी उलगडण्यासाठी पूर्वनियोजितपणे, शांत डोक्याने आत्महत्या केली. हे चित्र अजूनच बेचैन करून गेलं. कारण आजपर्यंत अनेक अशा घटनांमध्ये याच वर्गातील कोवळी बालके बळी पडलेली आहेत.

अशा घटना घडल्या की अनेक जण पालकांना दोष देऊन मोकळे होतात. पण माझ्या मते, अशा प्रकरणांमध्ये तथाकथित सर्वधर्मसमभाव ही समाजरचना आणि त्या आधारावरची आजची शिक्षणपद्धती कारणीभूत आहे. कारण केवळ हिंदूंच्या मनावर सर्वधर्मसमभावाचा पगडा जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आला आहे. यामुळे हिंदू वर्ग धर्मशिक्षणापासून दूर जात आहे. तथाकथित सर्वधर्मसमभावाच्या या समाजात मात्र मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्माचे शिक्षण आजही दिले जाते. तिथे कोणीही प्रश्न उपस्थित करत नाही. परंतु हिंदू शाळांमध्ये जरा कुठे गीतेचा अध्याय शिकवायचे म्हटले, तर दुर्दैवाने चार हिंदूच त्याला विरोध करतात आणि ते बंद करण्यास भाग पाडतात.

हिंदू धर्मात जन्मापासून मृत्यूपर्यंत आणि मृत्यूनंतरच्याही प्रत्येक रहस्याचे गूढ उलगडून सोप्या पद्धतीने सांगण्यात आले आहे. गुरुकुल पद्धतीत या सगळ्यांचा अभ्यास होत असे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात शंका-कुशंका निर्माण होत नसत. परंतु आजच्या शिक्षणपद्धतीमुळे विद्यार्थी अर्धवट ज्ञानाने भरलेले आहेत. आजकाल शाळांमध्ये लैंगिक शिक्षणाचे तास घेतले जातात, असे ऐकले आहे. हे शिक्षण कशा पद्धतीने दिले जाते, त्यामध्ये जबाबदारीची जाणीव करून दिली जाते का? याचा विचार व्हायला हवा. कारण आज मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग रिलेशनशिपमध्ये गुंततो किंवा समलिंगी विवाहासारख्या समाजघातक गोष्टी अंगीकारतो.

एकंदरीत काय, तर धर्मशिक्षण नसल्यामुळे हिंदू विद्यार्थी धर्मांतरित होतो, हिंदू तरुणी लव्ह जिहादच्या जाळ्यात अडकतात, हिंदू बालकांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे, तर काही जण रिलेशनशिपसारख्या समाजघातक गोष्टींकडे वळत आहेत. याला जबाबदार असलेल्या सर्वधर्मसमभाव या समाजरचनेत आणि शिक्षणव्यवस्थेत बदल होणे आवश्यक आहे.

आज माझ्या या विचारांवर अनेक जण विरोध करतील. या घटनेला धर्माचा रंग दिला किंवा आधुनिक शिक्षणपद्धतीवर टीका केली, असे म्हणतील. अशा सर्वांना हात जोडून विनंती आहे की कृपया याचा गांभीर्याने विचार करा. कारण अशा घटना एका विशिष्ट समाजातच वारंवार घडत आहेत. शिक्षणपद्धतीच्या संदर्भातील मुद्देही सगळ्यांनाच माहीत आहे.

विद्वान मंडळी, राजकीय क्षेत्रातील दिग्गज, शिक्षण क्षेत्रातील विचारवंत आणि प्रत्येक पालक यांनी याचा विचार करावा. पुन्हा गुरुकुलाप्रमाणे सर्वसमावेशक धर्मशिक्षण देण्याची व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या धर्माचे शिक्षण देण्याची सोय असावी. तेव्हाच खऱ्या अर्थाने सर्वधर्मसमभाव ही समाजरचना अस्तित्वात येऊ शकेल.

**केतकी हरदास**/नागपूर

### प्रदूषण रोखण्यासाठी आम्ही बदलणे आवश्यक

'प्रदूषण, भारतीय संस्कृती आणि आम्ही' हा अग्रलेख वाचला. प्रदूषण हे आजच्या काळातील सर्वांत मोठे आव्हान बनले आहे. ते आपल्या पर्यावरणाला, आरोग्याला आणि जीवनशैलीला मोठ्या प्रमाणात प्रभावित करत आहे. भारतासारख्या देशात, जिथे संस्कृतीची मुळे खूप खोलवर रुजलेली आहेत, प्रदूषणाने आपल्या परंपरा आणि मूल्यांनाही धोक्यात आणले आहे.

भारतीय संस्कृती ही निसर्गाशी एकरूप होण्याची शिकवण देते. आपल्या वेद, पुराण आणि इतर धार्मिक ग्रंथांमध्ये निसर्गाचे देवत्व करण्यात आले आहे. वृक्षांची पूजा, नद्यांचे पूजन, पर्वत आणि पशु-पक्ष्यांचे संरक्षण या गोष्टी आपल्या संस्कृतीचाच एक भाग आहेत. मात्र, आजच्या काळात आपण या मूल्यांपासून दूर जात आहोत. वायुप्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनिप्रदूषण आणि मृदाप्रदूषण. या सर्व प्रकारच्या प्रदूषणाचे आपल्या आरोग्यावर, पर्यावरणावर आणि अर्थव्यवस्थेवर परिणाम होतात. प्रदूषणामुळे श्वसनाच्या समस्या, कर्करोग, हृदयविकार आणि इतर अनेक आजार होण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रदूषणामुळे जैवविविधता नष्ट होत आहे, हवामान बदल होत आहे आणि नैसर्गिक संसाधने संपत आहेत. प्रदूषणामुळे उत्पादकता कमी होते, पर्यटन उद्योगाला धक्का बसतो आणि आरोग्य सेवांवर खर्च वाढतो.

भारतीय संस्कृतीने निसर्गाचे संरक्षण करण्याचे शिकवले असले आज आपण पाहतो की आपणच निसर्गाचे सर्वांत मोठे शत्रू बनले आहोत. प्रदूषणामुळे आपली संस्कृती आणि मूल्ये धोक्यात आली आहेत. प्रदूषणामुळे नद्या आणि तळी प्रदूषित झाले आहेत, ज्यामुळे धार्मिक स्थळांचे सौंदर्य कमी झाले आहे. प्रदूषणामुळे पर्वत आणि वने नष्ट होत आहेत, ज्यामुळे आपले धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांना आधार देणारे निसर्ग सौंदर्य नष्ट होत आहे. प्रदूषणामुळे औषधी वनस्पतींचे नुकसान होत आहे. कचरा कमी करणे, पुनर्वापर करणे आणि योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे, खाजगी वाहनांचा वापर कमी करून सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे, ऊर्जा वाचवण्यासाठी प्रयत्न करणे, अधिकाधिक झाडे लावणे, सरकारला पर्यावरण संरक्षणासाठी कठोर कायदे करण्यासाठी दबाव टाकणे आवश्यक आहे.

**अनंत ताम्हणे**/९४२२६१४७६२

## संस्कृती

श्रीश देवपुजारी

# सरस्वती पूजनाचे औचित्य

१९६०-७० च्या दशकात शाळांमध्ये दर शुक्रवारी सरस्वती पूजन होत असे. गूळ-फुटाण्याच्या प्रसादाची प्राप्ती हाच बालगोपालांचा आनंदाचा विषय. 'सरस्वती विद्येची देवता' आहे, इतकेच वाक्य विद्यार्थ्यांना माहिती असे. पण विद्या म्हणजे काय, विद्यार्थी या शब्दाचा अर्थ काय, याची पुसटशी कल्पना त्या काळात शालेय विद्यार्थ्यांना नसायची. सरस्वती नदी अस्तित्वात नाही. तेव्हा आपली भारतीय सभ्यता ही सिंधू घाटी सभ्यता आहे, हे इतिहासाच्या पुस्तकात लिहिलेले असे.

१९८०-९० च्या दशकात मोरोपंत पिंगळे व प्रसिद्ध पुरातत्त्वविद् डॉ. वाकणकर (उज्जैन) यांनी सरस्वती शोधयात्रा काढली. या उपक्रमाला जगाधरीचे उद्योजक पद्मश्री दर्शनलाल जैन व चेन्नईचे शोधकर्ता कल्याण रमण यांनी वाहून घेतले. त्यांच्यासारख्या अनेकांच्या प्रयत्नाला यश येऊन आज भारतीय हे सांगण्याच्या स्थितीत आले आहेत की, सरस्वती नदी अस्तित्वात होती व भारतीय सभ्यतेचा उद्भव सरस्वती नदीच्या तीरावर झाला.

**सरस्वती सभ्यतेचा उद्गम** : आयआयटी, आयआयएससी, ओएनजीसी, इस्रो इत्यादी संस्था व इतर शास्त्रसंबद्ध संस्था (जशा पुरातत्त्वशास्त्र, भूगर्भशास्त्र, जलविज्ञान, हिमनदी शास्त्र, दूरस्थ संवेदन, भूगर्भीय जल इत्यादी) यांनी हे सिद्ध केले आहे की, आता सरस्वती नदी हे सत्य आहे. उपग्रहांच्या द्वारा प्राप्त चित्रे, भूजल संशोधन, वेगवेगळी शोधपत्रे, सर्व्हे ऑफ इंडियाचे मानचित्र व महसूल रेकॉर्ड सरस्वतीच्या सत्यतेला प्रमाणित करतात. ऋग्वेदात सरस्वतीची 'अम्बीतमे, नदीतमे व देवितमे' अशी विशेषणे वापरली आहेत. आमच्या प्राचीनतम सभ्यतेच्या विकासात सरस्वती नदीचे विशेष स्थान आहे. भूपरिवर्तनामुळे १६०० किलोमीटर लांबीच्या हिमालयापासून सिंधू सागरापर्यंत वाहणाऱ्या सरस्वती नदीचे पाणी आटले. ही घटना ४००० इसवीसनापूर्वी झाली असावी, असे आजपर्यंत प्रकाशित शोधांवरून अनुमान करता येते. पण भारतीयांच्या मनातील सरस्वती अजून जिवंत आहे.



हिमालय पर्वताच्या गढवाल क्षेत्रातल्या बंदरपूंछ हिमनद्यांच्या समूहापासून सरस्वती नदीचा उद्गम झाला. दक्षिण-पश्चिम दिशेने वाहात जात शिवालिक पर्वत शृंखलेच्या पायथ्याशी, हरयाणा प्रांतातील, यमुनानगर जिल्ह्यातील, आदिबद्री या स्थानी ही नदी भूमीवर अवतरित झाली. हिच्या तटावर कुरुक्षेत्र, सिरसा, कालीबंगन, पिलिबंगन, सूरतगड, पेहोवा इत्यादी नगरांचा विकास झाला. पेहोवा हे नाव पृथू राजाच्या नावावरून पडले आहे. पृथूने आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर १२ दिवस भेटीला येणाऱ्यांना सरस्वतीचे पाणी पाजले, असा उल्लेख ऋग्वेदात आहे. मार्कण्डेय, वशिष्ठ, विश्वामित्र, पराशर, याज्ञवल्क्य, च्यवन, कपिल मुनी इत्यादी ऋषींचे आश्रम सरस्वती नदीच्या काठी होते. ही नदी पुढे पंजाब, राजस्थान, गुजरात या राज्यांमधून वाहात सागराला मिळते. १२०० पेक्षा अधिक गावे या नदीच्या तटावर होती. या नदीचे पात्र ३ ते १२ किलोमीटरपर्यंत रुंद आढळते. यावरून नदी किती विशाल असेल, याची कल्पना येते.

सरस्वती नदीचा उल्लेख ऋग्वेदात ७५ वेळा आहे; उलट गंगेचा उल्लेख केवळ एकदाच आहे. आदिबदरी येथे व्यासांनी १८ हजार श्लोकांच्या भागवत पुराणाची रचना केली. महाभारतातील युद्ध सरस्वती व द्रिशद्वती या दोन नद्यांच्या मधल्या भूमीवर लढले गेले, असा उल्लेख महाभारतात आहे. त्या संपूर्ण युद्धभूमीलाच कुरुक्षेत्र म्हणतात. या नदीमुळे एकेकाळी थार वाळवंट हिरवेगार होते. या नदीच्या पुनरुज्जीवनाचे प्रयत्न व्हावेत, अशी जनतेची मागणी आहे.

**विद्या** : विद्येची देवता सरस्वती हिचे पूजन शिशिर ऋतूत, माघ महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या पंचमीला होते. या तिथीला 'वसंत पंचमी'देखील म्हणतात. हा पूर्व भारतात समाजोत्सव आहे. विद्या या शब्दाची व्याख्या विष्णुपुराणात 'सा विद्या या विमुक्तये' अशी केली आहे. म्हणजे विद्या तिला म्हणतात, जी मुक्ती प्रदान करते. सध्या जे शिक्षण सामान्य विद्यालय, महाविद्यालय व विश्वविद्यालयांमध्ये दिले जाते ते 'नियुक्ती' प्रदान करते, मुक्ती नाही. जी शास्त्रे भारताच्या बाहेर उत्पन्न झाली आहेत, ती सगळी नश्वर जगताशी संबंधित आहेत. म्हणून त्यांना लौकिक शास्त्रे म्हणतात. तीच शास्त्रे शिक्षणात आहेत. उदा. भौतिक, रसायन, जीव, वनस्पती इत्यादी. भारतात दोन्ही प्रकारची शास्त्रे विकसित झालीत - लौकिक व अलौकिक. अलौकिक शास्त्रे मुक्ती प्रदान करतात. अलौकिक शास्त्रे केवळ संस्कृत विद्यालय, महाविद्यालय व विश्वविद्यालयांमध्ये शिकविली जातात.

**अलौकिक शास्त्रे** : संस्कृत भाषेत १६ दर्शनांचे प्रतिपादन 'सर्वदर्शनसंग्रह' या माधवाचार्यांनी लिहिलेल्या पुस्तकात केले आहे. त्यातील चार्वाक दर्शन सोडले तर अन्य १५ दर्शनांचे उद्दिष्ट मुक्ती, समाधी, मोक्ष, कैवल्य, निर्वाण हे आहे. ती १५ शास्त्रे म्हणजे विद्या. यापैकी किमान एक शिकणे व त्यानुसार जीवन यापन करणे म्हणजे विद्येची उपासना करणे. याचाच अर्थ सरस्वतीची आराधना करणे. यासाठी आधी संस्कृत भाषा व नंतर व्याकरण शिकावे लागते, तेव्हाच शास्त्रात प्रवेश होतो. म्हणून आपण सर्वांनी संस्कृत शिकायला वसंत पंचमीपासूनच सुरुवात करावी व संकल्प करावा की मी पुढे शास्त्र शिकेन.

संस्कृतभारती

shreeshdeopujari@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### चौधरी फौंडेशनतर्फे कवी संमेलन

**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**

चौधरी फौंडेशन आयोजित सोलापुरी कवी कट्टा कवी संमेलन संपन्न झाला. अध्यक्षस्थानी कवी माधव पवार, स्वागत अध्यक्ष चेतन चौधरी, बाळासाहेब पाटील व अरुण कदम यांनी दिपप्रज्वलन करून संमेलनाची सुरुवात केली. संमेलनात ३० कवींनी कविता सादर केली. सूत्रसंचालन कवियित्री राजश्री जाधव यांनी केले तर आभार कवी मयुरेश कुलकर्णी यांनी मानले. प्रत्येक कवींना चौधरी फौंडेशन व संतोषी माता महिला भजनी मंडळ यांच्याकडून प्रशस्ती पत्रक देण्यात आले. कार्यक्रमासाठी चौधरी फौंडेशनचे चेतन चौधरी, कवी कट्ट्याचे राम प्रभू माने, राजश्री जाधव, धर्माधिकारी यांनी परिश्रम घेतले.




### ठोकळ प्रशालेच्या स्काऊट-गाईडच्या संघाचे जांबोरीत महाराष्ट्राचे नेतृत्त्व

**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**

भारत सरकारच्या द भारत अँड गाईडस् च्या वतीने तामिळनाडू राज्यातील त्रिची येथे २७ जानेवारी ते ३ फेब्रुवारी या कालावधीत स्काऊट आणि गाईडस् यांच्यासाठी राष्ट्रीय सांस्कृतिक जांबोरीचे आयोजन करण्यात आले होते. श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेच्या स्काऊट आणि गाईड संघाची महाराष्ट्रच्या संघांसाठी राष्ट्रीय सांस्कृतिक जांबोरी साठी निवड झाली असून त्यात प्रशालेतील ८ स्काऊटस व ८ गाईड्सह स्काऊट मास्टर अर्जुन सुरवसे व गाईडर पूनम चव्हाण यांचा समावेश होता. या राष्ट्रीय जांबोरीसाठी १७, ००० स्काऊट् व गाईड यांची उपस्थिती होती. त्यापैकी महाराष्ट्रातून ८५० स्काऊट् व गाईडसची निवड झाली होती. या राष्ट्रीय संस्कृतिक जांबोरीसाठी कर्नाटक व तामिळनाडू राज्याचे उपमुख्यमंत्री यांची विशेष उपस्थिती होती. जांबोरीत कलर पार्टी, शोभा यात्रा, आदिवासी नृत्य, विविध राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे सांस्कृतिक उपक्रम यावेळी आयोजित करण्यात आले. श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेच्या स्काऊट आणि गाईडस यांनी शोभा यात्रा, संचालन व आदिवासी नृत्य यातून महाराष्ट्रीयन संस्कृतीचे उत्कृष्ट सादरीकरण करून मान्यवरांकडून कौतुकाची थाप मिळविली. राष्ट्रीय जांबोरीसाठी प्राचार्य डी. डी. गाजरे यांचे कुशल नियोजन व सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांना स्काऊट मास्टर अर्जुन सुरवसे व गाईडर पूनम चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. राष्ट्रीय जांबोरीसाठीच्या निवडीबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती निर्मलाताई ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ संचालिका शिल्पा ठोकळ, प्राचार्य डी. डी. गाजरे यांनी अभिनंदन केले.


### दाजी पेठेत ट्रिपल सीट दुचाकीस्वाराने महिलेला ठोकरले; एकावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**

दुचाकीवर ट्रिपलसीट बसून जाणाऱ्या दुचाकीस्वाराने महिलेला धडक देऊन जखमी केले. हा प्रकार शहरातील दाजी पेठेत २९ जानेवारी रोजी आठ वाजण्याच्या सुमारास घडला. छबुबाई तुकाराम जगताप (वय ५०, रा. राहुल गांधी झोपडपट्टी, सोलापूर) असे दुचाकीच्या धडकेत जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून अयान जलाल बागवान (वय २०, रा. सुनिल नगर, सोलापूर) विरूध्द जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेच्या दिवशी छबुबाई भद्रावती पेठेतील रस्त्यावरून पायी जात होत्या. त्यावेळी समोरून ट्रिपलसीट दुचाकीवर आलेल्या अयान याने छबुबाई यांना समोरून धडक दिली. यात छबुबाई यांच्या चेहऱ्याला जखम होऊन तसेच सर्वांगास मुका मार लागला. याला कारणीभूत ठरल्याप्रकरणी अयानविरूध्द पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्याचा तपास हवालदार मस्के करत आहेत.

### सांगवी प्रशाला होणार ॲड. सर्जेराव जाधव प्रशाला

**अक्कलकोट दि . १ फेब्रुवारी-**



फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या सांगवी प्रशालेस समाजभूषण स्व. ॲड. सर्जेराव जाधव प्रशाला असे नामकरण करण्याचा ठराव माजी उपाध्यक्ष अरुण जाधव यांनी सर्वसाधारण सभेत मांडला. उपस्थित सभासदांनी एकमताने मान्यता दिली. या प्रशालेचे नामकरण त्वरीत करण्यात येईल असे संस्थेचे अध्यक्ष राजू माने यांनी सांगितले. स्व. सर्जेराव जाधव यांनी संस्थेस भरीव देणगी देऊन सभागृहाचे बांधकाम केले आहे. स्वतःच्या नावे ट्रस्ट स्थापन करून त्या माध्यमातून गोरगरिबांना आर्थिक मदत, शालेय विद्यार्थ्यांना परीक्षा फी व शालेय साहित्य तसेच शेतकऱ्यांना बी बियाणे, गरजूंना मोफत नेत्र शस्त्रक्रिया या ट्रस्टच्या माध्यमातून केल्या जातात. यावेळी ॲड. शरद फुटाणे, डॉ. मनोहर मोरे, विलास गव्हाणे,तानाजी चव्हाण, बाबा निंबाळकर, संतोष फुटाणे, सुधाकर गोंडाळ, अमर शिंदे, दत्ता पाटील, प्रा. भिमराव साठे, दिलीप काजळे, विठ्ठल मोरे आदी उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**

**ट्रिब्युनल मुंबई खंडपीठावर रेल्वेचा दावा**

**सूचना**

उप: रेल्वे दावा न्यायाधिकरण, मुंबल खंडपीठ (RCT) मध्ये डेटा एंट्री ऑपरेटर्सचे (DEO) आउटसोर्सिंग. डेटा एंट्री ऑपरेटर (ऊएज) च्या दोन (०२) रिक्त जागा रॅलवे क्लेम ट्रिब्युनल, मुंबई खंडपीठाच्या कार्यालयात कराराच्या आधारावर ११ महिन्यांच्या कालावधीसाठी भरल्या जाणार आहेत आणि २५000/ च्या निश्चित मानधनासह ब्रेकसह वाढवता येतील. - दरमहा. अर्ज पोस्टाने/ हस्ते १९/ढ, थखत्रथच, १८०, P. D'Mello Road, CSMT च्या प्लॅटफॉर्म क्रमांक १८ समोर, मुंबई ४०० ००१ येथे अतिरिक्त रजिस्ट्रार रॅलवे क्लेम्स ट्रिब्युनल यांना संबोधित केलेल्या विहित प्रोफॉर्मामध्ये पाठवले जातात. अर्ज ०५-०३-२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी सबमिट करावा १५.०० वा. अधिक तपशीलांसाठी, कृपया रेल्वे क्लेम ट्रिब्युनल (www.rct.indianrall.gov.in) च्या वेबसाइट्स किंवा १९/T, Wigwam, १८०, P D'Mello Road येथे अतिरिक्त निबंधक कार्यालयाच्या सूचना मंडळाला भेट द्या. समोर. CSMT, मुंबळ-४०000१ चा प्लॅटफॉर्म? १८. 744

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

# अकलूज येथे लावणी स्पर्धेला दिमाखात प्रारंभ

## दोन दिवस मिळणार मेजवानी; यंदाचे २८ वे वर्षे, पुढच्या वर्षापासून दोन गटांत स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १ फेब्रुवारी-**



सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेला दिमाखात प्रारंभ झाला. स्पर्धेचे उद्घाटन सुलक्षणादेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, आ. दिलीप सोपल, समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील, अकलूज बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरुपाराणी मोहिते-पाटील, सहकार महर्षी लावणी पुरस्कार विजेत्या वैशाली जाधव, रेश्मा परितेकर, प्रमिला लोदगेकर, बरखाताई जळगावकर, सुरेखाताई पवार प्रमुख उपस्थित होते.

स्मृतिभवन शंकरनगर येथे१ व २ फेब्रुवारी या कालावधीत या स्पर्धांचे आयोजन केले आहे. प्रस्ताविकातस्वरुपाराणी मोहिते-पाटील म्हणाल्या, जयसिंह मोहिते-पाटील यांनी सहकार महर्षींचे अमृत महोत्सवी जयंती वर्ष जानेवारी १९९३ पासून राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेला सुरुवात केली. हा लावणी स्पर्धेचा प्रवास अविरतपणे तब्बल २८ वर्ष चालला. जयसिंह मोहिते-पाटील व मदनसिंह मोहिते-पाटील या बंधूंच्या अमृतमहोत्सवा निमित्तानेही स्पर्धा आयोजित केली. लावणीची महाराष्ट्राला मोठी संस्कृती, परंपरा व वरदान आहे. या वर्षी १० पार्ट्यांना सहभाग दिला आहे. पुढील वर्षापासून गट अ व गट ब अशा दोन गटांत स्पर्धा होणार असून यामुळे कलाकारांना संधी व प्रोत्साहन मिळेल.

स्पर्धेच्या प्रारंभी सादरीकरणाचा पहिला मान पूनम नगरकर, लक्ष्मी लोकनाट्य संस्कृती कला केंद्र सणसवाडी (ता. शिरूर, जि. पुणे) या संघाला मिळाला. त्यांनी सादर केलेल्या मराठमोळी कला ही नारी, तिच्यावर रुसू नका, लावणी विसरू नका या लावणीला रसिकांनी दाद दिली. सायंकाळी उशिरापर्यंत अनिता परभणीकर नटरंग कला केंद्र मोडनिंब, अश्विनी, योगिता, परितेकर जय अंबिका कला केंद्र सणसवाडी, प्रीती परळीकर न्यू अंबिका सांस्कृतिक कला केंद्र केडगाव चौफुला व माया खामगावकर नटरंग कला केंद्र मोडनिंब या पार्टीचे सादरीकरण झाले.

**या स्पर्धेसाठी भव्य पारितोषिके**

प्रथम क्रमांकास रुपये तीन लाख, द्वितीय क्रमांकास रुपये दोन लाख, तृतीय क्रमांकास रुपये एक लाख, चौथ्या क्रमांकास ७५ हजार व पाचव्या क्रमांकास ५१ हजार अशी बक्षिसे आहेत तर उत्कृष्ट नृत्यांगना रुपये ५ हजार व कै. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील स्मृती चषक, उत्कृष्ट अदा (वैयक्तिक) रुपये ५ हजार, उत्कृष्ट मुजरा रुपये ३ हजार, या शिवाय उत्कृष्ट ढोलकीपटू, उत्कृष्ट पार्श्वगायिका, उत्कृष्ट पेटीवादक व उत्कृष्ट तबलावादक यांनाही वैयक्तिक पारितोषिक देण्यात येणार आहेत.

# पद्मशाली संस्थेच्या शिबिरात २,७८८ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**



पद्मशाली शिक्षण संस्थेच्या वतीने पद्मशाली समाजाचे कुलदैवत महर्षी श्री मार्कंडेय जन्मोत्सव हा संस्था अंतर्गत सर्व शाखा एकत्रितपणे कुचन प्रशालेच्या प्रांगणात साजरा करण्यात आला. ४०० कर्मचाऱ्यांनी हा जन्मोत्सव एकत्रित साजरा केला. रक्तदान शिबिराचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी व सचिव दशरथ गोप यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करुन करण्यात आला. यावेळी श्री मार्कडेय महामुनींचा जन्मोत्सव व श्री गणेश जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करण्यात आले. रक्तदान शिबिरामध्ये संस्थेने आज पुन्हा नवा विक्रम केला आहे. आजच्या शिबिरात २, ७८८ इतक्या रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे पदाधिकारी अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सहसचिव मल्लिकार्जून सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, विश्वस्त सर्वश्री. दिनेश यन्नम, नागनाथ गंजी, व्यंकटेश आकेन, संगीता इंदापुरे, मधुकर कट्टा, गणेश गुज्जा, नागनाथ श्रीरामदास, श्रीनिवास जोग, रमेश बोध्दूल, नरेश श्रीराम, प्रभाकर आरकाल, श्रीनिवास गड्डम, रामदास इप्पाकायल, अंबादास गज्जम, श्रीनिवास इप्पाकायल आदी उपस्थित होते. आ. देवेंद्र कोठे यांनी रक्तदान करून लोकप्रतिनिधी समोर एक नवा आदर्श निर्माण केला. रक्तदान शिबिरावेळी अनेक मान्यवरांनी भेट दिली.

त्यामध्ये अंबाजी गुर्रम, विश्वनाथ मेरगू, विष्णू कारमपुरी, अजय अनलदास, दयानंद कोंडाबत्तीनी, हरिदास पोटाबत्ती, यशवंत इंदापुरे, शिरीष बंडगर, माजी नगरसेवक मधुकर अनंतकर, अमृतदत्त चिन्नी, संतोष येमूल, राष्ट्रवादी अजितदादा गटाचे जिल्हा अध्यक्ष संतोष पवार, किसन जाधव, जुबेर बागवान ,शहर अध्यक्ष महाशाळकर ताई आदी उपस्थित होते. शहरातील सिव्हिल, डॉ. हेडगेवार, ईरपण्णा बोल्ली, दमाणी, अश्विनी, सिध्देश्वर, मेडिकेअर, मल्लिकार्जुन, रेवणील, अक्षय, शिवशंभो, सोलापूर रक्तपेढी इत्यादी रक्त पेढयानी योगदान दिले.

शिबीर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी, विश्वस्त तसेच रक्तदान शिबीर प्रमुख कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनिल निंबाळकर तसेच संस्था शाखेचे मुख्याध्यापक युवराज मेटे, गीता सादूल, शारदा गोरट्याल, श्रीनिवास चिप्पा, अजिता पिल्लाई, रसिका किल्लेदार, पुलकेशी संगा, व्यंकटेश पोटाबत्ती, मंजुळा कुडक्याल, नागेश खुने, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, तुकाराम श्रीराम, बाळकृष्ण गोटीपामूल, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगू, मल्लिकार्जून जोकारे, परमेश्वर बाबलसुरे, सर्व शाखेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे योगदान दिले.

# वॉटर बोटमध्ये बसण्याच्या कारणातून कात्रीने हल्ला; तिघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी -**




गड्डा यात्रेतील लहान मुलांच्या बोटमध्ये बसण्याच्या कारणावरून दारू प्राशन केलेल्या तिघांनी वाद घालून कात्रीने हल्ला करून जखमी केले. हा प्रकार २८ जानेवारी रोजी रात्री ७.५० च्या सुमारास घडला.

कृष्णा सुरेश म्यानल (वय २८, रा. नवीन विडी घरकुल, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरून अनिल व इतर दोन (सर्व रा. रविवार पेठ, सोलापूर) विरूध्द सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी हा गड्डा यात्रेत सुगंधी दूध व पाणी बॉटल विक्रीचा व्यवसाय करतो. फिर्यादीच्या दुकानाच्या मागील बाजूस असलेल्या लहान मुलांचे वॉटर बोट हे फिर्यादीचा मित्र आदिल हा चालवित होता. रात्रीचे ७.५० वाजण्याच्या सुमारास यातील आरोपी अनिल व इतर दोन दारु प्राशन करून तेथे आले. त्यांनी त्या लहान मुलांच्या बोटमध्ये बसण्याचा आग्रह करून वाद घालण्यास सुरूवात केली. त्यांना समजावून सांगत असताना आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यादरम्यान कात्रीने आदिलच्या खांद्याच्या उजव्या बाजूला, पोटावर तसेच गळ्यावर मारून आदिल यास जखमी केले. या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक बनकर करत आहेत.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

बार्शी तालुक्यातील तमाम लोकांना विशेषतः पिंपळगांव (पा) येथील व पंचक्रोशीतील लोकांना कळविणेत येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे पिंपळगांव (पा) येथील जमीन गट नं. १३१/३ यातील आमचे अशिल सुवर्णा भास्कर देशमुख, विनोद भास्कर देशमुख, नंदा धनाजी इंगोले यांचे समाईक क्षेत्र ०० हे. ४० आर + पो.ख. ० हे. ०६ आर, एकूण क्षेत्र ०० हे. ४६ आर, आकार ० रु. ७४ पैसे यांसी चतुःसिमा- पूर्वेस- रस्ता, दक्षिणेस- आण्णासाो. भारत पवार यांचे क्षेत्र, पश्चिमेस- स.ग.नं. पैकी वर्षा विनोद देशमुख यांचे क्षेत्र, उत्तरेस- स.ग.नं. पैकी लक्ष्मण धर्मराज थिटे यांचे क्षेत्र. येणे प्रमाणे चतुःसिमापूर्वक झाडझुडूप तदंगभूत वस्तुसह. तसेच स.ग.नं. पैकी आमचे अशिल वर्षा विनोद देशमुख यांचे क्षेत्र ०० हे. ८० आर, आकार ०१ रु. ५० पैसषे यांसी चतुःसिमा- पूर्वेस- स.ग.नं. पैकी सुवर्णा भास्कर देशमुख वगैरे यांचे सामाईक क्षेत्र, दक्षिणेस- स.ग.नं. पैकी आण्णासाो. भारत पवार यांचे क्षेत्र, पश्चिमेस- स.ग.नं. पैकी विश्वजित विनोद देशमुख यांचे क्षेत्र, उत्तरेस- स.ग.नं. पैकी लक्ष्मण धर्मराज थिटे यांचे क्षेत्र. येणे प्रमाणे चतुःसिमापूर्वक झाडझुडूप तदंगभूत वस्तुसह.

येणेप्रमाणे वरील गट नं. पैकी जमीन आमचे अशिलांनी खरेदी देणेचे ठरवून इसारा दाखल रक्कम स्वीकारलेली आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचे काही हरकती खरेदी, बक्षीसपत्र, गहाण, दान, लिज, तारण वगैरे काही व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत आमचे खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात कळवावे, अन्यथा आमचे अशिल वरीलप्रमाणे ठरलेला खरेदी दस्ताचा व्यवहार कोणाची काही हरकत/आक्षेप नाही असे समजून पूर्ण करतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे. तारीख : ०१/०२/२०२५

सही/-
अशिलातर्फे ॲड.
**ॲड. प्रमोद भानुदास लोखंडे,**
मु.पो. घारी, ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९९२१४८७२८४

### जाहीर समन्स/नोटीस

**आर.टी.एस. अपिल नं. ४२/२०२४**
**पुढील नेमलेली तारीख : ०५/०३/२०२५**

**सोलापूर येथील मा. उपविभागीय अधिकारी साहेब यांचे कोर्टात**

**श्री. भगवंत मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., बार्शी** ----- **अपेलंट**

**- विरुद्ध -**

**शालन अरुण बोंडवे** ----- **रिस्पाँडंट**

प्रति,

१) **शालन अरुण बोंडवे, मयत वारस**
**१अ) पुष्पा अनंत ढेरे,** रा.बालाजी मंदीर, स्वामी नारायण मंदीर पाठीमागे, इकरा गारमेंटजवळ, गोवर्धन धाम कॉलनी, संजय धोका यांचे घरी भाडेकरु बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

२) **शबाना शब्बीर खान, ऊर्फ मेघा माने,** रा. गट नं. १८९/१ पैकी प्लॉट नं. २९, नाळे प्लॉट, जुना मार्केट यार्ड रस्ता, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

ज्याअर्थी, अपेलंटने हल्लीचे अपिल रिस्पाँडंट विरुद्ध मा. उपविभागीय अधिकारी साहेब सोलापूर यांचेकडे आरटीएस अपील दाखल केले आहे. सदर अपील व त्याचे उशिरामाफीचे अर्जावर सुनावणीकामी मे. कोर्टाने वेळोवेळी रिस्पाँडंट यांचे विरुद्ध त्यांचे पत्त्यावरती समन्स/नोटीसा रजि. पोस्टाने काढलेल्या आहेत. सदर अर्जाचे समन्स/नोटीस घेवून संबंधित पोस्टमन सरनाम्यात दिलेल्या नमूद पत्त्यावर बजावणीकरिता गेले असता, सदर पत्त्यावर समन्स/नोटीस बजावणी होत नाही/झाली नाही. तुम्ही जाणीवपूर्वक समन्स/नोटीसची बजावणी हेतुपुरस्सर टाळाटाळ करीत आहात. तुम्हास सदर अर्जाचे समन्स/नोटीस बजावणी होणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे.

त्याअर्थी, या जाहीर समन्स/नोटीसीद्वारे आपणास सूचित करण्यात येते की, आपण सदर अर्जाचे कामी हे जाहीर समन्स/नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अथवा पुढील नेमलेली तारीख ०५/०३/२०२५ रोजी स्वतः अथवा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून मुदतीत आपले म्हणणे लेखी स्वरुपात मा. न्यायालयात सादर करावे. मुदतीत आपण हजर होवून आपले म्हणणे दिले नाही तर आपणांस सदर समन्स/नोटीस बजावणी होवूनही आपणांस काहीही सांगायचे नाही असे समजून मा. न्यायालय सदरकामी पुढील यथायोग्य हुकूम/आदेश होतील/करतील याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर समन्स आमचे सहीनिशी व मे.कोर्टाचे सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे.

तारीख : ३१/०१/२०२५

(गोल शिक्का)

सही/-
**सहा. अधीक्षक,**
उपविभागीय अधिकारी सोलापूर
क्र. १, सोलापूर

॥ जो जे वांछिल तो ते लाहो ॥

मनोरमा परिवार अंतर्गत

**ट्वीन सिटी अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर**

विमल कॉम्प्लेक्स, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर

६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर

९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क : ०२१७२३०३३१२

**दिपक सुरवसे** चेअरमन (९१७५१८३६९९)

**नितीन भोसले** व्हा. चेअरमन (९८८१५१५५३३)

**दिपमाला जाधव** व्यवस्थापिका (मो.८३२९२८७३१२)




# स्वामी समर्थ कारखाना कार्यस्थळावर लागली आग

**अक्कलकोट, दि. १ फेब्रुवारी-**

तालुक्यातील दहिटणे येथील स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर शनिवारी सायंकाळदरम्यान आग लागली. याची माहिती मिळताच श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे अग्निशामक वाहन तात्काळ पोहचल्याने मोठा अनर्थ टळला. अन्यथा १०० कोटींचा साखर कारखाना जळून खाक झाला असता.

कारखान्याच्या कार्यस्थळ परिसरातील कुसळाला आग लागल्याने सदरची आग ही वाढत जाऊन साखर कारखान्यापर्यंत पोहचू लागल्याचे कळताच कारखान्यासमोरील काही दुकान, हॉटेल चालक, तेथे कार्यरत असलेला सुरक्षा रक्षक बसवराज निंबाळे, कारखान्याचे अध्यक्ष संजीवकुमार सिद्रामप्पा पाटील यांनी नगरपालिका अग्निशामक वाहन उपलब्ध होण्याबाबत प्रयत्न केला. परंतु आज शनिवार सुट्टी असल्याने संपर्क होऊ न शकल्याने श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांना संपर्क साधल्याने त्यांनी तत्काळ न्यासाच्या अग्निशामक दलास संपर्क केला. न्यासाचे प्रशासनातील मुख्य संगणक लिपिक प्रसाद हुल्ले व अग्निशामक दल प्रमुख बिराप्पा व्हनझेंडे यांनी तत्काळ अग्निशामक दलाचे वाहन चालक सूरज कदमला पाठविले. यामुळे मोठा अनर्थ टळला.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLAIRED THAT MY OLD NAME IS **Mahesh Kumar** HAS BEEN CHANGED TO **Mahesh Bhardwaj**

Resi. - Flat No.306, Mayuresh Pride, Vasant Vihar, Avanti Nagar, Solapur - 413001

**KINDLY NOTE**
THE SAME. (2173 Dtd.01.02.2025)

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLAIRED THAT MY OLD NAME IS **Savita** HAS BEEN CHANGED TO **Savita Bhardwaj**

Resi. - Flat No.306, Mayuresh Pride, Vasant Vihar, Avanti Nagar, Solapur - 413001

**KINDLY NOTE**
THE SAME. (2172 Dtd.01.02.2025)

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

बार्शी तालुक्यातील तमाम लोकांना विशेषतः पिंपळगांव (पा) येथील व पंचक्रोशीतील लोकांना कळविणेत येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे पिंपळगांव (पा) येथील जमीन गट नं. १३१/३ यातील आमचे अशिल विश्वजित विनोद देशमुख अ.पा.क. विनोद भास्कर देशमुख, रा. पिंपळगांव (पा), ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे क्षेत्र ०१ हे. ६२ आर आकार ३ रु. ०२ पैसे यांसी चतुःसिमा- पूर्वेस- स.ग.नं. पैकी वर्षा विनोद देशमुख यांची जमीन, दक्षिणेस- स.ग.नं. पैकी आण्णासाो. भारत पवार यांची जमीन, पश्चिमेस- नदी, उत्तरेस- स.ग.नं. पैकी लक्ष्मण धर्मराज थिटे यांचे क्षेत्र. येणे प्रमाणे चतुःसिमापूर्वक झाडझुडूप तदंगभूत वस्तुसह.

येणेप्रमाणे जमीन आमचे अशिलांनी खरेदी देणेचे ठरवून इसारा दाखल रक्कम स्वीकारलेली आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचे काही हरकती खरेदी, बक्षीसपत्र, गहाण, दान, लिज, तारण वगैरे काही व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत आमचे खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात कळवावे, अन्यथा आमचे अशिल वरीलप्रमाणे ठरलेला खरेदी दस्ताचा व्यवहार कोणाची काही हरकत/आक्षेप नाही असे समजून पूर्ण करतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे. तारीख : ०१/०२/२०२५

सही/-
अशिलातर्फे ॲड.
**ॲड. प्रमोद भानुदास लोखंडे,**
मु.पो. घारी, ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९९२१४८७२८४

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णनः डि ।। व सब डि ।। सोलापुर पैकी, तालुका- उत्तर सोलापुर पैकी मौजे-कसबे सोलापुर येथील प्लॉटजागा त्यासी प्लॉट नं. १ याचे क्षेत्र ९८७.१२ चौ.मी. अथवा ०.०९.८७ आर चौ.मी. त्यासी जु.स.नं. १८५/१ब, न.स.नं. १७६/१ब असून याची चतुः सिमा, पुर्वेसः रस्ता, दक्षिणेसः प्लॉट नं. २, पश्चिमेसः प्लॉट नं. ८, उत्तरेसः रस्ता, अशा प्रकारच्या वर्णनाची प्लॉटजागा.

सदरची जागा हि आमचे अशिलांनी खरेदि करण्याचे ठरविले आहेत. तसेच सदरची जागा हि निर्वेध व निजोखमी असल्याची हमी विक्री करणार यांनी आमचे अशिलास दिली आहे. तथापी सदर जागे बाबत कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, ट्रान्सफर, लिज, लिन, इजमेंट राईट, कोर्टाची टाच, वित्तीय संस्थेचा बोजा, इतर बँकांचा बोजा वगैरे काही असल्यास सदर नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन ७(सात) दिवसाचे आत खालील पत्त्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात नोदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाची हरकती, तक्रारी न आल्यास आमचे अशिल सदरचा हस्तांतरणाचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहिर नोटिस दिली, ता. ०१/०२/२०२५.

सही/-
**ॲड. सागर अ. बेरुणगीकर**
बी. कॉम., एलएल. बी. (स्पे.), एम. बी. ए.
ॲडव्होकेट
गाळा नं. ६, पहिला मजला, सनशाईन अपार्टमेंट, ३९२,
दक्षिण सदर बझार, सोलापुर - ३
मो. नं. - ९८६०११६०३७
अशिलातर्फे ॲडव्होकेट



# समतेची माघवारी





सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
रविवार, २ फेब्रुवारी २०२५

**सोलापूर शहर व जिल्ह्यातील माघवारीला जाणाऱ्या सर्व दिंडीचे एकत्रीकरण अखिल भाविक वारकरी मंडळ यांच्या माध्यमातून २००९ रोजी करून प्रस्थान व रिंगण सोहळा सुरु करण्यात आला आहे. माघ शुद्ध षष्टीला श्री मार्कंडेय मंदिर, पंचकट्टा सोलापूर येथे दु. ४.00 वा. केले जात आहे. वारकरी प्रथे प्रमाणे नित्य नियमाचे अभंग व भजन केले जात आहे. त्यावेळी जे उपस्थित सर्व दिंडीतील विणेकरी महाराज व पदाधिकारी यांचा श्री सुरेश फलमारी पद्मशाली ज्ञाती संस्था, सोलापूर यांच्याकडून सन्मान केला जातो. नंतर हा पालखी सोहळा 'ज्ञानोबा तुकाराम' असे भजन करत नॉर्थकोट प्रशाला मैदान, सोलापूर येथे पोहोचतो आणि नंतर मान्यवर मंडळींच्या हस्ते अश्वपूजन केले जाते व मान्यवरांचा सन्मान केला जातो.**

तद्नंतर गोल रिंगण केले जाते. आषाढीवारी नंतर वारी परंपरेमध्ये फक्त माघवारीला सोलापूर येथे रिंगण सोहळा होतो, हे ऐतिहासिक आहे. शहरातील सर्व भागातील व सर्व समाजाच्या दिंडीला एकत्रित केले असून हा सोहळा एक परंपरा ठरत आहे. ज्या भाविकांना आषाढीवारी मध्ये जाऊन रिंगण पाहता येत नव्हते. त्या सर्व भाविकांना गोल रिंगण सोहळा सोलापूर शहरामध्ये ''याची देही याची डोळा'' अनुभवता येत आहे. हे सोलापूर भाविकांचे परम भाग्य आहे. शहरातील सर्व दिंडी प्रमुख व पदाधिकारी यांच्या प्रयत्नाने हे यश प्राप्त झाले आहे. नंतर हा सोहळा श्री महादेव मंदिर साठे चाळ, सोलापूर येथे पोहोचतो व नंतर आरती करून समारोप केला जातो .महादेव मंदिर भजनी मंडळ साठे चाळ यांचे कडून व्यवस्थापन केले जाते. यामध्ये शहरातील ३८ ईतर परिसरातील २५ दिंडी सहभागी होतात. शहरातील सर्व दिंडीला सो. म. पा. सोलापूर तर्फे वीणा भेट देऊन सन्मान करण्यात आला आहे. हा सोहळा पाहण्यासाठी हजारो महिला व पुरुष भाविक उपस्थित राहतात.

## सोलापूरचा ऐतिहासिक माघवारी

# गोलरिंगण सोहळा







हभप सुधाकर महाराज इंगळे



हभप संजय महाराज



हभप ज्योतीराम महाराज



हभप बळीराम महाराज

सोलापूर शहरातून तिऱ्हेमार्गे पंढरपूर जाणाऱ्या २३ दिंडी एकत्रित करून त्यामार्गे ही माघवारीतील दुसरे गोल रिंगण माघ शुद्ध अष्टमीला स. ९.३० वा. पाटकर वस्ती, कुरुल ता. मोहोळ येथे केले जात आहे. कुरुल ग्रामस्थ हे यजमान असतात. मोहोळ मार्गे जाणाऱ्या दिंडीतील व माघवारी तिसरे गोल रिंगण महात्मा गांधी विद्यालय, पेनूर येथे केले जात आहे. त्यासाठी पेनूर ग्रामस्थ यजमान असतात. चौथे गोल रिंगण माघ शुद्ध नवमीला सुस्ते ग्रामस्थ यांचे माध्यमातून श्री दत्त विद्यालय, सुस्ते ता. पंढरपूर येथे होत आहे. तसेच माघ शुद्ध दशमीला स. ९.३० वा. जलाराम मठा समोर, पंढरपूर येथे उभे रिंगण केले जाते. तसेच सुधाकर इंगळे महाराज (राष्ट्रीय अध्यक्ष ) यांच्या मार्गदर्शनाने संपन्न होत असून या सर्व कार्यक्रमासाठी जोतिराम चांगभले (प्रदेशअध्यक्ष ), बळीराम जांभळे (राष्ट्रीय सचिव), किसन कापसे (प्रदेश उपाध्यक्ष ), मोहन शेळके (प्रदेश सचिव), बंडोपंत कुलकर्णी (जिल्हा अध्यक्ष ), संजय पवार (शहरअध्यक्ष ), सचिन गायकवाड (शहर उपाध्यक्ष) व सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आसतात .

**- हभप सुधाकर इंगळे महाराज,**
**राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय वारकरी मंडळ, सोलापूर**

रिंगण सोहळ्याचे यंदा १३ वे वर्ष असून या सोहळ्यामध्ये महिलांचा सहभाग अधिक असतो. रिंगण आखताना आतल्या बाजूला एक गोल रिंगण आणि बाहेरच्या बाजूला एक गोल रिंगण केलेला असतं. आतील रिंगणामध्ये सर्व दिंडी प्रमुख, विणेकरी, पखवाज, तुळशी-टाळ घेतलेल्या महिला असतात. आतील रिंगणामध्य नामाचा गजर करत पाऊल खेळला जातो. बाहेरच्या रिंगणाच्या बाजूला भाविक अश्व पाहण्यासाठी, दर्शन घेण्यासाठी थांबतात. रिंगणामध्ये सुरुवातीला धावपट्टीवरून ध्वजधारी वारकरी भाविक धावतात. त्यानंतर पखवाजवादक वारकरी धावतात, त्यानंतर चोपदार, विणेकरी धावतात. त्यानंतर तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला भाविकही या रिंगणात प्रामुख्याने धावतात. त्यानंतरन मुख्य अश्वाचे रिंगण पूर्ण होतं आणि अश्वाच्या पायाखालची धूळ कपाळाला लावून वारकरी धन्य मानतो, अशा पद्धतीने रिंगण सोहळा पूर्ण होतो. रिंगण आखण्यासाठी महिलांचे सहकार्य लाभते. त्याच पद्धतीने विष्णुपंत मोरे अजय मोरे अनिकेत जांभळे चैतन्य मोरे यांचे ही सहकार्य लाभते.

**- बळीराम जांभळे,**
**राष्ट्रीय सचिव, अखिल भारतीय वारकरी मंडळ, सोलापूर**

### माघवारीनिमित्त सोलापूर शहरातून निघणाऱ्या विविध दिंड्या

**श्री संत हरळया समाजसेवा भजनी मंडळ जोड भावी पेठ (खणि)**

आमच्या समाजात हनुमान मंदिर आहे त्यामध्ये विठ्ठल रुक्मिणी मूर्ती व शिवलिंग आहे सालाबाद प्रमाणे आम्ही १९९३ पासून मागवारी दिंडी निवृत्ती महाराज यांच्या नेतृत्व खाली सुरुवात केली झाल्यावर मारुती मंदिरात नित्यनेम पूजा अर्चना होते तसेच वारीच्या जमा रकमेतून वर्षभरातील देवाची जयंती संतांच्या पुण्यतिथी सोहळा करत असतो. महाशिवरात्री रामनवमी श्रीकृष्ण जन्माष्टमी सप्ताह करत असतो. माघवारी दिंडीत १००० ते १२०० भाविक सहभागी होतात.३२ वर्षापासून दिंडी प्रमुख म्हणून नागनाथ महाराज शिंदे काम पाहतात.

**- नागनाथ महाराज शिंदे,**
**दिंडी प्रमुख विणेकरी**

### श्री संत मुक्ताई मंडळ

श्री संत मुक्ताई मंडळाची स्थापना १९८० साली ह.भ.प अनंत महाराज इंगळे यांनी केली. माघवारी निमित्त सोलापूर येथून संत मुक्ताई पालखी पायी दिंडी सोहळा सुरु केला . यामंडळाचे माध्यमातून अनेक कीर्तनकार तयार केले. प्रत्येक तीर्थ क्षेत्रामध्ये नाम सप्ताह करून वेगळी ओळख निर्माण केली . तसेच महिला प्रवचनकार ही तयार करून महिलांना सुद्धा स्वतंत्र व्यासपीठ निर्माण केले. तानाजी बेलेराव हे विणेकरी व किशोर धायगुडे हे चोपदार आहेत.

**- शंकर भोसले,**
**अध्यक्ष, श्री संत मुक्ताई मंडळ**

### हभप बाबूराव सातारकर भजनी मंडळ

श्री वैकुंठ ह भ प बाबुराव सातारकर भजनी मंडळ जुनी पोलीस लाईन मुराजी पेठ सोलापूर या भजनी मंडळाचे स्थापना १९५२ रोजी झाली. या मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताह राम राम जन्मोत्सव ते हनुमान जयंती जन्मोत्सव अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो. तसेच कृष्णजन्माष्टमी हा अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो. कार्तिक महिन्यामध्ये पहाटे पाच ते सात पर्यंत काकडा आरती चालू असते व तसेच रोज सायंकाळी पाच ते सात ज्ञानेश्वरी हरिपाठ रोज केला जातो. वसंत पंचमी पांडुरंगाचे लग्न सोहळा मंदिरामध्ये साजरा केला जातो तसेच रोजची देवाची पूजा देवाची पुजारी अनंत ढेरे महाराज करतात व आठवड्यातून मंगळवार एकादशी भजन मंदिरामध्ये होत असते. माघवारी दिंडी सोहळा १९५२ पासून एकूण २०२५ अखंड सोलापूर ते पंढरपूर पायी दिंडी वारी या मंदिरामधून शंभर लोक या दिंडीमध्ये सहभागी होत असतात. रस्त्याने अन्नदान व भजन करत पंढरपूरला दशमी एकादशी धुवादस त्रियोदशीला माघारी सोलापूरला प्रस्थान होत आहे. या मंडळामध्ये सतत कार्यक्रम चालू असतात चार ते पाच ग्रंथावरची पोथी चालू असते. या मंदिरामध्ये अखंड कार्यक्रम चालू असतात या कार्यक्रमाला या मंडळाचे अध्यक्ष किसन बापू कापसे व तसेच सचिव प्रकाश गोविंद सावंत आणि गायनाचार्य दत्तोबा वाघमारे श्रीकांत भोसले अनंत आप्पा कुलकर्णी प्रदीप ज्ञानेश्वर जाधव अरुण देशमुख राजाभाऊ लांडगे विशाल जाधव विशाल पवार आदिनाथ जावळे मंडळाचे महाराज हरिभाऊ जावळे आळंदी देशमुख अनंता ढेरे महाराज यांच्या सहकार्याने या मंदिरामध्ये कार्यक्रम उत्सव सहभागी होत असतात.

**- किसनबापू कापसे, अध्यक्ष, वैकुंठवासी हभप भजनी मंडळ, जुनी पोलीस लाईन, सोलापूर**

### वडार समाज भजनी मंडळ बुधवार पेठ सोलापूर

वै. ह. भ. प. लक्ष्मण धोत्रे महाराज १९१६ साली मंडळाची स्थापना केली. आजपर्यंत माघवारी अखंडपणे अविरत सुरूच आहे, धोत्रे महाराज यांनी एकनाथ अप्पा वासकर महाराज यांच्याकडून दीक्षा घेतली. त्या फडाचे अनुयायी झाले. ते उत्तम कीर्तनकार म्हणून त्यांच्या नावाची ख्याती झाली, दिंडी ही मोहोळ मार्गे प्रस्थान करते श्री ह. भ. प सूर्यकांत धोत्रे महाराज यांच्या नेतृत्वाखाली मोहोळ मार्गे दिंडी निघते, दिंडीचे विनेकरी नागेश पांडुरंग भांडेकर ह.भ. प निशांत धोत्रे व अभिमन्यू धोत्रे दिंडी चे चोपदार म्हणून दिंडीचे कर्तव्य बजावत असतात, आणि पखवाज वादक, श्री ह. भ. प हिरालाल कलकेरी , किरण कुलकर्णी माघ शुद्ध दशमी दिवशी वै. ह. भ. प. लक्ष्मण महाराज धोत्रे यांची पुण्यतिथी असते. त्या दिवशी श्री ह. भ. प सूर्यकांत धोत्रे महाराज यांची कीर्तनाची सेवा असते.

### हनुमान मंदिर जुनी लक्ष्मीमिल चाळ मंडळ

हनुमान मंदिर जुनी लक्ष्मी मिल चाळ डोणगाव रोड ७७ वर्षापासून माघवारी पायी दिंडी सोहळा आजतागायत सुरू आहे या दिंडी सोहळ्याची सुरुवात ह.भ.प.वै. निवृत्ती (दादा) लोंढे त्यांची आई वै. कृष्णामाई लोंढे यांनी केली त्यावेळी मिल-मधील कांही कामगारांना घेवून या दिंडी सोहळ्यास सुरुवात केली.तीर्थयात्र सुखे जावू । वाचे विठ्ठल नाम घेऊ । या विठ्ठल नामाच्या निष्ठेने दिंडी सोहळा सुरू झाला याला पुढे अनेकांचे सहकार्य लाभले. चाळीतील वारकरी ग्रामीण भागातील वारकरी अनेक जणांचा सहभाग यामधे वाढू लागला.परंतु या दिंडी सोहळ्यात ह.भ.प.वै. ज्ञानेश्वर काका लोंढे यांचा परिवार त्यांच्यामागे वै. विवेकानंद लोंढे व सध्या दिंडी प्रमुख चालक असणारे मी. गोपाळ लोंढे (सर) वामन लोंढे, चैतन्य लोंढे हे सर्व हा दिंडी सोहळा अतिशय निष्ठेने चालवत आहेत. पंढरीची वारी आहे माझे घरी । आणिक न करी तीर्थव्रत । या तुकाराम महाराजांच्या देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो अभंगाला अनुसरून अनंत समस्या अडचणींना तोंड देत परिवार ही वारी करीत आहे. त्यांना ह.भ.प. श्री रामचंद्र महाराज कोळी (धाराशिवकर) व त्यांचे भजनी मंडळ कासेगावकर भजनी मंडळ तसेच मेडसिंगा ग्रामस्थ आणि समस्त लोंढे परिवार अतिशय निष्ठेने साथ करीत आहेत.

### सद्गुरू गेनूबुवा संतसेवा मंडळ

माघवारी पायी दिंडी सोहळा वर्ष १०८, या मंडळाची सुरुवात १९१७ रोजी सद्गुरू ह.भ.प. गेनू बुवा ज्योती वाघमारे यांनी केली होती. तेव्हा पासून आत्ता पर्यंत ही परंपरा चालू आहे, यादिंडी सोहळ्यात काकडा,प्रवचन,हरी पाठ, व जागर असे कार्यक्रम असतात,शिवाय आमच्या मंडळाच्या वतीने कार्तिक स्नान काकडा आरती,,श्री राम जनमोस्त्व निमित्त गुडी पाडवा ते राम नवमी अखंड हरिनाम सप्ताह, व सर्व संताच्या पुण्यतिथी , व खूप काही सामाजिक कार्य होत असते,आता या दिंडी सोहळा चालख म्हणून मी व आमचे माता नवरात्र महोत्सव तरुण मंडळाचे कार्यकर्ते असे सर्वजण एकत्र मिळून हा दिंडी सोहळा व सप्ताह साजरा करत असतो.

### श्री हनुमान मंदिर सलगरवस्ती माघवारी दिंडी

सन १९४० मध्ये वैकुंठवासी हरिभक्त परायण निवृत्तीबुवा भोसले यांनी स्वखर्चातून मंदिर बांधून दिले व वैकुंठवासी हरिभक्त परायण कोकाटे महाराज यांनी मूर्ती भेट दिली याप्रमाणे म्हणजे स्थापना करण्यात आली. सुरुवातीच्या काळात सलगर वस्ती मधून गुरुवर्य श्री हरिभक्त परायण राशिनकर महाराज यांचे मार्गदर्शनाखाली सण १९७३ पासून माघवारी पायी दिंडी सोहळ्यास सुरुवात झाली. त्यावेळी वैकुंठवासी ह.भ.प. शामराव कारंडे गुरुजी, वैकुंठवासी ह.भ.प. रामभाऊ शिंदे, ह.भ.प. सूर्यभान चव्हाण वैकुंठवासी ह.भ.प. नागनाथ गौर, वैकुंठवासी ह.भ.प. बाबुराव दवले, यांचेसह ह.भ.प. ज्ञानेश्वर भागवत, ह.भ.प. बबन जगताप चंद्रकांत घुले, विष्णू घुले, ह.भ.प. परायण पंढरीनाथ कोकाटे, ह.भ.प. रमेश जगताप, चंद्रकांत झांबरे यांच्यासह दिंडी सोहळा चालू होता. सध्या पायी दिंडी सोहळ्याची परंपरा ह.भ.प. नारायण माने, ह.भ.प. सोमनाथ चोरमुले, ह.भ.प. तुकाराम माशाळ, ह.भ.प. सुनील चव्हाण, श्रीरामलिंग वाकसे ह.भ.प. रघुनाथ सुरवसे, ह.भ.प. ज्योतीराम चांगभले, विनोद गौर, श्रीकांत भागवत, रोहन येडगे यांनी सदरची परंपरा चालू ठेवली आहे. यादिंडी मधील वारकऱ्यांना कुठल्याही प्रकारची आर्थिक खर्च करावा लागू नये, यासाठी मंदिर समितीने सर्व वारकऱ्यांना दिंडी सोहळ्यामध्ये कुठल्याही प्रकारचा खर्च करावा लागू नये यासाठी प्रयत्न करत केले जात आहे.

### श्री कृष्ण भजनी मंडळ, निराळेवस्ती

सोलापूर श्रीकृष्ण भजनी मंडळ सोलापूर ते पंढरपूर पायीवारी दिंडी सोहळा २२ वर्षे कार्यरत आहे. या पायी दिंडी सोहळ्यामध्ये धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात आहोत. अंध व अपंग यांना आर्थिक मदत व अन्न दान करीत आहोत. हरिपाठ प्रवचन, कीर्तन, हरिजागर अनेक कीर्तनकारला सहभागी करून घेत आहोत. धार्मिक कार्यक्रमाचा प्रसार करीत आहोत. प्रत्येक युवकला कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करीत आहोत. अशी ह्या मंडळाची परंपरा जपत आहोत तसेच भागवत कथा आणि राम कथा या माध्यमातून जनजागृती करत आहोत.

**- हभपभानुदास बचुटे,**
दिंडीचालक, श्री कृष्ण भजनी मंडळ, निराळे वस्ती, सोलापूर

### श्री संत नामदेव विठ्ठल मंदिर ट्रस्ट

**हिच व्हावी माझी आस ।**
**जन्मोजन्मी तुझा दास ।।**
**पंढरीचा वारकरी ।**
**वारी चुको न दे हरी ।।**

या अभंगवानी प्रमाणे समर्थ सद्गुरू श्री विरनाथ मल्लनाथ महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज व सद्गुरू श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या आधीपत्या खाली आपल्या श्री नामदेव विठ्ठल मंदिर चा माघवारी परंपरा सन १९६१ सालापासून वै. ह. भ. प. दगडोबा बुवा होमकर व वै. ह. भ. प. शिवशंकर (आप्पा) निकते यांच्या मार्गदर्शनाने माघ वारी दिंडीची परंपरा सुरू झाली होती. विश्वस्त अध्यक्ष मुरलीधर रेळेकर तसेच संस्थेचे विश्वस्त आणि मार्गदर्शक राजा होमकर यांच्य नेतृत्वाखाली दिंडी सोहळा आयोजित केला जातो. त्यात सेवेकरी म्हणून पतंगे, रेळेकर,ढवळे, बोंडगे, पिसे, सर्वदे,बाचाल,उपरे, निकते व अनेक समाजबांधव दिंडीत सहभागी होतात. दिंडीचे नेतृत्व अरुण होमकर,अनिल बोंडगे, नामदेव बाचल हे करतात. पंढरपूर मुक्कामी वारकऱ्यांची मोफत औषध उपचारांची सेवा २५ वर्षापासून राजा होमकर यांची अखंडित चालू आहे. या परंपरेत समर्थ सद्गुरु गुरुबाबा महाराज यांचे द्वादशी चे कीर्तन संपन्न झाल्यानंतर सद्गुरूंच्या हस्ते मानाचे श्रीफळ घेवून वारकऱ्यांचा सन्मान केला जातो. त्रयोदशी दिवशी सद्गुरू गुरूबाबा यांच्या चक्रिभजनचा प्रसाद रुपी आशीर्वाद घेतात आणि श्री. विठ्ठल रुक्मिणी मातेचे मंदिरात दर्शन घेवून वारकरी परतीच्या वाटेला लागतात.

**-दास पतंगे,**
सचिव, संत नामदेव विठ्ठल मंदिर ट्रस्ट, सोलापूर

### सद्गुरू बाजीअण्णा महाराज मंडळ

स्वामी काज गुरु भक्ती पितृ वचन सेवा पती!हेची विष्णुची महापूजा!!असं तुकोबाराय सांगतात तशी विशेष गुरुभक्ती, गुरुनिष्ठा दिसून येते ती आमच्या सद्गुरू बाजी अण्णा महाराज गुरु भक्त मंडळाकडे आमच्या माघवारीची परंपरा इतकी उज्वल आहे की, जागतिक कोरोना महामारीचं संकट सुद्धा आमची वारी थांबवू शकलं नाही. त्याही काळात जाता - येता पायी वारी पूर्ण अबाधितपणे पार पडली. सोलापूरचं वारकरी वैभव ह.भ.प. सुधाकर महाराजांच्या सबळ पाठींब्यामुळे ही वारी आम्ही निष्ठेने न घाबरता पार पाडू शकलो. वारी खंडीत झाली नाही. याचा धरीन अभिमान!करीन आपुले जतन!!आताही वडजी, येणकी, सलगरवस्ती, वारद चाळ,संगमेश्वर नगर,पुणे, मुंबई ज्या ज्या ठिकाणी शिष्य सांप्रदाय आहे तिथून वारीसाठी हजर राहून वारी पार पाडली जाते.गुरुवर्य ह. भ. प. नामदेव महाराज देवकते यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व बजरंग जाधव यांच्या नेतृत्वामध्ये २०२४ पासून हा सोहळा पूर्णपणे विनामूल्य झाला आहे.फार मोठ्या वैभवामध्ये निष्ठेने वारी पार पाडण्यासाठी तरुण पिढीचं योगदान खूप मोठं आहे.देवाकडे एकच विनंती की अशी वारी आमच्याकडून आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत घडावी, पुढच्याही जन्मी याच वारकरी कुळामध्ये जन्म मिळावा व वारी चालू रहावी. पंढरीचा वारकरी, वारी चुको नेदी हरी!

**-बजरंग जाधव,**
सद्गुरु, बाजी अण्णा महाराज मंडळ

### श्री संत दिगंबर महाराज भजनी मंडळ सेटलमेंट, सोलापूर

श्री संत दिगंबर महाराज भजनी मंडळ यांच्या दिंडीची परंपरा ह.भ.प वै.विश्वास महाराज गायकवाड यांचे आजोबा वै.दिगंबर महाराज (तुळजाराम) गायकवाड यांच्या परंपरेतून विश्वास महाराज गायकवाड यांच्याकडे आली. श्रीगुरु वै.गु.दादासाहेब म ाफरे महाराज यांचा अनुग्रह हभप वै.विश्वास महाराज गायकवाड यांना होता. हभप वै.(तुळजाराम) दिगंबर महाराज यांनी २१ दिवस अनुष्ठान करून अनुष्ठानानंतर अन्न पाण्याचा त्याग करून त्यांनी परमार्थिक वारसा निर्माण केला. दिंडीची परंपरा चालू केली ते शिवभजन करायचे शिव भजन केल्यानंतर त्याचं सांप्रदायात रूपांतर होऊन विश्वास महाराजांनी गेल्या ७५ वर्षापासूनची दिंडीची परंपरा पुढे चालू ठेवलेली आहे. त्यानंतर स्वतः रामकृष्ण हरी मंदिर सेवा प्रतिष्ठान स्थापन करून तिथे पांडुरंग रुक्मिणी श्रीकृष्ण आणि श्रीरामाच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून त्या दिंडीचे वैभव वाढवून स्वतःची दिगंबर महाराजांची दिंडी परंपरा चालू आहे . वडिलांची रीत जाणतसो या न्यायाप्रमाणे माझ्या वडिलांची मिरासी गा देवा तुझी चरणसेवा पांडुरंगा आज विश्वास महाराज यांचे सुपुत्र हभप सचिन महाराज गायकवाड व कनिष्ठ बंधू हभप नागनाथ महाराज गायकवाड हेही या दिंडीच्या व्यवस्थेबद्दल तत्पर असून इतर सर्व समाजाला आपल्या समाजाचा उद्धार व्हावा या दृष्टिकोनातून सेटलमेंट भागातील कैकाडी समाजाला घेऊन पंढरपूर वारी घडावी आणि भक्ती मार्गाला लावावं अशा पद्धतीची तळमळ करून विश्वास महाराजांनी चालू केलेली ही परंपरा आहे ती आज चालू आहे उत्तर उत्तर मंदिराचा सुद्धा उत्कर्ष होत आहे आणि मंदिरात नित्यनेमाने दर गुरुवारी भजन आणि दोन्ही एकादशी ,विनायक चतुर्थी असे कार्यक्रम सतत पार पडत असतात दरवर्षी देवाच्या वाढदिवसानिमित्त वार्षिक सप्ताह तुकाराम बीज ते नाथ षष्ठी पर्यंत होतो अशाच परंपरेतून उत्कर्षाकडे निघालेले हे श्री संत दिगंबर महाराज भजनी मंडळाची दिंडी संस्था सोलापूर मध्ये कार्यरत आहे.

**- हभप वै. विश्वास महाराज गायकवाड,**
संस्थापक, श्रीसंत श्री संत दिगंबर महाराज भजनी मंडळ

**संकलन : यशवंत गुरव, मो.८८८८६५०७५५**



### श्री विठ्ठल मंदिर मातंग समाज ट्रस्ट, भजनी मंडळ एसटी स्टँड

मातंग समाजातील धार्मिक परंपरा जपणाऱ्या वारकरी बांधवानी या मंदिराची स्थापना १७९४ मध्ये केली म्हणजेच २३१ वर्षांपूर्वी या मंडळाची स्थापना झाली ब्रिटिश काळापासून सोलापूर ते पंढरपूर माघारी पायी चालत जाण्याची परंपरा सुरू झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मोठ्या प्रमाणात याला स्वरूप प्राप्त झाले यामध्ये प्रामुख्याने ह.भ.प.परशुराम रणदिवे महाराज, ह.भ.प.मारुती साठे महाराज,ह.भ.प कृष्णाजी रणदिवे ह.भ.प.माधव वाघमारे, ह.भ. प. सिद्राम जाधव, ह.भ.प.बलभीम जाधव, ह.भ.प सौदागर कसबे,. ह.भ.प माधव जाधव,ह.भ.प.सिताराम कसबे इ. मंडळींचा सहभाग होता. कालांतराने धर्मादाय आयुक्तांकडे याची नोंद केल्यानंतर बाळकृष्ण जाधव हे चेअरमन म्हणून काम पाहू लागले. सध्या या मंडळाची धुरा ह.भ.प.नामदेव रणदिवे महाराज हे दिंडी प्रमुख व विणेकरी म्हणून दिंडी सांभाळत आहेत. चोपदार म्हणून सुरेश लोखंडे हे काम पाहतात.

**-अमरनाथ जाधव,**
**ट्रस्टी चेअरमन, श्री विठ्ठल मंदिर मातंग समाज ट्रस्ट**



### पाणीवेस भजनी मंडळ

पाणीवेस दिंडीची सुरुवात होऊन ७४ वर्षे झाली. दिंडीची सुरुवात ह. भ. प. नरहरी पौळ, ह. भ.प दगडोबा घोडके, ह.भ. प. लिंबाजी डुरे, बाबुराव डोके, बबन मोरे, सौदागर मोरे, मुकुंद देशमुख, सोपान सावंत,यांनी केली. यानंतर आता उत्तम मोरे, प्रभूभाऊ मोरे,हरी मोरे, रामदास डोके,सोमा जनगवळी, नागनाथ पवार, गणेश वारे ही परंपरा पुढे नेत आहेत. सध्या ह.भ. प. गणेश वारे हे दिंडी प्रमुख म्हणून वारसा पुढे नेत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचा क्रीडा सप्ताह उत्साहात

**सोलापूर :** केगाव येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात क्रीडा सप्ताह उत्साहात पार पडला. यात जवळपास ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

उद्घाटन कॅम्पस डायरेक्ट संजय नवले यांनी केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. रवींद्र व्यवहारे, प्रो. करीम मुजावर उपस्थित होते. क्रीडा सप्ताहात सांघिक सहा आणि वैयक्तिक नऊ अशा १५ प्रकारात क्रीडा सप्ताह पार पडला. व्हॉलीबॉल मुलांमध्ये एईसीएच (एस वाय अ) प्रथम तर सिव्हिल विभागाने द्वितीय क्रमांक पटकावला. मुलींमध्ये ईएलईसी विभाग प्रथम तर रामानुजन विभाग उपविजेता ठरला. फुटबॉलमध्ये मुलांत एमईसीएच प्रथम तर ईएनटीसी विभाग उपविजेता ठरला. मुलींमध्ये सीएसई विभाग प्रथम तर ईएनटीसी विभाग उपविजेता ठरला. कबड्डीमध्ये मुलांत एम ईसीएच (एसवाय अ) प्रथम तर एमईसीएच (टीवाय) उपविजेता ठरला. मुलींमध्ये कल्पना विभाग प्रथम तर एमईसीएच उपविजेता ठरला. हॉकीमध्ये मुलांत ईएनटीसी प्रथम तर एमईसीएच विभाग उपविजेता ठरला. मुलींमध्ये सीएसई प्रथम तर एमईसीएच उपविजेता ठरला. क्रिकेट मुलींमध्ये सीएसई विजेता तर ईएनटीसी उपविजेता ठरला. खो-खो खेळात मुलीत सीएसई प्रथम तर कल्पना विभाग उपविजेता ठरला. क्रीडा समन्वयक प्रो. करीम मुजावर, प्रशांत, विद्यार्थी क्रीडा सरचिटणीस अभिजित चव्हाण, क्रीडा सचिव महेश घोगे, क्रीडा सहसचिव म्हणून अमर नवले, प्राजक्ता सोनटक्के यांनी यासाठी परिश्रम घेतले.

## मिहिर आम्ब्रे, ऋषभ दासला सुवर्णपदक

**हलद्वानी :** ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील जलतरणात महाराष्ट्राच्या ऋषभ दासने २०० मीटर बॅक स्ट्रोक्स प्रकारात सुवर्णपदकाची कमाई केली, तर मिहिर आम्ब्रेने ५० मीटर फ्री स्टाईल प्रकारात सोनेरी यश संपादन केले. प्रतिष्ठा डांगी हिने महिलांच्या २०० मिटर बॅक स्ट्रोक प्रकारात, तर अवंतिका चव्हाणने ५० मिटर फ्री स्टाईलमध्ये रुपेरी यश संपादन केले. इंदिरा गांधी इंटरनॅशनल स्टेडियममधील जलतरण तलावात महाराष्ट्राने पदकाची लयलूट केली. ऋषभ दासने २०० मिटर बॅक स्ट्रोक प्रकारात २ मिनिटे ३.३४ सेकंद वेळेसह सुवर्ण पदकावर नाव कोरले. तमिळनाडूचा निथिक नाथेल्ला रौप्य, तर गुजरातचा देवांश परमार मानकरी ठरला.मिहिर आम्ब्रेने ५० मिटर फ्री स्टाईल प्रकारात २४.२९ सेकंदात बाजी मारत सुवर्ण पदकाला गवसणी घातली. कर्नाटकचा श्रीहरी नटराज रौप्य, तर तमिळनाडूचा जोशुआ थॉमसने कांस्यपदक जिंकले. महिलांच्या गटात प्रतिष्ठा डांगीला दोन सेकंदाच्या फरकाने रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. ■

# क्रीडा अर्थसंकल्पात ३५१.९८ कोटींची वाढ

◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी शनिवारी येथे सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात क्रीडा आणि व्यवहारांसाठीच्या तरतुदीत ३५१.९८ कोटी रुपयांची भरीव वाढ करण्यात आली. एकूणच, युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाला ३,७९४.३० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

या अर्थसंकल्पात सर्वाधिक वाटा हा तळागाळातील खेळाडूंना शोधण्यासाठी व त्यांचे संगोपन करण्यासाठी सरकारच्या प्रमुख खेलो इंडिया उपक्रमाला मिळाला आहे.

या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी २०२५-२६ आर्थिक वर्षासाठी १,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. २०२४-२५ मध्ये ८०० कोटी रुपयांच्या अनुदानापेक्षा हे २०० कोटी रुपये जास्त आहे.

पुढील एका वर्षांत ऑलिम्पिक, राष्ट्रकुल किंवा आशियाई क्रीडा स्पर्धांसारख्या कोणत्याही मोठ्या क्रीडा स्पर्धा होणार नाहीत हे लक्षात घेता ही वाढ लक्षणीय आहे.

**खेलो इंडियाला सर्वाधिक वाटा**



**राष्ट्रीय क्रीडा महासंघांच्या मदतनिधीत किंचित वाढ**

- राष्ट्रीय क्रीडा महासंघांना देण्यात येणाऱ्या मदतीसाठी देण्यात येणाऱ्या रकमेतही ३४० कोटी रुपयांवरून ४०० कोटी रुपयांपर्यंत किंचित वाढ करण्यात आली आहे.
- सध्या २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी महत्त्वाकांक्षी प्रयत्न करत आहे, त्यासाठी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीला एक स्पर्धेच्या यजमानपदासाठीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
- राष्ट्रीय शिबिरे आयोजित करण्यासाठी व खेळाडूंच्या प्रशिक्षणासाठी लॉजिस्टिक व्यवस्था करण्यासाठी नोडल संस्था असलेल्या भारतीय क्रीडा प्राधिकरणासाठीची (साई) तरतूद ८१५ कोटी रुपयांवरून ८३० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे.
- देशभरातील स्टेडियमची देखभाल व वापर करण्याची जबाबदारीही भारतीय क्रीडा प्राधिकरणाकडे आहे.

**राष्ट्रीय उत्तेजक विरोधी संस्थेच्या निधीत २४.३० कोटी रुपयांपर्यंत वाढ**

- राष्ट्रीय उत्तेजक विरोधी संस्थेचे (नाडा) बजेट २०.३० कोटी रुपयांवरून २४.३० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आले आहे. राष्ट्रीय उत्तेजक चाचणी प्रयोगशाळेसाठीही अशीच वाढ जाहीर करण्यात आली आहे. या आर्थिक वर्षात राष्ट्रीय उत्तेजक चाचणी प्रयोगशाळेला २३ कोटी रुपये मिळतील. २०२४-२५ मध्ये या प्रयोगशाळेला १८.७० कोटी रुपये देण्यात आले होते.

**खेळाडूंच्या प्रोत्साहन अनुदानात कपात**

- १९९८ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय क्रीडा विकास निधीतील योगदान सलग दुसऱ्या वर्षी १८ कोटी रुपये राहील, तर सरकारने खेळाडूंना प्रोत्साहन अनुदान ४२.६५ कोटी रुपयांवरून कमी करून या वर्षी ३७ कोटी रुपये करण्याचा निर्णय घेतला आहे.
- राष्ट्रीय युवा व किशोर विकास कार्यक्रम आणि युवा वसतिगृहांसाठीच्या निधीतही कपात जाहीर करण्यात आली. तथापि, संस्था व युवा देवाण-घेवाण उपक्रमांसाठीचे योगदान ११.७० कोटी रुपयांवरून ५५ कोटी रुपये करण्यात आले आहे.
- जम्मू-काश्मीरच्या क्रीडा सुविधांसाठी २० कोटी रुपयांची तरतूद
- जम्मू आणि काश्मीरमधील क्रीडा सुविधांच्या वाढीसाठी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, जो मागील वर्षापेक्षा १४ कोटी रुपये जास्त आहे.

**राष्ट्रीय सेवा योजनेच्या निधीत २०० कोटींनी वाढ**

- वाढीव अर्थसंकल्पाचा मोठा भाग राष्ट्रीय सेवा योजनेत जाईल. या योजनेसाठी ४५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून ही मागील वर्षापेक्षा २०० कोटी रुपये जास्त आहे.
- राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) शाळा व महाविद्यालयांमधील तरुणांचे चारित्र्य व व्यक्तिमत्त्व विकसित करणे हे उद्दिष्ट ठेवते. ही एक योजना असून या माध्यमातून सामाजिक कार्य आणि सामुदायिक सेवेद्वारे तरुणांना घडवण्यासाठी कार्य करते. ◀(वृत्तसंस्था)

# भारत विजयासह शेवट करण्यास उत्सुक

**भारत-इंग्लंड पाचवा टी-२० सामना आज**

**स्थळ :** वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ :** सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

◆ **मुंबई, १ फेब्रुवारी**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील पाचवा व शेवटचा सामना रविवारी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. हा सामना स्थानिक वेळेनुसार सायंकाळी ७ वाजतापासून सुरू होणार आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने इंग्लंडविरुद्धची पाच सामन्यांची ही टी-२० मालिका आधीच ३-१ ने जिंकलेली आहे. आता वानखेडेवरील शेवटचा सामना औपचारिकता असेल.



शुक्रवारी चौथ्या टी-२० सामन्यात हार्दिक पांड्या व शिवम दुबेच्या झंझावाती अर्धशतकानंतर गोलंदाजांच्या प्रभावी कामगिरीच्या बळावर भारताने इंग्लंडवर १५ धावांनी विजय नोंदविला. इंग्लंडला १६६ धावांत गुंडाळताना लेगस्पिनर रवी बिश्नोई (३-२८), वरुण चक्रवर्ती (२-२८) व हर्षित राणाने (३-३३) प्रभावी गोलंदाजी केली.

भारतीय संघ विजयाची हीच लय वानखेडे स्टेडियमवर कायम ठेवण्यास उत्सुक असेल. भारताने वानखेडेवर पाच टी-२० पैकी तीन सामने जिंकले आहेत. इंग्लंडने वानखेडेवर तीन सामने खेळले आहेत, त्यांनी २०१२ मध्ये भारताला हरवले आहे आणि २०१६ च्या विश्वचषकात अनुक्रमे दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीजविरुद्ध एक विजय आणि एक पराभव नोंदवला आहे. ◀(वृत्तसंस्था)

# भारताचे सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावण्याचे लक्ष्य

### १९ वर्षांखालील महिला टी-२० विश्वचषक

◆ **क्वालालम्पूर, १ फेब्रुवारी**



येथे आयोजित १९ वर्षांखालील महिलांच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत रविवारी गत विजेता भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यान अंतिम फेरीचा सामना खेळला जाणार आहे. स्पर्धेत आतापर्यंत अपराजित राहिलेल्या भारतीय संघाने सलग दुसऱ्यांदा विजेतेपद जिंकण्याचे लक्ष्य ठेवलेले असून त्याकरिता संघ सामन्याची जबरदस्त सुरुवात करण्यास उत्सुक आहे.

भारताने आतापर्यंत स्पर्धेत आपले सर्व सामने जिंकून वर्चस्वपूर्ण कामगिरी केली आहे. निकी प्रसादच्या नेतृत्वाखालील संघ सर्व विभागांमध्ये जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. भारताने वेस्ट इंडीज (९ गड्यांनी), मलेशिया (१० गड्यांनी), श्रीलंका (६० धावांनी), बांगलादेश (८ गड्यांनी), स्कॉटलंड (१५० धावांनी) आणि इंग्लंड (उपांत्य सामन्यात ९ गड्यांनी) आदी संघांवर वर्चस्व गाजवले आहे. भारताची सलामीवीर त्रिशा गोंगाडीने सहा डावांमध्ये २६५ धावा करून स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारी फलंदाज आहे. तिच्या पाठोपाठ तिची डावखुरी सलामीची जोडीदार जी. कमलिनी आहे. तिने सहा डावात ४५ च्या सरासरीने १३५ धावा करून यादीत तिसऱ्या स्थानावर आहे.

गोलंदाजीतही भारतीय संघ आघाडीवर आहे. वैष्णवी शर्मा आणि आयुषी शुक्ला ही डावखुरी सलामीची जोडी बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानावर आहे. वैष्णवीने १५ बळींसह आघाडी घेतली, आयुषीने १२ बळी घेतले आहेत.

**भारत वि. दक्षिण आफ्रिका अंतिम सामना आज**

**स्थळ :** बायुमास ओव्हल, क्वालालम्पूर
**वेळ :** दुपारी १२.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

दुसरीकडे, दक्षिण आफ्रिकेने उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियावर पाच गड्यांनी प्रभावी विजय मिळवून पहिल्यांदाच विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. जेतेपदाच्या मार्गावर असलेल्या भारतीयांना पराभूत करण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. ◀(वृत्तसंस्था)

# विदर्भ-हैदराबाद लढत रोमांचक वळणावर

### करुण नायरचे शतक, हर्ष दुबेचे अर्धशतक ● हैदराबादला विजयासाठी १९७ धावांची गरज

**रणजी करंडक**
**एलिट गट ब सामना**

◆ **नागपूर, १ फेब्रुवारी**

विदर्भ क्रिकेट संघटनेच्या सिव्हील लाईन्स स्टेडियमवर सुरु असलेली विदर्भ व हैदराबाद संघादरम्यानचा रणजी करंडक एलिट गट बचा अखेरचा साखळी सामना निर्णायक वळणावर पोहोचला आहे. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी जोरदार मुसंडी मारत विदर्भाने दुसऱ्या डावांत ९५.२ षटकांत सर्वबाद ३५५ उभारल्या आणि हैदराबादसमोर विजयासाठी २२० धावांचे लक्ष्य ठेवले. दिवस अखेर हैदराबादने ६ षटकांत १ बाद २३ धावा केल्या.





विदर्भाच्या वेगवान मध्यम गोलंदाज यश ठाकूरने सलामीवीर तन्मय अग्रवालला (६) लवकरच बाद करून विदर्भाच्या विजयाचा इरादा स्पष्ट केला.

रविवार सामन्याचा शेवटचा दिवस असून हैदराबादला विजयासाठी आणखी १९७ धावांची गरज आहे, तर विदर्भाला हैदराबादचे उर्वरित ९ फलंदाज झटपट बाद करण्याची आवश्यकता आहे. आता विदर्भाच्या विजयाची घोडदौड कायम राखण्याची मदार गोलंदाजांवर आहे.

विदर्भाचा पहिला डाव १९० धावांत आटोपल्यानंतर प्रत्युत्तरात हैदराबादने ३२६ ठोकून पहिल्या डावांत १३६ धावांची आघाडी मिळविली होती. मात्र विदर्भाने दुसऱ्या डावात आपल्या फलंदाजीत चांगली सुधारणा केली व सामन्यात जोरदार मुसंडी मारली. विदर्भाने २ बाद ५६ धावांवरून पुढे तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली.

विशेषतः करुण नायरच्या शतकी व हर्ष दुबेच्या अर्धशतकी खेळीने पिछाडी भरून काढत विदर्भाला सुस्थिती प्राप्त करून दिली. करुण नायरने १९३ चेंडूंत १४ चौकार व एका षट्कारसह १०५ धावांची, हर्ष दुबेने ६५ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारसह ५५ धावांची खेळी केली. पार्थ रेखडेने ४१ चेंडूंत ६ चौकारांच्या मदतीने ३१ धावांची भर घातली. ◀(वृत्तसंस्था)

## प्रज्ञानंदची कारुआनावर मात

**टाटा स्टील बुद्धिबळ**

◆ **विज्क आन झी, १ फेब्रुवारी**

येथे सुरु असलेल्या टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धेत शुक्रवारी अकराव्या फेरीत जागतिक विजेता डी गुकेशने चीनच्या वेई यीला सहज बरोबरीत रोखले व आपली अर्ध्या गुणांची आघाडी कायम ठेवली, तर आर. प्रज्ञानंदाने अव्वल मानांकित अमेरिकन फॅबियानो कारुआनाला पराभवाचा धक्का देत आघाडीचे स्थान मिळविले.

गुकेशने सुरुवातीच्या टप्प्यात आपला मध्यवर्ती प्यादा पुढे करून नवीन योजना आखली व वेई यीला ३० चालींमध्ये लढत बरोबरीत ठेवण्यास भाग पाडले. या बरोबरीमुळे गुकेशने ११ पैकी ८ गुणांची झेप घेतली.

दरम्यान, प्रज्ञानंदाने काळ्या तुकड्यांमधून कारुआनाला चकित करून आपली गुणसंख्या ७.५ वर नेली. कारुआनाने ३२ व्या चालीत एक मोठी चूक केली, त्यामुळे पाच चालींनंतर प्रज्ञानंदला आणखी एक विजय मिळाला.

इतर भारतीयांसाठीही चांगला दिवस राहिला. पी. हरिकृष्णाने सर्बियाच्या ॲलेक्सी सराणाचा, तर लिओन ल्यूकने स्लोव्हेनियाच्या व्लादिमीर फेडोसेव्हचा पराभव केला. ◀(वृत्तसंस्था)

## आर्या-रुद्रांक्षला मिश्र दुहेरीत रौप्यपदक

**हलद्वानी :** ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत वैयक्तिक विभागात रौप्यपदक जिंकणाऱ्या आर्या बोरसे व रुद्रांक्ष पाटील या महाराष्ट्राच्या जोडीने येथे नेमबाजी मधील १० मीटर रायफल मिश्र दुहेरीत रौप्यपदक पटकाविले. स्पर्धेत या दोघांचे हे सलग दुसरे रूपेरी यश आहे. महाराणा प्रताप क्रीडा संकुलातील त्रिशूल शूटिंग रेंजवर रंगलेल्या १० मीटर रायफल मिश्र दुहेरीच्या लढतीत आर्या - रुद्रांक्ष या जोडीने पंजाबच्या ओजस्वी ठाकूर व अर्जुन बबुटा या जोडीला चिवट लढत दिली . मात्र, पंजाबच्या जोडीने महाराष्ट्राच्या जोडीवर १६-१२ असा विजय संपादन करीत सुवर्णपदकावर नाव कोरले. ■

## साईराज परदेशीला भारोत्तोलनात कांस्य

**डेहराडून :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या नाशिकच्या साईराज परदेशी याने वेटलिफ्टिंग मधील ८१ किलो गटात कांस्यपदकाची कमाई केली. या स्पर्धेतील त्याचे पहिलेच पदक होय.

एक आठवड्यापूर्वी तापाने आजारी असलेल्या आणि पाठीतील दुखण्याने त्रस्त असलेल्या साईराज याने आज येथे आत्मविश्वासाने कौशल्य दाखविले. साईराज या १७ वर्षीय खेळाडूने स्नॅचमध्ये १४१ किलो तर क्लीन व जर्कमध्ये १७० किलो असे एकूण ३११ किलो वजन उचलले. मध्यप्रदेशच्या व्ही. अजय बाबू याने ३२२ किलो तर पश्चिम बंगालच्या अचिंता शेऊली याने ३१३ किलो वजन उचलून अनुक्रमे सुवर्णपदक व रौप्यपदकाची कमाई केली. साईराज याने डिसेंबर महिन्यात झालेल्या कनिष्ठ गटाच्या आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. येथेही त्याला सुवर्णपदकाची अपेक्षा होती. मात्र एक आठवड्यापूर्वी त्याला ताप आला होता तसेच पाठीतही उसण भरली होती. ■

# भारताला टोगोविरुद्ध २-० ने आघाडी

### डेव्हिस चषक जागतिक गट १ प्लेऑफ ● रामकुमार, मुकुंदची चमकदार कामगिरी





रामकुमार रामनाथन्





मुकुंद शशिकुमार

◆ **नवी दिल्ली, १ फेब्रुवारी**

भारताने शनिवारी डेव्हिस चषक जागतिक गट १ प्ले-ऑफ २०२५ टेनिस स्पर्धेत आपल्या मोहिमेची जोरदार सुरुवात केली व पहिल्या दिवशी टोगोविरुद्ध २-० अशी आघाडी घेतली. मुकुंद शशिकुमार आणि रामकुमार रामनाथन्ने दमदार कामगिरी करत आपापल्या एकेरी सामन्यात विजय मिळवला आणि टीम इंडियाला विजयाच्या उंबरठ्यावर आणले.

मुकुंदने पहिल्या सामन्यात लिओवा अजावोनवर ६-२, ६-१ असा निर्णायक विजय मिळवला व १-० अशी आघाडी मिळवत भारताच्या मोहिमेचा पाया रचला, तर रामकुमारने थॉमस सेतोदजीवर ६-०, ६-२ असा दबदबा निर्माण करून भारताची आघाडी दुप्पट केली.

डीएलटीए कॉम्प्लेक्समधील भारतीय चाहत्यांना खूप आनंद झाला. चाहत्यांनी तिरंगा झेंडे फडकावले, जिंकलेल्या प्रत्येक गुणासाठी समर्थन केले. ◀(वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलियाचा श्रीलंकेवर एक डाव व २४२ धावांनी विजय

**लियोन व कुहनेमनचा प्रभावी फिरकी मारा**

◆ **गॅले, १ फेब्रुवारी**

फिरकीपटू नॅथन लियोन व मॅथ्यू कुहनेमनने केलेल्यटा प्रभावी फिरकी माऱ्याच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने शनिवारी म्हणजे चौथ्याच दिवशी यजमान श्रीलंकेवर पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात एक डाव आणि २४२ धावांनी विजय मिळविला. या विजयाबरोबरच ऑस्ट्रेलियाने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. द्विशतकी खेळी करणारा ऑस्ट्रेलियाचा सलामवीर उस्मान ख्वाजा सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

हा पराभव यजमान श्रीलंकेचा कसोटी क्रिकेटमधील सर्वात वाईट पराभव ठरला. यापूर्वी २०१७ मध्ये भारताने श्रीलंकेला एक डाव व २३९ धावांनी पराभूत केले होते.





श्रीलंकेविरुद्ध कसोटी विजय मिळवल्याचा आनंद साजरा करताना ऑस्ट्रेलियन खेळाडू

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर ऑस्ट्रेलियाने १५४ षटकांत ६ बाद ६५४ धावा उभारल्या आणि आपला पहिला डाव घोषित केला. नंतर ऑस्ट्रेलियाने फिरकी गोलंदाजांचा पुरेपूर वापर करून श्रीलंकेच्या फलंदाजी विभागाचा धुव्वा उडवला. श्रीलंकेचा पहिला डाव ५२.२ षटकांत १६५ धावांत गुंडाळला. दिनेश चंडीमलने तेवढी एकाकी झुंज देत ७२ धावांची खेळी केली. श्रीलंकेला झटपट गुंडाळताना मॅथ्यू काहेनमनने ६३ धावांत ५ बळी, नॅथन लियोनने ३ बळी, तर मिचेल स्टार्कने २ बळी टिपले.

श्रीलंकेचा पहिला डाव १६५ धावांत आटोपला. पहिल्या डावात ४८९ धावांची आघाडी मिळविणाऱ्या ऑस्ट्रेलियाने श्रीलंकेवर फॉलो-ऑन लादला. परंतु श्रीलंकेचा दुसरा डावही गडगडला. दिनेश चंडीमल (३१), अँजेलो मॅथ्यूज (४१), कामिंदू मेंडिस (३२), कर्णधार धनंजय डी सिल्वा (३९, कुसल मेंडिस (३४) व जेफ्री वँडरसेने (५३) बुडत्या जहाजाला वाचवण्याचा प्रयत्न केला, पण ऑस्ट्रेलियन फिरकी गोलंदाजांवर नियंत्रण मिळवण्यात त्यांना अपयश आले.

श्रीलंकेला पिछाडी भरून काढता आली नाही व त्यांचा संपूर्ण दुसरा डाव ५४.३ षटकांत २४७ धावांवर आटोपला. ऑस्ट्रेलियाच्या मॅथ्यू काहेनमन व नॅथन लियोनने प्रत्येकी ४ बळी, तर मिचेल स्टार्क व टॉड मर्फीने प्रत्येकी एक बळी टिपला. ◀(वृत्तसंस्था)

# ऋतिका श्रीरामची सुवर्णभरारी कायम

### ३८ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, उत्तराखंड ● ईशा वाघमोडेला कांस्यपदक

◆ **हल्दवानी, १ फेब्रुवारी**

डायव्हिंगमधील 'सुपर मॉम' म्हणून ख्याती मिळवलेल्या सोलापूरच्या ऋतिका श्रीराम हिने ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत आपल्या सुवर्णपदकांची मालिका कायम ठेवली. तिने ४ मीटर स्प्रिंग बोर्ड या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक, तर सोलापूरच्या ईशा वाघमोडे हिने कांस्यपदकाची कमाई केली.

ऋतिकाने डायव्हिंगमध्ये सर्वोत्तम कौशल्याचे प्रदर्शन करत १६४.७५ गुणांची कमाई केली. ईशाने १५३.०४ गुणांची नोंद केली. येथे तिने याआधी प्लॅटफॉर्म डायव्हिंगमध्ये रौप्यपदक पटकाविले होते. साडेतीन-चार वर्षाचा मुलगा असूनही ३४ वर्षीय खेळाडू ऋतिका हिने डायव्हिंग यासारख्या आव्हानात्मक क्रीडा प्रकारात आपले करिअर कायम ठेवले आहे. एकूण ६ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील तिचे हे ११वे सुवर्णपदक आहे. मुंबई पश्चिम रेल्वेमध्ये नोकरीस असलेल्या ऋतिकाने आजपर्यंत वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये पन्नासहून अधिक पदके जिंकली आहेत. तिचे पती हरिप्रसाद हे देखील आंतरराष्ट्रीय डायव्हिंगपटू आहेत.

स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग हा माझा अतिशय आवडता क्रीडा असल्यामुळे मला येथेही सुवर्णपदक जिंकण्याचा आत्मविश्वास होता. सुदैवाने येथे माझ्या अपेक्षा नुसारच माझी कामगिरी झाली असे ऋतिका हिने सांगितले.

**धिर्ती अहिरवालला सुवर्णपदक**

पालघरच्या धिर्ती अहिरवाल हिने जलतरणच्या २०० मिटर बटरफ्लाय प्रकारात महाराष्ट्राला सुवर्णपदक जिंकून दिले. तिने २ मिनिटे २३.८० सेकंद वेळेसह सुवर्ण पदकावर मोहोर उमटवली. कर्नाटकची सुहासिनी घोष व आसामची अस्था चौधरी यांना अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक मिळाले. जलतरणातील महिलांच्या ४ बाय २०० मिटर फ्री स्टाईल प्रकारात महाराष्ट्राला रौप्यपदक मिळाले, तर पुरुषांच्या ४ बाय २०० मिटर फ्री स्टाईल प्रकारात महाराष्ट्राला कांस्यपदक मिळाले. महिला गटात अन्वी देशवाल, सान्वी देशवाल, धिर्ति अहिरवाल व अदिती हेगडे या चौकडीने ९ मिनिटे ९.३७ सेकंद वेळेसह रूपेरी यशाला मिठी मारली. पुरुष गटात शुभम धायगुडे, ओम साटम, ऋषी भगत व ऋषभ दास या चौघांनी ७ मिनिटे ५५.६२ सेकंद वेळेसह कांस्यपदकाची कमाई केली. कर्नाटक व गुजरात संघाने अनुक्रमे सुवर्ण व रौप्यपदक पटकाविले. ■

**स्क्वॅश : महाराष्ट्राचे दोन्ही संघ अंतिम फेरीत, गाठ तमिळनाडूशी**

स्क्वॅश क्रीडाप्रकारातही महाराष्ट्राने आपले वर्चस्व कायम राखून सांघिक पुरूष व महिला दोन्ही गटातील अंतिम फेरीत धडक दिली. उद्या रविवारी दोन्ही संघ तामिळनाडू विरूध्द झुंजतील. उपांत्य फेरीत पुरूष संघाने सेनादलाचा २-१ पराभव केला, तर महिला संघाने उत्तरप्रदेशवर २-१ ने मात करून अंतिम फेरी गाठली. ◀(वृत्तसंस्था)

## संक्षिप्त वृत्त



सोलापूर - जडवाहतुकीसाठी बंद केलेल्या शहरातील भैय्या चौकातील रेल्वे विभागाने उभारलेल्या लोखंडी आडव्या बार खाली शनिवारी दुपारी पोलीस वाहन अडकले आणि निघालेसुद्धा.



### प्रवरानगर शाखेचे नवीन कार्यालयात स्थलांतर

**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**

राष्ट्रीयकृत बँकांमध्ये अग्रगण्य असलेली युनियन बँक ऑफ इंडिया नगर जिल्ह्यात ग्राहकाभिमुख सेवा देण्यात अग्रेसर असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले. बँकेच्या प्रवरानगर शाखेचे नवीन सुसज्ज जागेत स्थलांतर व लोकार्पण सोहळा ना. विखे पाटील यांचे हस्ते संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, युनियन बँकेचे अंचल प्रमुख नवीन जैन, क्षेत्र प्रमुख सुनीलकुमार यादव, उपक्षेत्र प्रमुख सुभाष गजभिये, शाखाधिकारी अमोल जाधव उपस्थित होते. यावेळी अंचल प्रमुख नवीन जैन यांनी बँकेच्या विविध कर्ज योजना, बचत ठेव योजना तसेच अधिकाधिक ग्राहकाभिमुख सेवा देण्यासाठी बँकेचे विविध उपक्रम याबाबत माहिती दिली. नव्या प्रशस्त शाखेच्या माध्यमातून शेतकरी, उद्योजक, व्यापारी, महिला, विद्यार्थी, नोकरदार तसेच समाजातील अन्य घटकांना तत्पर अर्थ सेवा उपलब्ध होणार असल्याचे यावेळी यादव यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते काही मंजूर कर्जांचे वितरण करण्यात आले.

### फेक इन्स्टा अंकाऊंट तयार करून तरुणीचा विनयभंग; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

कॉल मी असे तरुणीच्या नावाने फेक इन्स्टा अंकाऊंट तयार करून विनयभंग केल्याप्रकरणी एकाविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार २७ ते ३१ जानेवारी दरम्यान घडला. यातील पिडीतेचा चेहरा क्रॉप करून अन्य महिलेच्या बॉडीला लावण्यात आला आहे. हा फोटो प्रसारित करून बदनामी करण्याची धमकी संदेशाद्वारे अज्ञाताने पिडीतेला दिली. समोर येऊन बोल असे मेसेज पीडितेने पाठविला असता आतााच समोरून गेलो, तू काय करू शकली नाही असा मेसेज आरोपीने परत पाठविला. या गुन्ह्याचा तपास एमआयडीसी पोलीस करत आहेत.

### लग्नाच्या आमिषाने अल्पवयीन मुलीवर अत्याचार; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

लग्नाच्या आमिषाने अल्पवयीन मुलीच्या घरी जाऊन तिच्यावर तिच्या मनाविरुद्ध अत्याचार केल्याप्रकरणी तरुणाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सर्फराज मुजावर (रा. सोलापूर) असे आरोपीचे नाव आहे. यातील पिडीता ही १ ऑक्टोबर २०२४ रोजी घरी एकटीच होती. त्यावेळी आरोपीने फोन करून तिच्याशी शरीरसंबंध ठेवण्याची मागणी केली. त्यास पीडितेने नकार दिल्यानंतर आरोपी हा पीडितेच्या घराजवळ आला. पीडितेची इच्छा नसतानाही घरातील लोकांना माहित होईल, या भीतीने पीडितेने घराचा मागील उघडला असता, आरोपी घरात आला. त्याने लग्नाचे आमिष दाखवून जबरदस्तीने पीडितेवर अत्याचार केला. त्यानंतर पुन्हा तीन ते चार दिवसांनी येऊन पीडितेबरोबर शरीरसबंध ठेवले. या गुन्ह्याचा तपास पोलीस करत आहेत.

### ज्येष्ठ नागरिकांना दिलासा देणारा अर्थसंकल्प

**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**



आयकर रचनेत ज्यांचे उत्पन्न १२ लाखापर्यंत आहे त्यांना संपूर्ण करमाफी दिलेली आहे. जेष्ठ नागरिकांना १ लाखापर्यंतच्या मिळणाऱ्या व्याजासाठी टीडीएस कपात करण्याची गरज नाही. तसेच भाडे पोटी टीडीएस कपातीची मर्यादा वाढवून ६ लाख करण्यात आली आहे. म्हणजे आता ६ लाखापर्यंतच्या भाड्यासाठी टीडीएस कपात करण्याची गरज नाही. नवीन कर रचना प्रणालीमध्ये इन्कम टॅक्सच्या स्लॅब मध्ये पण बदल सुचवलेला आहे. नवीन आयकर संहिता आणण्याचा प्रस्ताव आणला आहे. पुढील आठवड्यात नवीन आयकर संहिता बिल लोकसभेत मांडणार आहे.

**- ॲड. अक्षय अंदोरे, कर सल्लागार**

### श्रीमंतांसाठी अर्थसंकल्प

**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**



केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ हे सरकारच्या कॉर्पोरेट-समर्थक, लोकविरोधी धोरणांचे आणखी एक उदाहरण आहे. बेरोजगारीच्या संकटाला मान्यता देण्यास नकार देऊन, उत्पन्नातील असमानता दूर करण्यात अपयशी ठरून आणि कामगार, शेतकरी आणि महिलांच्या गरजांकडे दुर्लक्ष करून, सरकारने पुन्हा एकदा लोकांच्या कल्याणापेक्षा कॉर्पोरेट नफ्याला प्राधान्य दिले आहे. या कामगारविरोधी, युवाविरोधी अर्थसंकल्पाचा तीव्र निषेध करत आहे. आणि सरकारला त्वरित सुधारणात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन करतो आहे.या देशातील तरुणांना चांगले लाभ मिळण्यास पात्र आहे - हे बजेट त्यांना पूर्णपणे अपयशी ठरले आहे. या विरूद्ध देशभर तीव्र आंदोलनाचे पडसाद उमटतील, असा इशारा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी दिला.

**-माजी आ. नरसय्या आडम**

# सोलापुरात श्री गणेश जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

शहरातील मानाचा श्री आजोबा गणपती मंदिरमध्ये श्रीगणेश जयंती निमित्त गुलाल आणि पाळणासह विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले.

गणेश जयंतीचे औचित्य साधून आजोबा गणपती मंदिर ट्रस्टच्या वतीने दुपारी बारा वाजता पाळणा सोहळा पार पडला. सर्वप्रथम ओम गं गणपतये चा जयघोष करण्यात आला. जयघोष संपन्न झाल्यानंतर सुवासिनी महिलांनी पाळण्याभोवती एकत्रित येत, नाव ठेवण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर श्रीगणपती बाप्पाची आरती करण्यात आली. आरती संपन्न झाल्यानंतर सुहासिनी महिलांच्याहस्ते गुलाल कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्रतिकात्मक गणपती बाप्पाचे रूप पाळण्यामध्ये ठेवण्यात आले. यावेळी मानाचा श्री आजोबा गणपती बाप्पास आकर्षक वस्त्र, आभूषणे आणि सुवासिक फुलांनी अलंकृत करण्यात आले होते. गाभाऱ्यात मोराची सौंदर्यपूर्ण सजावट साकारण्यात आली होती. त्यामुळे सारे वातावरण प्रसन्नतेने आणि नवचैतन्याने नाहून गेले होते. यावेळी सकाळपासूनच आबालवृद्ध तसेच महिलांची मांदियाळी मंदिर परिसरात दिसून आली.





### श्री आजोबा ताता सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ

श्री आजोबा ताता सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीनेक्रांती चौक कॉम्रेड गोदुताई परुळेकर नगर कुंभारी सोलापूर. येथे गणेश जयंती निमित्त गणेशयाग व गणेश पाळणा कार्यक्रम यांचे आयोजन करण्यात आले होते सकाळी ७ वाजता पाळणा व गुलाल , सकाळी ८ वाजता लोककल्याणासाठी गणेशयाग संपन्न होऊन गणेशजयंती मोठ्या थाटात झाला.

हे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी बाळकृष्ण मल्याळ, संतोष बोडा, आनंद कटकम, अरुण गाजुल, नागेश कासुल, अमर रच्चा, भास्कर वोद्दुल, भीमा झाडबुके, राजेशम बुटला, श्रीनिवास दुभाषी, आदित्य दुभाषी, मंडळाचे सर्व सभासद व पदाधिकारी उपस्थित होते.

# बार्शीत क्रेडाईतर्फे प्रॉपर्टी प्रदर्शन

**बांधकाम व्यावसायिक क्षेत्रातील लोकांना संधी; तीन दिवस प्रदर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ फेब्रुवारी-**

बांधकाम व्यावसायिक आणि प्रॉपर्टी क्षेत्राशी संबंधित व्यवसायिकांसाठी बार्शीतील भगवंत मैदानावर क्रेडाईच्या बार्शी शाखेतर्फे दि. ७, ८ आणि ९ फेब्रुवारी रोजी कन्स्ट्रक्शन आणि प्रॉपर्टी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.




या प्रदर्शनामध्ये सोलापूर, लातूर, धाराशिव आणि पुणे जिल्ह्यांतील बांधकाम व्यावसायिक सहभागी होणार आहेत. यात बांधकाम क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान, प्रकल्प आणि प्रॉपर्टी गुंतवणुकीच्या संधी यांची माहिती देण्यासाठी ६० पेक्षा अधिक स्टॉल्स उपलब्ध असतील. विविध प्रकारच्या बांधकाम साहित्य, बांधकाम यंत्रसामग्री आणि स्मार्ट होम सोल्युशन्ससारख्या, इंटीरियर, प्लॉट्स, फ्लॅट स्कीम, बँक इत्यादि गोष्टींचा समावेश असेल. क्रेडाई बार्शीचे अध्यक्ष सतीश अंधारे, प्रोजेक्ट चेअरमन इंजि. अमर काळे यांनी सांगितले की, 'दर्जेदार बांधकाम साहित्याचे विक्रेते स्टॉल घेऊन प्रदर्शनात सहभागी होणार आहेत आणि आपणही यामध्ये सहभागी होऊ शकता. ग्राहकांना परवडेल अशा किंमतीत घरे, फ्लॅट्स, प्लॉट्स आणि साहित्य उपलब्ध करुन देण्याचा प्रामाणिक प्रयत्न असून, बांधकाम व्यावसायिकांना त्यांच्या सेवांचे व प्रकल्पांचे प्रमोशन करण्यासाठी स्टॉल्स उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. तसेच बार्शी क्रेडाईचे युथ विंगचे अध्यक्ष श्री.अमित इंगोले यांनी इकोफ्रेंडली घरे या संकल्पनेनुसार आर्च क्रांती या अंगर्तत विविध महत्वपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले आहे. प्रामुख्याने विद्यार्थी, बांधकाम क्षेत्रातील कारागीर तसेच नवीन तंत्रज्ञान प्रशिक्षित व्यक्ती यांना डोळयासमोर ठेवून यामध्ये वर्कशॉप अंतर्गत डोम बनविणे, आर्च बनविणे, बांधकाम फोटोग्राफी, बिल्डींग स्केचेस अशा गोष्टींचा समावेश करुन हे प्रदर्शन अधिक नाविन्यपूर्ण बनविले आहे. या एकूणच प्रदर्शनामुळे बार्शीच्या बांधकाम व्यवसाय क्षेत्राला नजीकच्या भवितव्यामध्ये सोन्याचे दिवस येणार असल्याचे, ड. विक्रम सावळे सदस्य क्रेडाई यांनी प्रतिपादन केले आहे.



# वीर संभाजी मंडळातर्फे पाळणा सोहळा

**सोलापूर, दि. १ फेब्रुवारी-**

वीर संभाजी तरुण मंडळातर्फे गणेश जयंती निमित्त पाळणा सोहळा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंदिरात आकर्षक मंडप, फुलांनी, फुग्यांनी सजावट करण्यात आली होती. रांगोळ्यांच्या पायघड्या ही या दरम्यान घालण्यात आल्या होत्या. सकाळच्या सत्रात होम हवन सोहळा पार पडला. यानंतर दुपारच्या सत्रात पाळणा महाआरती व भक्त भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गणेश भक्तांनी गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया गजानन महाराज की जयचा जयघोष केला. यावेळी मंडळाचे मार्गदर्शक तसेच पदाधिकारी नागनाथ सलगर, महादेव



सलगर, भागवत कोलारकर, विजय भगरे, सतीश बुजरूके, नरेंद्र साळुंखे, मनोज सलगर, विठ्ठल गिराम, प्रतीक रत्नपारखे, पिंटू माळवतकर, तानाजी जगताप, शुभम साळुंखे, नितीन बाचल, इमरान शेख उपस्थित होते.

### तरूणाने स्वतःच्या गळ्यावर ब्लेडने मारून घेतले

**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

अज्ञात कारणावरून २८ वर्षीय युवकाने स्वतःच्या गळ्यावर ब्लेडने मारून घेतले, जखमी झाल्याने उपचार करण्यासाठी सिव्हिल रुग्णालयात दाखल केले आहे. आकाश अशोक व्हनमाने (वय २८ रा. जुळे सोलापूर) असे जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे. ही घटना शुक्रवारी रात्री साडे दहाच्या सुमारास जुळे सोलापुरात घडली आहे. आकाश याने जुळे सोलापुरातील राहत्या घरात अज्ञात कारणावरून स्वतःच्या गळ्यावर ब्लेडने मारून घेतले. गळ्यावर जखम झाल्याने त्यास उपचार करण्यासाठी सिव्हिल रुग्णालयात भाऊ अक्षय व्हनमाने यांनी दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

# योग्य समुपदेशनामुळे वाचला एक संसार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

जिल्हा न्यायालयात न्यायदंडाधिकारी व वकिलांनी योग्य समुपदेशन केल्यामुळे तुटता तुटता एक संसार वाचला.


निशा व सूजल (नावे बदलून) हे दोघे पती पत्नी असून विवाहानंतर पत्नी पतीचे राहते घरी नांदायला गेली असता घरात सासू-सासरे असा छोटेखानी परिवार. पतीला चांगली नोकरी, घरी सर्व सुबत्ता होती. संसार सुखाचा होता. त्यात मुलगा झाल्यानंतर अजुनच सुंदर संसार फुलला, कशाचीच कमतरता नव्हती. पत्नी ही उत्तमरित्या संसार सांभाळत होती सासू-सासऱ्यांची काळजी घेत होती.

परंतु काही दिवसानंतर पती-पत्नीमध्ये किरकोळ कारणांवरुन वाद होऊन गैरसमज वाढले. त्यानंतर दोघात वाद झाल्यामुळे पत्नीने तक्रार देऊन माहेरी राहण्यास आली.



> पती-पत्नी या नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे मुलांना घडवण्यासाठी व एकमेकांना साथ देण्यासाठी एकत्र हवेतच. संसार करत असताना नवरा बायकोमध्ये वाद होतातच. पण त्याला जास्त महत्त्व देऊ नये. एकमेकांत संवाद साधुन वाद लवकर संपुष्टात आणावेत. मुलांना घडविण्यासाठी व संस्कारासाठी आई-वडिल दोघेही एकत्र हवेतच. वाद झाले तरी दोघांनी विचार विनिमय करुन वाद सोडवण्याचा शक्यतो प्रयत्न करावा. त्यामुळे कोर्टात येणे टाळले जाऊ शकते, असे पक्षकाराचे वकिल ॲड. अनघा कुलकर्णी यांनी सांगितले.

गैरसमज वाढल्यामुळे दोघांनीही विभक्त होऊन घटस्फोट घेण्याच्या निष्कर्षास आले होते. सदरचे प्रकरण वाद मिटविणेसाठी व दोघांनी एकत्र येवून परत संसार करावा, तडजोडीने वाद मिटवून दोघांना एकत्र आणणेसाठी म्हणून सदर प्रकरण सोलापूर जिल्हा विधीसेवा केंद्राकडून सदर प्रकरण मुख्य न्यायदंडाधिकारी व्ही.आय.भंडारी यांचेकडे पाठविणेत आले. पक्षकारांचे वकिल व न्यायाधिशांनी वाद, गैरसमज बाजूला ठेऊन मुलाचे शिक्षण व भविष्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे हे पटवून दिले. तसेच दोघांपैकी कुणीही एकाने मुलाला सांभाळणे योग्य होणार नाही. त्याच्यावर योग्य संस्कार होण्यासाठी तसेच योग्य सक्षम नागरिक होण्यासाठी तुम्ही दोघेही एकत्र असणे गरजेचे आहे, असे समुपदेशन करुन दोघांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न झाले. मेडिएशन झाल्यानंतर बाहेर येताच कोर्टात मुलाने त्याचे बाबांना पहाताच घट्ट मिठी मारली व तेथूनच आईला घेवून आपल्या घरी चला म्हणून दोघांना घेवून चालला. दोघांनाही वकील व न्यायाधिशांचे विचार पटल्यामुळे एकत्र नांदायला गेले व सर्व तक्रारी बिनाशर्त मागे घेतल्या. तडजोडीनंतर दोन्ही कुंटुंबेही एकत्र आले. यात पत्नीचे भावाने बहिणीचा संसार सुखाने सुरळीत परत चालू व्हावा, म्हणून प्रयत्न करत होता. यात पक्षकारांतर्फे ॲड. अनघा कुलकर्णी व मोहसिना पिरजादे यांनी काम पाहिले.




# सिंथेटिक ट्रॅक दिशाहीन; १२ कोटी पाण्यात

**क्रीडा संकुलातील ट्रॅकमध्ये भ्रष्टाचाऱ्याचा आरोप करत जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचा आंदोलनाचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

जिल्हा क्रीडा संकुलात बारा कोटीचा सिंथेटिक ट्रॅक होत असताना कोणालाही विश्वासात न घेता भ्रष्टाचार करण्याच्या हेतूने याचे काम सुरू झाले आहे. यात जिल्हा क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष तथा पालकमंत्री, सचिव तथा जिल्हाधिकारी, क्रीडा मंत्री, आयुक्त क्रीडा व युवक कल्याण संचालनालय आणि क्रीडा उपसंचालक यांनी लक्ष घालावे, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन व शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेने दिला आहे

सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे राजू प्याटी व शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनचे दशरथ गुरव यांनी तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आ. प्रणिती शिंदे, जिल्हाधिकारी कुमार



आशीर्वाद व क्रीडा उपसंचालक युवराज नाईक यांच्यामार्फत हा ट्रॅक होण्यासाठी वारंवार प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नातून कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात सिंथेटिक ट्रॅक होत आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक कल्याण विभाग यांनी १२ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. परंतु जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी जिल्हा क्रीडा संकुल समिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अथवा समितीतील सन्माननीय सदस्यांना विश्वासात न घेता स्वतःच्या हस्ते भूमिपूजन करुन घेऊन काम सुरू केले आहे. सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन व शारीरिक शिक्षण शिक्षक संघटना वारंवार प्रारुप प्लॅन दाखविण्याची मागणी करीत होते. त्यांनाच नाही क्रीडा उपसंचालक युवराज नाईक याची चौकशी करण्यासाठी आली होते. त्यांनाही हा प्लॅन पाहायला मिळाला नाही.

शेवटी जनमाहिती अधिकारमधून जो प्लॅन दिला गेला, त्यामध्ये पहिली चुक आहे. त्यात दिशा दर्शवली गेली नाही म्हणून हा दिशाहीन ट्रॅक आहे. ज्या इव्हेंटमध्ये भारताला ऑलिंपिकमध्ये निरज चोप्रा याने सुवर्णपदक मिळवून दिले. त्या इव्हेंटसाठी कोणते रनवे आहे याची माहिती नाही. थाळीफेक व हातोडा फेक सर्कल वेगळे नाही. त्यात दोन्हीला केज असते त्याबद्दलही साशंकता आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आम्ही संपूर्ण बजेट मागीतले असता ते दिलेले नाही. त्यामुळे क्रीडा तज्ञांच्या समितीच्या मार्गदर्शनाखाली हा ट्रॅक व्हावा, अशी त्यांनी मागणी केली आहे.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अर्थसंकल्पातील तरतूदी संमिश्र



युवक, महिला सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या गोष्टी नाहीत. सर्वसामान्यांनी या सरकारकडे अपेक्षा म्हणून बघितलं होते परंतू तिसऱ्यांदा सरकार केंद्रात आणि राज्यात असताना महाराष्ट्रासाठी भरून तरतूद आवश्यक दिसून येत नाही. टॅक्समध्ये शेतकरी बांधवांना टॅक्समध्ये दिलासा दिला तो नक्कीच स्वागतार्ह आहे परंतु तो पगारदारांपुरता आहे का, सर्वसामान्य लोकांसाठी आहे त्याचं स्पष्टीकरण होणं गरजेचे आहे. पंतप्रधान आवास योजना, पंतप्रधान सडक योजनेचा उल्लेख केला नाही. सरकार म्हणून ज्या योजना अपेक्षित आहेत त्याची पूर्तता नाही. अर्थसंकल्प बजेट संमिश्र आहे फारसा दिलासादायक नाही.

**- आ. अभिजीत पाटील**

## आयकर दारात मोठी सवलत

अर्थमंत्री डॉ. निर्मला सीतारामन यांनी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. त्यातील आयकरासंदर्भातील कांही महत्वाच्या सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्याने नोकरदार वर्गास अपेक्षेपेक्षा फार मोठा दिलासा देण्यात आला आहे. आयकर कायद्यात सुसूत्रता आणून तो सोपा व्हावा यासाठी पुढील आठवड्यात नवीन आयकर विधेयक सादर करणार असल्याचे अर्थमंत्र्यांनी सर्वप्रथम सांगितले. या नवीन विधेयकाचा आणि प्रस्तावित कर दरांचा कांही संबंध असणार नाही. एकंदरीतच आयकर दरांत आणि मर्यादेत अपेक्षेपेक्षा सवलत देण्यात आल्याने करदात्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**- मिलिंद तानावडे, कर सल्लागार पंढरपूर**




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


# मोदी सरकारच्या अर्थसंकल्पाचे उत्साहाने स्वागत

- केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या घोषणेमुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा; शिक्षण, आरोग्य, कृषी, पर्यटन अन् नोकरदारांच्या हिताचा संकल्प



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १ फेब्रुवारी–

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात नव्याचा संकल्प करत उद्योग, शेती, पर्यटन, शिक्षण, आरोग्य, एआय, महिलांसह सर्व घटकांना दिलासा दिला आहे. नोकरदारांची तर बल्लेबल्ले झाले असून, त्यांच्यासाठी घसघशीत तरतूद करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात गरिबांसह सर्वसामान्य मध्यमवर्गीयांना मोठा आधार मिळाला आहे. मोदी सरकारच्या अर्थसंकल्पाचे उत्साहाने स्वागत झाले आहे.**



## हा अर्थसंकल्प तर केवळ एक जुमला



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा एक केवळ जुमला आहे. दिल्ली निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मध्यम वर्गीयांना कर लाभाचे एक गाजर दिले आहे. एकीकडे देशाचा आर्थिक स्थर उंचावण्याऐवजी घसरत चाललेला आहे. तर शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले जात आहेत. एस.सी. बजेट ५५ टक्के, शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले जात आहेत. महिला, शेतकरी, विद्यार्थी, युवा उद्योजक यांच्यासाठी कोणतेही विशेष तरतुदी नाहीत.

**- प्रणिती शिंदे, खासदार**

## विकसित भारत होण्यासाठी महत्वाचे पाऊल



केंद्रीय अर्थसंकल्प हा एका अर्थाने विकसित भारत होण्यासाठी टाकलेले महत्वाचे पाऊल आहे, असे मला वाटते. कारण केवळ उद्योग क्षेत्राचा विचार केला तर पहिल्यांदाच व्यवसाय सुरू करणाऱ्या विशेष वर्गातल्या महिलांना २ कोटींचं टर्म लोन देण्यात येणार. उद्यम पोर्टलवरील नोंदणीकृत मायक्रो इंडस्ट्रीसाठी ५ लाखांचं क्रेडिट कार्ड देणार. लघु आणि मध्यम उद्योगांना १० कोटींपर्यंतचे कर्ज देण्यात येईल तर स्टार्टअपचं क्रेडिट लिमिट २० कोटी करण्यात आलंय. लिथियम आयॉन बॅटरीज, सेमीकंडक्टर्स आणि सस्टेनेबल एनर्जी उत्पादनासाठी ज्या मशीनरी लागतात त्याच्या निर्मितीसाठी आवश्यक कोबाल्ट, लिथियम आयॉन वगैरे खनिजांवरील बेसिक कस्टम्स ड्युटी हटवण्यात आली. त्यामुळे ऑटोमोबाईल इंडस्ट्रीचा वेग वाढेल.

**- यतिन शहा**
**चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक**
**प्रिसिजन कॅमशाफ्ट्स् लिमिटेड.**

## सर्वोत्कृष्ट बजेट



२०२४ ते २०२५ साला दरम्यानचे हे सर्वोत्कृष्ट बजेट असे म्हणण्यास हरकत नाही. ज्येष्ठ नागरिकांना व्याजवरील सूट ५०,००० वरून वाढवून १लाखापर्यंत करण्यात आली, कॅन्सर रोगावरील ३६ औषध संपूर्ण ड्युटी फ्री करण्यात आली. टीव्ही, मोबाईल, इलेक्टरीक कार, देशात तयार झालेले कपडे, चमड्याच्या वस्तू स्वस्त होणार, जलजीवन मिशन साठीचे बजेट १०० टक्के वाढविण्यात आले. अशा अनेक योजनेमध्ये उद्योग, व्यापार, शेती, विद्यार्थी, नोकरदार यांना लाभ मिळणार आहे.

**- केतन शहा,**
महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स गवर्निंग कॉन्सिल सदस्य

## सर्वसमावेशक अर्थसंकल्प



नोकरदार कृषी, शिक्षण व उद्योग क्षेत्रासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय या अर्थसंकल्पात घेतल्याने या अर्थसंकल्पास सर्व समावेशक अर्थसंकल्प असे म्हणता येईल. नोकरदार वर्गांना दिलासा देताना बारा लाखांच्या आतील पगार हा करमुक्त करण्यात आलेला आहे. कृषी क्षेत्रातील किसान क्रेडिट कार्डचे लिमिट तीन लाखावरून पाच लाखापर्यंत केल्याने शेतकऱ्यांसाठी बिगर व्याजी कर्जाची मर्यादा वाढलेली आहे. एमएसएमई उद्योग क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध झाल्याने तरुण वर्गाला दिलासादायक अर्थसंकल्प आहे.

**- दिनकर देशमुख,**
संचालक, सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन

## किचकट तरतुदीमध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न



एमएसएमई व निर्यात वाढवणे, शेती व ग्रामीण विकास, उत्पादन व आर्थिक क्षेत्र यावर लक्ष, गरीब, तरूण, शेतकरी व महिलांना प्राधान्य यासाठी कर प्रणाली मध्ये बदल,ऊर्जा क्षेत्रातील तसेच शहर विकास या कडे लक्ष, तसेच पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी मुद्रा कर्ज वाटप, याला पूरक हिल इन इंडिया हा प्रकल्प, मध्यम वर्गातील लोकांना दिलासा देण्यासाठी टिडीएस मध्ये सुसंगती आणणे, दर अथवा मूळ मर्यादा यात बदल, भाडे घेताना टिडीएसची मर्यादा ही २.४ लाख वरुन ६ लाख एवढी वाढवण्यात आली. किचकट तरतुदी मध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न अर्थमंत्री यांनी केला आहे.

**- अश्विनी दोशी, सीए**

## ऐतिहासिक अर्थसंकल्प



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करून मध्यमवर्गाला दिलासा दिलेला आहे. पगारदार, मध्यमवर्गीय, युवा, शेतकरी, कष्टकरी यांच्या दृष्टीने हा अर्थसंकल्प विकासाची नवी क्षितिजे गाठणारा ठरणार आहे. युवा उद्योजकांसाठी महत्त्वाचे असलेल्या एमएसएमई क्षेत्रासाठी कर्ज मर्यादा आणि वारंवारतेचा निकष वाढविण्याचा निर्णय युवकांसाठी लाभकारक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्राच्या माध्यमातून विकसित भारताकडे गतीने प्रवास करण्यासाठी हा अर्थसंकल्प मैलाचा दगड ठरणार आहे.

**- देवेंद्र कोठे, आमदार**

## देशाच्या विकासाला चालना देणारे बजेट



मोदी सरकारचा तिसऱ्या टर्ममधील पहिला पूर्ण अर्थसंकल्पात १२ लाखापर्यंत सर्वसामामान्यांना कोणताही कर द्यावा लागणार नाही. त्यामुळे नवीन टॅक्स प्रणालीतून अर्ज करणाऱ्यांना दिलासा मिळाला मिळाला आहे. १ लाखापर्यंत पगार असणाऱ्यांना दिलासा मिळाला. अणुऊर्जा अभियान - २० हजार कोटी रुपयांची तरतूद स्वदेशी अणुभट्ट्या कार्यरत होतील. धनधान्य कृषी योजनेचा १ कोटी ७० लाख शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे.

**- श्रीकांत मोरे,**
ज्येष्ठ अर्थतज्ञ, सोलापूर

## निर्णयाचे स्वागत



अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी आपला नववा अर्थसंकल्प सन २०२५-२०२६ करीता अर्थसंकल्प मांडला. या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा करिता भरीव तरतूद व नवीन भारत निर्णिच्या धोरणाने शेतकरी, नव उद्योजक, महिला व सुक्ष्म व लघुउद्योग यांना केंद्रीत करुन सदर अर्थसंकल्प सादर करण्यात आला. तसेच मेक इन इंडियाला प्रोत्साहन देऊन भविष्याचा वेध घेऊन नवीन गुंतवणूकीद्वारे रोजगार वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आलेला आयकर मर्यादामध्ये १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्याचे निर्णय घेतले याचे स्वागत.

**- राजू राठी,**
अध्यक्ष, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर

## अर्थसंकल्पात महाराष्ट्राकडे दुर्लक्ष



महाराष्ट्रासाठी या अर्थसंकल्पात कोणतीही भरीव तरतूद नाही. पण बिहारच्या आगामी निवडणूक पाहता त्या राज्यासाठी विशेष तरतुदी केल्याचे अधिक दिसत आहे. महिला, शेतकरी, विद्यार्थी, युवा उद्योजक यांच्यासाठी कोणतेही विशेष तरतुदी नाहीत कर्जमाफी तसेच जीएसटी हा लादलेला जिहादी कर कमी होईल असेल वाटत असतानाय कोणतेही तरतूद नाही. आजच्या अर्थसंकल्पानंतर शेअर बाजार खूप मोठ्या फरकाने खाली आला म्हणजेच एकंदरीत निराशेचं वातावरण आहे असे दिसते. महाराष्ट्रवासियांनी दिलेल्या भरभरून मतांची ही अशी परतफेड या सरकारने केली आहे.

**- काकासाहेब कुलकर्णी,**
प्रदेश प्रवक्ता, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

## संशोधनास प्राधान्य देणारे अंदाजपत्रक



सुमारे ५०,००० 'अटल टिंकरिंग लॅब'च्या माध्यमातून सरकारी शाळेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण, 'कौशल्य विकास'यासाठी पाच राष्ट्रीय 'सेंटर ऑफ एक्सलन्सची' निर्मिती, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षणासाठी सुमारे ५०० कोटी, विशेषतः संशोधनासाठीच्या सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी सुमारे २०,००० कोटी, आयआयटी व आयआयएससी मध्ये तंत्रज्ञान संशोधनासाठी दहा हजार जणांना फेलोशिप प्रोग्राम, स्टार्टअप साठी 'डीप टेक फंड ऑफ फंड', डिजिटल भारतीय भाषा पुस्तक योजना, ई-व्हिसा सेवेमध्ये सरलता इत्यादीच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर नोंदणी, सेवा व संशोधना बरोबर इतर सर्व संबंधित बाबींसाठी अंतर्भूत केल्याचे दिसते.

**- प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर,**
इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन, नवी दिल्ली

## शेतकऱ्यांसाठी महत्त्वकांक्षी योजनांचा समावेश



शेतकऱ्यांच्या विविध योजनांना गती मिळवून देण्यासाठी आर्थिक तरतूद केलेली आहे. शेतकऱ्यांना शेतीमध्ये पतपुरवठा होण्यासाठी किसान क्रेडीट कार्डची पाच लाखांची मर्यादा वाढवल्यामुळे खेळते भांडवल होण्यास मदत होणार आहे. तसेच ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी छोट्या छोट्या उद्योग व्यवसायांमध्ये केंद्र शासनाने गुंतवणूक केलेली आहे. अर्थसंकल्पात तेलबिया कडधान्ययुक्त भविष्यात भारत बनविण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचा संकल्प केला आहे.

**- प्रा. सुहास पाटील,**
राज्य प्रवक्ते, रयत क्रांती संघटना

## अगोदर विश्वास; मग तपासणी



आयकर खात्याने आता नवीन कार्यपद्धती सुरू केली आहे. अगोदर विश्वास मग तपासणी. करदात्यावर संपूर्ण विश्वास ठेवण्याची सरकारची तयारी आहे. ही आनंदाची बाब आहे. मात्र ज्यांचे आर्थिक व्यवहार संशयास्पद वाटतील त्यांची तपासणी नंतर होणारच आहे. आयकर विवरणपत्र दाखल केलेले असो अथवा नसो. २०२५ च्या अर्थसंकल्पातील हे वैशिष्ट्य लक्षात घ्यावे लागेल. नवीन क्रम प्रमाणे नवीन करप्रणाली मध्ये ते करण्यात आले आहेत. गरीब, तरुण, शेतकरी आणि महिला वर्ग यांच्यावर अंदाजपत्रकात लक्ष दिले आहे. असे असूनही केवळ २-५ कोटी करदात्यांना दिलेल्या सवलतीचा गवगवा जास्त झाला आहे.

**- श्रीनिवास वैद्य, सीए**

## सर्वसामान्य करदात्यांना दिलासा



बजेटमध्ये वित्तमंत्र्यानी सामान्य करदात्याला दिलासा दिला आहे. मागील वर्षी करमर्यादा रु.७ लाख होती ती वाढवून २०२५-२६ साला साठी १२ लाख करण्यात आली आहे. यामुळे नोकरदार वर्ग व सर्वसामान्य व्यवसायीक यांना खूप दिलासा मिळाला आहे. याबरोबरच शेतकरी वर्गासाठी किसान क्रेडिट कार्ड योजना ३ लाखावरून ५ लाख करण्यात आली आहे. स्ट्रीट वेंडर स्वयं रोजगार साठी पी.एम स्वनिधी योजना १०००० वरून ३०००० करण्यात आली आहे. शेती, परदेशी गुंतवणूक, शैक्षणिक क्षेत्रात विविध सकारात्मक बदल करण्यात आले. ज्यामुळे जी डी पी वाढण्यास मदत होणार आहे.

**-जुबेर मुजावर, सीए., सांगोला.**

## विकासाची गती वाढवणारा अर्थसंकल्प



सन २०२४-२५ साठीचा संसदेत सादर झालेल्या अर्थसंकल्पात गरीब, युवा, शेतकरी व महिला या घटकांसाठी विकासात्मक उपाय योजना केल्याचे दिसून येते. या संदर्भात सूक्ष्म व लघु उद्योगांना मोठा आधार देण्याचे काम केले जाणार आहे. याशिवाय देशाची अर्थव्यवस्था व जनता व नवप्रवर्तन यासाठी मोठी गुंतवणूक केली जाणार आहे. निर्यातीस प्रोत्साहनही दिले जाणार आहे.

**- प्रा. डॉ. संतोष कदम,** संतोष भीमराव पाटील कॉलेज, मंद्रुप

## देशाला विकासाकडे नेणारा अर्थसंकल्प

वित्त मंत्री ना.निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत अर्थसंकल्प सादर केला. हा अर्थसंकल्प देशाला विकासाकडे नेणारा आहे. उद्योग, शेती, तंत्रज्ञान या सर्व क्षेत्राच्या विकासाचा विचार अर्थसंकल्पात दिसून येतो.आता कोणत्याही निवडणुका समोर नसताना देखील मध्यम वर्गीय नोकरदारांना प्राप्ती करात सवलत देत मोठा दिलास दिलेला आहे.त्यामुळे शिलकीत राहिलेले पैसे बाजारात येतील आणि व्यापाराला उद्योगाला चालना मिळेल असे वाटते.

**- देवेंद्र मदने सोलापूर.**

## गुंतवणूकदारांसाठी अनुकूल बजेट



अर्थसंकल्प हा मध्यमवर्ग, आर्थिक विकास आणि ताळेबंद वित्तव्यवस्थेवर केंद्रित असून कर संरचनेत सुधारणा करण्याचा प्रयत्न आहे. कर सूट मर्यादा वाढवली. १२ लाख वार्षिक उत्पन्नापर्यंत करमुक्त मर्यादा वाढविल्याने मध्यमवर्गाला मोठा दिलासा मिळेल व ग्राहक खर्च वाढेल. अर्थसंकल्पात सुलभ कर संरचना करण्यात आली आहे. नवीन कर स्लॅबमुळे कर भरणाऱ्यांना दिलासा मिळेल आणि अनुपालन सुलभ होईल. राजकोषीय तूट व्यवस्थापन कर कपातीसह वित्तीय तूट ४.४ टक्के जीडीपीपर्यंत नियंत्रित ठेवणे आव्हानात्मक राहील.

**- आरती बेत, कंपनी सचिव**

## मध्यमवर्गाला बळ देणारा अर्थसंकल्प



मागील सर्व अर्थसंकल्पमधील मध्यम वर्गीयांसाठीची झालेली हिरमोड या अर्थसंकल्पामध्ये भरून काढायचा प्रयत्न अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलेले दिसते. २०२५ च्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या वर्षीच्या बजेटमध्ये विशेषतः मध्यमवर्गीय कुटुंबांना एक मोठी भेट दिली. नवीन कर प्रणाली नुसार १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही टॅक्स (आयकर) लागणार नाही तर, नवीन कर स्लॅबमध्ये १२ लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्यांनाही फायदा होईल.

**- ओंकारेश्वर उटगे, सीए, अक्कलकोट**

## क्रीडा क्षेत्रासाठी समाधानकारक तरतूद



३७९४.३० कोटी तरतूद केंद्रीय अर्थसंकल्पात क्रीडा क्षेत्रासाठी करण्यात आली आहे. क्रीडा क्षेत्रासाठी अर्थसंकल्पमध्ये ही चांगली तरतूद केली आहे. विशेषकरून खेलो इंडियासाठी १००० कोटीची तरतूद ही ग्रामीण भागातील पायाभूत क्रीडा उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून अपेक्षित अशी आहे.

**- प्रा. सचिन गायकवाड,**
व्यवस्थापन परिषद सदस्य, सोलापूर विद्यापीठ.

## विकासाभिमुख बजेट



आजच्या केंद्रीय अर्थसंकल्पात अर्थव्यवस्थेच्या प्रगतीला चालना देणाऱ्या तरतुदी दिसून येतात. करप्रणालीतील सुधारणा आणि मध्यमवर्गीय करदात्यांना दिलासा देणाऱ्या सवलती या स्वागतार्ह पाऊले आहेत. तसेच, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना, शेती, मत्स्यशेती, ग्रीन एनर्जी, जल व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रांना प्रोत्साहन देणाऱ्या तरतुदी अर्थव्यवस्थेच्या मजबुतीसाठी महत्त्वपूर्ण ठरतील. एकंदरीत, हा बजेट विकासाभिमुख असून दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य साध्य करण्यास मदत करेल.

**- जयेश रेलकर, सीए. सोलापूर**

## सामान्य करदात्यांना दिलासा



केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या २०२५ च्या अर्थसंकल्पात सामान्य करदात्यांना दिलासा दिला आहे. नवीन करप्रणालीनुसार वैयक्तिक रु. १२ लाखापर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले आहे. तर करपात्र रकमेची मर्यादा रु. ४ लाखापर्यंत वाढवली आहे. जुन्या करप्रणालीत करपात्र रकमेत कोणताही बदल केलेला नाही. काही उत्पन्नस्त्रोतावर कर कपात (ढळ्ड) सामान्य करदात्यांना रु.५० हजार व ज्येष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या ठेवीवरील व्याज रक्कम रु.१ लाख इतकी मर्यादा वाढवली आहे.

**- किशोर आदोने, सीए.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०१७

**सकळां इंद्रिया हे माझी विनंती ।**
**नका होऊ परतीं पांडूरंगा ।।**

देहावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक जीवाला हा देह गुटगुटीत व शक्तीशाली राहावा असे वाटत असते. विशेष म्हणजे यासाठी माणूस प्रयत्नशीलही असतो. देहापेक्षा मन सुदृढ राहावे असे फार कमी लोकांना वाटते. शरीर सुदृढ असल्यास मन सुदृढ असते हे जरी सत्य असले तरी शरीराच्या पुष्टीकडे लक्ष देण्याला मर्यादा असाव्यात. मर्यादा ओलांडून शरीराचा लळा पुरवू गेला म्हणजे आपण आपल्या हातून निसटण्याची भिती निर्माण होऊ शकते. त्याचे कारण शरीराचा लळा पुरविणे म्हणजे कळत न कळत इंद्रियांचा लळा पुरविणे होय. इंद्रियांचा लळा पूर्णतः पुरविणे कोणालाही जमले नाही. कारण त्यांचा जेवढा लळा पुरवला तेवढा त्याच्यात वाढच होत जाते. आता पुरे झाले असे इंद्रिय कधीही म्हणत नाहीत. असे असते तर वृध्दांकडून कधी वाईट घडले नसते. इंद्रियांना वयाशी कांहीच देणे घेणे नसते.


तुकाराम महाराज

आपली इंद्रिये आपल्या ताब्यात नसतील तर आपण आपले नसतो. हे सत्य असल्याने आपण आपल्या इंद्रियांना सूचना देतो, विनंती करतो की, हे सर्व इंद्रियांनो असे कांहीच करू नका की जेणे करून माझ्यावर पांडूरंगापासून दूर जाण्याची वेळ येईल. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, सकळां इंद्रिया हे माझी विनंती। नका होऊ परतीं पांडूरंगा।।

पांडूरंग हे सद्वर्तन, समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम आदीचं प्रतिक आहे. हे प्रतिक जपण्यासाठी आपल्या इंद्रियांना समता, बंधुता, निस्वार्थ प्रेम आदिच्या जपवणूकीसाठी पुढाकार घ्यायला हवा. अर्थात डोळ्यांनी कधीच वाईट बघू नये, डोळ्यात कोणासाठी क्रोध नको, कानांनी वाईट ऐकावे लागेल असे वर्तन नको, तोंडांनी कोणाला टाकून बोलू नये. तसेच आपल्या इतर इंद्रियांनी, अवयवांनी कोणाला टोचेल, कोणी दुखावला जाईल, कोणाचे नुकसान होईल असे कांही करू नये. इंद्रियांकडून चांगुलपणाची जोपासणूक करून घेण्याची आपलीच जबाबदारी असते. इंद्रियच आपली असल्याने कोणीतरी दुसऱ्यांनी त्यांच्यावर नियंत्रण ठेवावे, अशी अपेक्षा करणे चुकीचे असते. आपल्या इंद्रियांना आवाक्याबाहेर जाऊ देण्यास आपणच कारणीभूत असतो. फक्त एवढीच इच्छा पूर्ण करतो आणि त्यानंतर मात्र कांही करणार नाही, म्हणून चालत नाही. अर्थात, जी चुकीची इच्छा आहे ती त्याच क्षणी थांबवली पाहिजे. इंद्रियांचा एक लळा पूर्ण केला म्हणजे दुसरा लगेच तयारच असतो. म्हणून एक-दोन असा विचार न करता त्याच्या मुळावरच घाव घालायला हवा. इंद्रिय लळ्यावरील हा घाव दु:ख न देता सुख देतो हे लक्षात असू द्यावे. इंद्रीयाचे लळे कधीच पूर्णत्वास जाऊ शकत नसतात. त्यामुळे त्यांना नियंत्रित करून आनंदी राहणे योग्य असते. आपली चूक इतरांनाही दु:ख देऊ शकते. चुकीला प्रामुख्याने इंद्रियच कारणीभूत असतात, हे या प्रसंगी लक्षात असू दयावे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# ‘दोरखंड’ एकांकिकेतील प्रकाश योजना, नेपथ्यास प्रथम पारितोषिक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत नाट्य परिषद महानगर शाखेच्या ‘दोरखंड’ या एकांकिकेतील प्रकाश योजना व नेपथ्यास प्रथम क्रमांकाचे दोन हजार रुपयाचे पारितोषिक सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र तसेच सांघिक निर्मितीस उत्तेजनार्थ पाच हजार रुपयेचे पारितोषिक मिळाले.



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती शाखा मुंबई येथील यशवंत नाट्यगृह दादर मुंबई येथे ही स्पर्धा झाली. यात महानगर शाखा सोलापूर यांच्या दोरखंड या एकांकिकेतील शाखेचे अध्यक्ष प्रा. अजय दासरी व अस्तित्व मेकर्स फाउंडेशनचे सचिव किरण लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल साळवे लिखित संजय सावंत यांनी दिग्दर्शन केलेल्या व गोवर्धन कमटम संघ प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली होती. या एकांकिकेतील नेपथ्यमध्ये सोमनाथ लोखंडे व प्रकाश योजनेमध्ये दीपक शिंदे यांचा प्रथम क्रमांक आल्याबद्दल प्रमुख पाहुणे सिने-नाट्य दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी व मध्यवर्ती शाखेचे प्रमुख कार्यवाह अजित भुरे यांच्या हस्ते गौरव करून सन्मान करण्यात आला.

एकांकिकेचे लेखक अमोल साळवे आहेत. यामध्ये सागर देवकुळे, सई दरेकर, श्रावणी लोखंडे, अभिजीत दुपारगुडे, सौरभ रंगदाळ, वेदांत पावटे व धनश्री कोल्हापूरे यांची प्रमुख पात्रे होती. या एकांकिकेसाठी तंत्रज्ञ-संगीत संयोजन आयुष लोकरे, वेशभूषा अमृता गोसावी, रंगभूषा श्रावण ओमप्रकाश, रंगमच संयोजन विजय बादगुडे, हनुमंत मते, रजनी दळवी, अमित रोडगे व नागेंद्र माणेकरी यांनी केले आहे.यांचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, प्रा. अजय दासरी, विजय साळुंखे, चेतनसिंह केदार, सुभाष कदम, डॉ. मंदार सोनवणे, सोमशंकर घाणेगावकर, मध्यवर्ती शाखेचे सहकार्यवाह दिलीप कोरके, बाल रंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार, महाराष्ट्र राज्य साहित्य परिषदेच्या डॉ. माधुरी भोसले, आतरराष्ट्रीय नाट्यकौन्शिल समितीचे सचिव सुमित फुलमामडी, प्रशांत बडवे, स्वरांजली चॅनेलचे संस्थापक दयानंद मामड्याल, नरेंद्र काटीकर, रेणुका बुधाराम, वसुंधरा शर्मा, इकबाल नदाफ, दत्तात्रय पवार, व राजेश राऊळ यांनी अभिनंदन केले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल१८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती मो.
९९६००५३५२१

### अलकः- (३९) प्रार्थना (३)

आशय :- (३) स्वाभिमानी लोकांचे सामूहिक व सुसंघटित जीवन हाच कोणत्याही राष्ट्राचा खरा पाया असतो. तो विस्कटू नये म्हणून आपण परमेश्वर स्वरूप भारत मातेला अजेय शक्ती मागितली. ज्यामुळे आम्ही धर्मपालक व धर्मरक्षक- वीरव्रतधारी बनू. समर्थ रामदास स्वामी म्हणतात समर्थाचिया सेवका वक्र पाहे असा सर्व भूमंडळी कोण आहे.

संघ प्रचारक श्री पालकर म्हणतात. बलानेच राष्ट्रे वरी नित्य येती। बलानेच स्वातंत्र्य गीतास गाती। समर्था मिळे मुक्तीचा गोड ठेवा। तरी देश सामर्थ्यशाली करावा ।।

जगात संघर्ष ही एक अनिवार्य बाब आहे. त्यामुळे प्रत्येक हिंदू मध्ये पुरेशी प्रतिकारशक्ती असणे ही एक अत्यंत गरजेची गोष्ट आहे. त्यासाठी शरीर व मन दोघेही दुबळे नको. आम्हाला युद्ध नको. पण युद्ध टाळण्यासाठी समर्थपणे सज्ज राहणे हाच उपाय आहे. प्रार्थनेचे शेवटचे कडवे संघाचा उद्देश आहे. संघाला अखिल भारतीय हिंदूंचे संघटन करावयाचे आहे. मातृभूमीच्या कल्याणासाठी प्रथम आणि अंतिम उत्तरदायित्व हिंदूंचेच आहे. कोटी कोटी चा हिंदू समाज एक एकटा राहतो; असे होऊ नये म्हणून संघटना हवी. तरच समर्थपणे माझी भारतमाता परम वैभवाकडे नेण्याचा संकल्प पूर्ण होऊ शकेल. त्यासाठी आपण सदाचारी होऊ या. तेव्हा दिशा दिशा मे घूम रहा। अब हिंदू का जयकारा है। यही सदी हिंदू की होगी। यही समय की धारा है ।। त्याचे स्वागत समर्थपणे करूया. ।। भारत माता की जय।

नमस्कार मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रार्थनेचा अर्थ आणि आशय हे दोन्हीही लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थ हा सर्वसामान्यतः प्रचलित आहे तोच घेतला आहे. आशय मात्र मला जसा उमजला तसा लिहिला आहे. या प्रयत्नाबद्दल आपला अभिप्राय कळवल्यास उपकृत होईन.

**- क्रमशः**

# अनुसूचित जातीच्या आरक्षण वर्गीकरणासाठी शुक्रवारी मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणासाठी हैदराबाद येथे शुक्रवार दिनांक ७ फेब्रुवारी रोजी पद्मश्री मंदा कृष्ण मादिगा यांच्या नेतृत्वाखाली हलगी मोर्चा काढण्यात येणार आहे. या आंदोलनात सोलापुरातून सकल मातंग समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत, अशी माहिती एमआरपीएसचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष सत्यम मादिगा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हैदराबाद येथे आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू, महाराष्ट्र, तेलंगणातील सुमारे एक लाख हलगी वादक एकत्र येऊन अनुसूचित जातीचे अ, ब ,क, ड वर्गीकरणासाठी आंदोलन करण्यात करणार आहेत. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती मध्ये उपवर्गीकरण करण्याची परवानगी राज्यांना सर्वोच्च न्यायालयाने एक ऑगस्ट २०२४ च्या ऐतिहासिक निकालाने दिली आहे. असे असताना काही राज्य सरकारने चाल ढकल करत आहेत. याकडे लक्ष वेधण्यासाठी या हलगी मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य आरक्षण देण्याची पद्धत आणि प्रमाण ठरवू शकते. राज्य हे आरक्षणाचे उपवर्गीकरण करू शकते. या सर्व मुद्द्यांसह जात या घटकाचा विचार करून हे वर्गीकरण जातीय लोकसंख्येच्या आधारावर मागासलेपणा मोजून (इम्पेरिकल डाटा) न्यायिक आयोग नेमून ज्या त्या राज्य शासनाने करावे या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात येत आहे. या पत्रकार परिषदेत माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, माजी सभागृह नेते देवेंद्र भंडारे, सुरेश पाटोळे, नागनाथ कासलोलकर, सुधाकर पाटोळे, रोहित खिलारे, प्रवीण वारे आदी उपस्थित होते.

## ब्रह्मप्रतिष्ठानच्या वधू-वर परिचय पुस्तिकेचे सोमवारी प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

येथील ब्रह्म प्रतिष्ठान या संस्थेतर्फे प्रतिवर्षी वधू-वर परिचय पुस्तिका काढण्यात येते. त्याप्रमाणे याही वर्षी ब्राह्मण वधू वर परिचय पुस्तिका काढण्यात येत आहे. त्या पुस्तिकेचे प्रकाशन सोहळा सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाच वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम विजापूर रोडवरील द्वारकाधीश मंदिरात मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास संस्थेचे सर्व हितचिंतक, कार्यकर्ते, सभासद, कार्यकारिणी सदस्य, पदाधिकारी वधू-वरांचे पालक, नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा सुजाता देशपांडे आणि सचिव संजय गोखले यांनी केले आहे.



# प्लास्टिक ऐवजी कापडी, कागदी, ज्यूटची पिशवी वापरा

**● प्लास्टिक बंदीबाबत व्यापाऱ्यांच्या कार्यशाळेत अतिरिक्त आयुक्त रवी पवारांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्यावतीने प्लास्टिक बंदी बाबत शहरातील व्यापाऱ्यांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. सर्व शहरवासीयांनी आणि व्यापाऱ्यांनी प्लास्टिकची पिशवी न वापरता कापडी, कागदी किंवा ज्यूटची पिशवीचा वापर करावा असे आवाहन अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केले.

सोलापूर महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून शहरात प्लास्टिक बंदीची कारवाई हाती घेण्यात आली आहे. कारवाई करतेवेळी बंदी असलेल्या प्लास्टिक बाबत व्यापाऱ्यांमध्ये संभ्रम असल्याचे निदर्शनास आल्यामुळे आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांनी संपूर्ण शहरातील सर्व व्यापाऱ्यांची शंका दूर करण्याच्या हेतूने महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृह येथे प्लास्टिक बंदीबाबत कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत अतिरिक्त आयुक्त रवी पवार व सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी उपस्थित व्यापाऱ्यांना प्लास्टिक बंदीच्या सविस्तर माहितीचे प्रेझेंटेशन केले. बंदी असलेले प्लास्टिक व इतर साहित्याचे सादरीकरण करून समक्ष सर्व व्यापाऱ्यांमध्ये असलेल्या शंका दूर करण्यात आल्या. या कार्यशाळेत व्यापाऱ्यांच्या शंकेचं निरसन करण्यात आले. कार्यशाळेनंतर सर्वांनी मिळून सिंगल युज प्लास्टिक न वापरण्याची शपथ घेण्यात आली. यावेळी मुख्य सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार, सर्व मुख्य आरोग्य निरीक्षक, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, पार्क स्टेडियम व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष केतन शहा उपस्थित होते.

# रोटरी क्लबतर्फे व्होकेशनल पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीतर्फे वेगवेगळ्या व्होकेशनल क्षेत्रात उल्लेखनीय सेवा बजावत असलेल्या पाच व्यक्तींना व्होकेशनल पुरस्कार देऊन समानित करण्यात आले.




यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डीजीएन जयेश पटेल तर व्यासपीठावर अध्यक्ष रविराज दरेकर व सचिव अकबर नदाफ उपस्थित होते. प्रस्ताविक अध्यक्ष रविराज दरेकर यांनी केले. महेश साळुंके यांनी सर्वांचे स्वागत केले व सत्यम दुधनकर यांनी पुरस्कार घेणाऱ्यांची नांव जाहीर केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी सोलापूर स्मार्ट सिटीचे पदाधिकारी प्रा. बसवराज बिराजदार, नागेश शेंडगे, योगीनाथ कुडते, अनिल चंडक, विठ्ठल वंग्गा, इकबाल बागवान यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन महेश साळुंके यांनी केले तर आभार अकबर साहेब नदाफ यांनी मानले.

**यांचा झाला सन्मान :** डीटीपी ऑपरेटर बालाजी म्हंता, मेकॅनिकल दीपक चव्हाण, इलेक्ट्रिशियन मनोहर वाकीटोल व सिध्देश्वर हंचाटे, फॅब्रकेटर बाबू मोरे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २ फेब्रुवारी २०२५ | वसंती श्री पंचमी, विठ्ठल-रुक्मिणी विवाह सोहळा |
| विक्रम संवत् २०८०-८१ | ....राहू काल.... |
| शके - १९४६ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| मास - फाल्गुन | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| शु. चतुर्थी - (०९.१४) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - शिशिर | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र - उ.भाद्रपदा (२४.५२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - शिव (०९.१३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| करण - बव (२०.०६) | |

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या :** लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

# जनसामान्यांसाठीचा चमत्कार : विश्वास पाठक

घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक आणि कृषी अशा राज्यातील सर्व ग्राहकांना वीज पुरवठा करणाऱ्या महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे वीज दर वाढविण्यासाठी नव्हे तर आम्हाला दर कमी करू द्या, म्हणून ऐतिहासिक याचिका सादर केली आहे. महावितरण ही सरकारी कंपनी ग्राहकांना वीज देऊन बिले वसूल करत असली तरी या कंपनीला विजेचा दर ठरविण्याचा अधिकार नाही. कायदेशीर तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग राज्यातील वीजनिर्मिती, वहन आणि वितरण करणाऱ्या सरकारी व खासगी कंपन्यांचे दर ठरविते. त्यानुसार दर पाच वर्षानी महावितरण आयोगासमोर आपला जमाखर्च सादर करून विजेचा दर ठरविण्यासाठी याचिका सादर करते. आयोग जनसुनावणी करून निर्णय देतो. आयोगाने ठरविलेला विजेचा दर लागू होतो. दरवेळी महावितरण वीजदरात वाढ करण्यासाठी याचिका दाखल करते पण यावेळी प्रथमच आम्हाला वीजदर कमी करू द्या, म्हणून याचिका दाखल झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात हा चमत्कार घडला आहे.

विजेच्या दरात पाच वर्षाच्या कालावधील टप्प्याटप्प्याने कपात, घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या वीजवापरासाठी प्रती युनिट ८० पैसे ते १ रुपये अतिरिक्त सवलत आणि उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविणे ही महावितरणच्या यावेळच्या याचिकेची तीन ठळक वैशिष्ट्ये आहेत. या बाबी राज्यातील सर्वसामान्य लोकांना दिलासा देण्यासोबतच राज्याच्या आर्थिक विकासाला चालना देणाऱ्या आहेत. महावितरणच्या प्रस्तावाला आयोगाने मान्यता दिल्यानंतर १ एप्रिलपासून हे लाभ मिळू लागतील.

राज्यातील घरगुती वीज ग्राहकांमध्ये महिना १०० युनिटपर्यंतवीजवापरणाऱ्याग्राहकांचे७५टक्केप्रमाणआहे. महावितरणच्या प्रस्तावानुसार या ग्राहकांना सध्या असलेला प्रती युनिट ८ रुपये १४ पैसे हा दर २०२५-२६ या आगामी आर्थिक वर्षात म्हणजे १ एप्रिलपासून ७ रुपये ६५ पैसे इतका कमी करण्यात येईल. पुढे हा दर आणखी कमी करण्यात येईल. पाच वर्षाच्या कालावधीत या ग्राहकांसाठीचा विजेचा दर ५ रुपये ८७ पैसे प्रती युनिट या पातळीवर कमी झालेला असेल. अर्थात या ग्राहकांसाठीचा वीजदर पाच वर्षात २३ टक्के कमी होईल. दरमहा १०० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण २२.४ टक्के इतके आहे. या ग्राहकांसाठीचा सध्याचा प्रती युनिट वीजदर १३ रुपये २४ पैसे इतका आहे. आगामी आर्थिक वर्षात तो प्रती युनिट २५ पैशांनी वाढवून १३ रुपये ४९ पैसे करण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, नंतरच्या वर्षामध्ये हा दर घसरत जाऊन पाचव्या वर्षी ११ रुपये ८२ पैसे होईल. या वर्गासाठी पाच वर्षांत विजेचा दर १२ टक्के कमी होईल. महिना ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण एकूण घरगुती ग्राहकांमध्ये सुमारे ९८ टक्के आहे व त्यांना दिलासा देण्यात आला आहे.



**दिवसा वीज वापरा सवलत मिळवा**

घरगुती ग्राहकांसाठी आणखी एक महत्त्वाची भेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महावितरण या सरकारी कंपनीने देऊ केली आहे. घरगुती ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत वापरलेल्या विजेच्या अतिरिक्त सवलत देण्यात येईल. आगामी २०२५ २६ या आर्थिक वर्षात प्रती युनिट ८० पैसे, त्यानंतरच्या चार वर्षांमध्ये दरवर्षी ८५ पैसे, ९० पैसे, ९५ पैसे आणि १ रुपया अशी सवलत मिळेल. कोणत्या वेळेला वीज वापरली त्यानुसार वीजदरात सवलत देण्याला तांत्रिक भाषेत टीओडी (टाईम ऑफ डे) म्हणतात. टीओडीची सवलत आतापर्यंत केवळ उद्योगांना होती. आता ती घरगुती ग्राहकांनाही देण्यात येणार आहे. या सवलतीचा वापर करण्यासाठी कोणत्या वेळी किती वीज वापरली याची नोंद ठेवणारा टीओडी मीटर बसविणे आवश्यक असते. महावितरण हा मीटर ग्राहकांना मोफत बसवून देत आहे. त्यामुळे जे ग्राहक हा मीटर बसवून घेतील त्यांना १ एप्रिलपासून वीजदरात आणखी सवलत मिळविता येईल. एक एप्रिलनंतर दिवसा ८० पैसे प्रती युनिट सवलतीचा वापर करून १०० ते ३०० युनिट वीज वापरणारे ग्राहक त्यांच्यासाठीच्या दरातील २५ पैशांच्या वाढीवर मात करू शकतात.

**उद्योगांसाठीचे स्वप्न साकारले**

राज्यात महावितरण शेतकऱ्यांना सरासरी वीजदराच्या तुलनेत ८२ टक्के सवलतीने वीज पुरविते. शेतकऱ्यांना वीजदरात सवलत देण्यासाठी उद्योगांच्या वीजदरात वाढ करून भरपाई केली जाते. त्याला क्रॉस सबसिडी म्हणतात. यामुळे उद्योगांसाठीच्या वीजदरात वाढ होते. क्रॉस सबसिडीचा बोजा हटवावा, अशी उद्योगांची अनेक दशकांची मागणी आहे. राज्यात उद्योगधंद्यांची वाढ होऊन रोजगार व संपत्तीची निर्मिती होण्यासाठी हे आवश्यकही आहे. अखेरीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात उद्योगांवरील क्रॉस सबसिडी हटविण्याचे स्वप्न साकारले आहे. आगामी आर्थिक वर्ष २०२५ २६ पासून म्हणजेच १ एप्रिलपासून उद्योगांना सरासरी वीज पुरवठा दरानुसार दर आकारण्याचा महावितरणचा प्रस्ताव आहे. त्यामुळे इतिहासात पहिल्यांदाच उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविण्यात यश आले आहे. अनेक वर्षे स्वप्न पाहिलेले अटल सेतू, मुंबईचा कोस्टल रोड, नागपूर मुंबई समृद्धी महामार्ग हे अशक्य वाटणारे प्रकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात साकारले आहेत. त्याच पद्धतीने उद्योगांवरील क्रॉस सबसिडी हटविण्याचे स्वप्न साकारत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने उद्द्योगांच्या बाबतीत आणखी एक यश मिळविले आहे. आगामी पाच वर्षात टप्प्याटप्प्याने उद्योगांच्या वीजदरात कपाल करण्याचा प्रस्ताव महावितरणने मांडला आहे. त्यासोबतच डेटा सेंटर, सेमीकंडक्टर अशा सनशाईन इंडस्ट्रीसाठी हरित ऊर्जा कोणताही अतिरिक्त आकार न देता उपलब्ध करण्याचाही प्रस्ताव महावितरणने मांडला आहे.

**हा चमत्कार कसा झाला ?**

शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी पाच वर्षे मोफत वीज, त्यांना दिवसा आणि भरवशाचा वीज पुरवठा करणार, घरगुती ग्राहकांच्या वीज दरात पाच वर्षात टप्प्या टप्प्यांनी कपात करणार, घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरण्यास अतिरिक्त टीओडी सवलत देणार, औद्योगिक ग्राहकांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविणार, उद्योगांचा वीजदर कमी करणार... हा वीज क्षेत्रातील चमत्कार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात हा चमत्कार कसा झाला, हे समजून घेणे आवश्यक आहे. गेली अडीच वर्षे मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याने सौर ऊर्जेसह अपारंपरिक ऊर्जेच्या वापरावर भर दिला आहे. आगामी काळात २०३५ पर्यंतची विजेची गरज भागविण्यासाठी ४२,००० मेगावॅटच्या वीजखरेदीचे करार करण्यात आले आहेत. यामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पाचा समावेश आहे. याखेरीज पंप स्टोरेज या आधुनिक जलविद्युत तंत्रासह, बॅटरी स्टोरेज, पवन ऊर्जा यांच्या माध्यमातून वीज मिळणार आहे. ही सर्व वीज पारंपरिक विजेपेक्षा खूप स्वस्तात मिळणार आहे. सौरऊर्जेसह अपारंपरिक ऊर्जेचा वापर करण्यामुळे आगामी पाच वर्षात महावितरणचे वीजखरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. मा. देवेंद्र फडणवीस यांनी काळाची पावले ओळखून अपारंपरिक ऊर्जावापरावर भर दिल्यामुळे ही बचत होणार आहे. परिणामी वर उल्लेख केल्याप्रमाणे वीज क्षेत्रातील चमत्कार होणार आहे. याचा सर्वात मोठा लाभार्थी राज्यातील सर्वसामान्य घरगुती ग्राहक, शेतकरी, उद्योजक आणि व्यावसायिक असेल. करण्यासाठीचे हे ऐतिहासिक पाऊल आहे.

**- लेखक महावितरणचे स्वतंत्र संचालक आहेत**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### टेंभुर्णीत हिंदू खाटीक समाजातर्फे हळदी-कुंकू कार्यक्रम

**टेंभुर्णी, दि. १ फेब्रुवारी-**

हिंदू खाटीक समाज टेंभुर्णी शहराच्या वतीने हळदी-कुंकू कार्यक्रम पार पडला. उपस्थित महिलांसाठी लकी ड्रॉ काढण्यात आला. या कार्यक्रमाला ८०० महिलांनी उपस्थिती दर्शविली. लकी ड्रॉसाठी प्रथम बक्षीस ३२ इंची एलईडी टीव्ही पूजा जयंत कांबळे व माया सुभाष इंगोले यांच्याकडून बक्षीस देण्यात आले. दुसरे बक्षीस ओव्हन दीपा कुमार इंगोले व शिवानी गजानन कांबळे, तिसरे बक्षीस पूर्ण किचन सेट मेघना मनोज पलंगे, चौथे बक्षीस कुकर सेट सुरेखा विनोद रांजणकर, पाचवे बक्षीस एक पैठणी साडी मनिषा गणेश कांबळे यांच्याकडून देण्यात आले. यावेळी सरपंच सुरजाताई बोबडे, उपसरपंच राज्यश्रीताई नेवसे, लताताई देशमुख, सविताताई कोकाटे, पुनमताई कुटे, स्वरूपाताई बोबडे, स्वरालीताई बोबडे, मोनिकाताई बोबडे, सुषमाताई होदाडे, सुजाताताई ताबे, डॉ. मीनाक्षी गायकवाड, डॉ. गोरे, महिला अध्यक्ष पूजा जयंत कांबळे, उपाध्यक्षा दीपाकुमारी इंगोले, सचिव मेघना मनोज पलंगे, शहराध्यक्ष गणेश इंगोले, उपाध्यक्ष गजानन कांबळे, सचिव मनोज पलंगे, खजिनदार मकरंद कांबळे, कार्याध्यक्ष आशुतोष पलंगे, सहसचिव सागर क्षीरसागर उपस्थित होते.



### उपळे दुमालाच्या वखारिया विद्यालयात महेश उकिरडे यांचे व्याख्यान

**बार्शी, दि. १ फेब्रुवारी-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त आयोजित कर्मवीर सप्ताह व्याख्यानमालेत इतिहासाचे अभ्यासक महेश उकिरडे यांचे मरावे परी, किर्तीरुपे उरावे! या विषयावर व्याख्यान झाले. जीवन कसे जगावे, आपण समाजाचे काही देणे लागतो, या भावनेने काम करीत राहिले पाहिजे, कर्मवीर मामासाहेबांनी आपल्या संसारातून निवृती घेऊन खऱ्या अर्थाने आपले नाव सार्थक केले, असे त्यांनी सांगितले. प्रारंभी मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, व्याख्याते महेश उकिरडे यांनी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे, छत्रपती शिवाजी महाराज आणि दीपचंद वखारिया यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. प्रास्ताविक महाले यांनी केले तर आभार मकरंद जगदाळे यांनी मानले. यासाठी तवले, समृद्धी ठोंगे यांनी परिश्रम घेतले.



### विश्व अकॅडमीचे स्नेहसंमेलन उत्साहात

**अक्कलकोट, दि. १ फेब्रुवारी-**

शिवपुरी, अक्कलकोट येथील विश्व अकॅडमी इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. संगीतकार आर. डी. बर्मन पंचम यांच्या संगीतावर आधारित बहारदार नृत्य नर्सरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. यावेळी डॉ. पुरुषोत्तम महाराज राजीमवाले, डॉ. गिरिजादेवी राजीमवाले, शांभवीताई कल्याणशेट्टी, शाळा प्रमुख गायत्री पारखे, अभिजित स्वामी, निदा इंडिकर, आकांक्षा वाडे, सूरज चव्हाण, गिरीष लोखंडे उपस्थित होते. आरडीच्या व्यक्तिमत्त्वाचे उत्तम सादरीकरण श्रेयस नागठाण या विद्यार्थ्याने केले. अर्धनारीनटेश्वर स्वरूपाचे शास्त्रीय नृत्यातील आविष्काराने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. कमांडो कॅडेट फोर्सचे सज्जन इंगळे यांच्या प्रशिक्षणाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कसरती हे नाविन्यपूर्ण होते.



### अक्कलकोट येथील खेडगी शिशु विहारात स्नेहसंमेलन साजरे

**अक्कलकोट, दि. १ फेब्रुवारी-**

अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित मातोश्री नील्लव्वाबाई चनबसप्पा खेडगी शिशु विहार, प्राथमिक व माध्यमिक प्रशालेचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्षा शोभा खेडगी होत्या. यावेळी तहसीलदार विनायक मगर, गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे, संस्थेच्या उपाध्यक्षा भारती खेडगी, चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, सचिव सुभाष धरणे, व्हाइस चेअरमन अशोक हारकुड, संचालक ॲड. अनिल मंगरुळे, पवित्रा खेडगी, चंद्रकांत स्वामी, श्रीशैल भरमशेट्टी, ज्योती धरणे, प्राचार्य डॉ. शिवराय अडवीतोटे, मुख्याध्यापक जयदीप साखरे उपस्थित होते. यावेळी कला, क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रातील गुणवंत शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. दिग्दर्शन मुख्याध्यापक जयदीप साखरे, स्मिता मणूरकर यांनी केले. सूत्रसंचालन विजयालक्ष्मी भुसणगी व प्रशांत म्हेत्रे यांनी केले.

# करकंब ग्रामपंचायत होणार नगरपंचायत

## नाहरकत, नूतन प्रस्ताव अहवाल दाखल; नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे सकारात्मक

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.१ फेब्रुवारी-**

गेल्या अनेक वर्षापासून करकंब ग्रामपंचायत नगरपंचायत कधी होणार? याबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता होती. या नगरपंचायतीबाबत अनेक तर्कवितर्क, अडचणी, अडथळे निर्माण होत असतानाच अखेर करकंब नगरपंचायत होण्यास राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे हा प्रश्न मार्गी लागणार आहे.



करकंब नगरपंचायत होण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे तालुका सरचिटणीस लक्ष्मण वंजारी यांनी सन २०१७ मध्ये याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. दै. तरुण भारतनेही वृत्त प्रकाशित केले होते. याचीच दखल घेत यासाठी सकारात्मक निर्णय एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. सन २०१८-१९ मध्ये याबाबतचा अहवाल प्राप्त झाला. सन २०20 साली नवीन निवडून आलेल्या ग्रामपंचायतकडे ठरावाची मागणी केली होती. त्याप्रमाणे सन २०२५ ला करकंब ग्रामपंचायतीने नाहरकत दाखला व ग्रामपंचायत ठराव तसेच नव्याने प्रस्ताव अहवाल दिला.ही सर्व कागदपत्रे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ३० जानेवारी रोजी सादर करण्यात आली.

> करकंब नगरपंचायतीचा नव्याने प्रस्ताव अहवाल, ग्रामपंचायतचा ठराव, नाहरकत दाखला याबाबतची सर्व मूळ कागदपत्रे सादर केली आहेत. करकंब नगरपंचायतसाठी माझी भूमिका सकारात्मक असून लवकरात लवकर करकंब नगरपंचायतची पूर्तता करून मी स्वतः करकंब येथे भेट देणार आहे.
> **- एकनाथ शिंदे,**
> उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य


तरुण भारत
करकंब नगरपंचायत होण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज
नूतन वर्षात नागरिकांचे स्वप्न पूर्ण होणार का?; राजकीय भूमिकेकडे सगळ्यांचे लक्ष

यावेळी एकनाथ शिंदे गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख महेश साठे, युवती जिल्हाध्यक्ष प्रियांका पराडे-पाटील, भाजपा तालुका सरचिटणीस लक्ष्मण वंजारी, रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष नंदकुमार व्यवहारे, एसबीसी समाज युवा प्रदेशाध्यक्ष जयंत टकले, आरपीआय तालुका उपाध्यक्ष वंशदिप शिंदे, रयत क्रांती संघटनेचे छगन पवार, सामाजिक कार्यकर्ते धनाजी व्यवहारे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## अंधशाळेतील विद्यार्थ्यांनी लुटला सहलीचा आनंद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ फेब्रुवारी-**

शहीद मेजर कुणाल गोसावी,निवासी अंधशाळा ,पंढरपूर येथील विद्यार्थ्यांची दि.२८ जानेवारी २०२५ रोजी एक दिवसीय सहल आयोजित करण्यात आली होती. या सहलीचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला.

सहलीची सुरुवात पहाटे ५ वा.झाली प्रथम जगातील दुसऱ्या क्रमांकाचे नारायण चिंचोली येथील सूर्यमंदिराचे दर्शन घेतले.रामप्रहरी सुंदर पूजा चालू असताना विद्यार्थ्यांचे दर्शन झाले.नंतर पंढरपूर मोहोळ रस्त्यावरील चंद्रमौळी गणपती दर्शन, वडवळ नागनाथाचे दर्शन घेवून आम्ही बाळे येथील खंडोबा दर्शन घेवून सोलापूर कडे रवाना झालो. सोलापूरला सिद्धेश्वरमंदिराच्या दर्शनाला गेलो. याठिकाणी विद्यार्थ्यांनी गाणी गायली,बागेत फिरून निसर्गाचा आनंद लुटत खूप सारे फोटोही काढले .त्यानंतर तेथील प्रसादाचा लाभ घेतला. त्यानंतर पुढे समर्थ रामदासांनी स्थापन केलेल्या अकरा मारुतीपैकी गौडगाव स्थापित मारुतीचे दर्शन घेतले .वेळोवेळी मुलांना त्या ,त्या ठिकाणाची ऐतिहासिक महत्त्व व माहिती शिक्षकांनी दिली.

यानंतर अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेतले. याठिकाणी देखील मुलांनी स्वामी समर्थ महाराजांचे गीते म्हणली. महाराजांच्या इथे प्रसादाचा लाभ घेतला. त्यानंतर सर्व मुलांना तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी घेऊन गेलो. खूप छान दर्शन घेऊन तुळजापूर तालुक्यातील कारंबा येथे रात्रीच्या जेवणाचा आनंद घेतला. याशिवाय गाडीमध्ये सुद्धा मुलांनी गाण्याच्या भेंड्या, गाणे नाचणे. नकला करणे अशा सर्व गोष्टींचा आनंद घेतला. अशारितीने उत्तम प्रकारे विद्यार्थ्यांची सहल आनंदात पार पडली.

## अक्कलकोट-पंढरपूर पायी दिंडी माघवारीसाठी प्रस्थान

### श्री स्वामी समर्थ भजनी मंडळातर्फे आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ फेब्रुवारी-**


श्री स्वामी समर्थ भजनी मंडळ सलगरा मड्डी येथून (ता. तुळजापूर) तीर्थक्षेत्र अक्कलकोट-पंढरपूर माघ वारीसाठी पायी दिंडी सोहळ्याचे दिंडी पूजन दिनकर पाटील, सरपंच सुनिता अप्पाराव चव्हाण, दिंडीचालक श्रीमुख जगदाळे, मेजर अशोक जगदाळे यांच्या हस्ते करून प्रस्थान झाले.

समस्त ग्रामस्थ सलगरा मड्डी येथून शनिवारी सकाळी पंढरपूर माघवारीसाठी पायी दिंडीचे ग्यानबा तुकाराम, ज्ञानोबा तुकारामचा गजर करीत प्रस्थान ठेवले. पाऊले चालती पंढरीची वाट सुखी संसाराची सोडुनी वाट याचा प्रत्यय या दिंडी सोहळ्यात सामिल वारकऱ्यांकडे पाहता आला. हाथी विणा, भगवी पताका, टाळ-मृदुगांचा गजर करीत ही दिंडी प्रथम तीर्थक्षेत्र अक्कलकोट व तीर्थक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. या दिंडी सोहळ्यात राजेद्र मोरे-पाटील, शशीकांत मोरे, बाळासाहेब मोरे, हरी मुळे, सुलोचना फुलचंद चव्हाण, भारती पाटील, सचिन सावकार, दीपक चव्हाण, घरिष बेंडकाळे, सागर सावकार, संग्राम सोमवंशी, रविंद रोट्टे, पांडुरंग शिंदे, बाळू कोकरे, पद्माकर पाटील, सुभाष कोकरे, मारुती चव्हाण, मुरलीधर पाटील, अनंत पाटील, बालाजी बिराजदार, मुरलीधर बिराजदार व ग्रामस्थ उपस्थित होते.

## तावशीत होणार सामाजिक प्रबोधनाचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ फेब्रुवारी-**

सामान्यपणे कुटुंबातील जवळच्या व्यक्तीचा मृत्यू झाला की, एक वर्षाने त्यांच्या स्मृतीप्रित्यार्थ पुण्यतिथी म्हणून कीर्तन ठेवलं जातं. मात्र, पंढरपूरमधील तावशी गावात एक आगळावेगळा सामाजिक प्रबोधन करणाऱ्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यामुळे पारंपारिक कार्यक्रम साजरा करताना अधिक अर्थपूर्ण पर्याय घेण्याचा नवा पायंडा पडणार आहे. यातून समाजाला अधिक सकारात्मक दिशा मिळणार आहे.



साधना विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, तावशीचे अध्यक्ष सुभाष माधवराव यादव ऊर्फ अण्णा यांचे गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात निधन झाले. ते आट्यापाट्या खेळातील सुरक्या म्हणूनही सुप्रसिद्ध होते. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ रविवारी २ फेब्रुवारी तावशी गावातील विठ्ठलवाडी येथे अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले गेले आहे. सकाळी हभप श्यामसुंदर महाराज सोन्नर यांचे कीर्तन, दुपारी वडिलांवर प्रेम करणाऱ्या माणसांची फिल्म, कविता म्हेत्रे यांचा 'मी सावित्री जोतिराव फुले' हा एकपात्री प्रयोग, बापमाणसाच्या कविता कार्यक्रम, पुस्तक प्रदर्शन, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती, गप्पा, गाणी अशा माध्यमातून हा स्मृतिदिन साजरा केला जाणार आहे. प्रबोधनातून अभिवादन करण्याचा नवा पायंडा या निमित्ताने पडण्यात येत आहे. यावेळी सुषमाताई अंधारे, माजी आ. प्रशांत परिचारक, आ. अभिजीत पाटील, आ. समाधान आवताडे, आ. बाबासाहेब देशमुख, भागीरथ भालके, महेश साठे, वसंतनाना देशमुख, अनिल सावंत, सुभाष मस्के, दिलीपभाऊ धोत्रे, साई सावली फाउंडेशन आणि आजीचं घर, विश्वस्त गौरी सावंत आणि इतर अनेक मान्यवर मंडळी अण्णांना अभिवादन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

## हुतात्मा, उद्यान एक्सप्रेसला जेऊर येथे थांबा द्या

### रेल्वे प्रवासी सल्लागार समितीचे सदस्य प्रदीप पवार यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १ फेब्रुवारी-**

जेऊरला हुतात्मा, उद्यान एक्सप्रेसला थांबा देण्याची मागणी रेल्वे प्रवासी सल्लागार समितीचे सदस्य प्रदीप पवार यांनी केली आहे.



सोलापूर विभागाच्या विभागीय रेल्वे सल्लागार समितीची बैठक गुरुवारी सोलापूर विभागीय रेल्वे कार्यालयात झाली. विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजित मिश्रा या बैठकीचे अध्यक्षस्थानी होते. बैठकीत सदस्यांनी प्रामुख्याने सुविधा व समस्या व सूचना देऊन रेल्वे प्रश्न प्रशासनाची चर्चा केली. विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. मिश्रा, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अंशुमाली कुमार, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील, वरिष्ठ विभागीय परिचालन व्यवस्थापक जे.एन.गुप्ता, वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय) सचिन गणेर आदी उपस्थित होते. तसेच सोलापूर विभागातील रेल्वे प्रवासी सल्लागार समितीचे सदस्य, हेमंत धवलशंक, आकाश गोरे, प्रदीप पवार, भारत जाधव, रामगोपाल लोया, हर्षद मोरे, विनोद भरते, संजय पाटील,बापूगौडा पाटील, डॉ. अस्मिता बालगांवकर यांनी बैठकीत मुद्दे मांडले. या बैठकीमध्ये जेऊर येथे हुतात्मा पुण्याकडे जाण्याच्या दिशेने व उद्यान एक्सप्रेस तसेच दौंड कलबुर्गी शटल ही अनुक्रमे थांब्यासाठी फिजिकल आहेत असा प्रस्ताव जीएम ऑफिसकडून रेल्वे बोर्डाला सादर झालेला आहे. डीआरयुसीसी मेंबर प्रदीप पवार यांनी त्यांच्या अजेंड्यामध्ये विचारलेल्या प्रश्नांना डीआरएम ऑफिसकडून उत्तर मिळाले आहे. जेऊर येथील फूट ओव्हर ब्रिजचे काम प्लॅटफॉर्म सरफेसिंग पेव्हवर ब्लॉक प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर वाढीव निवारा शेडच्या मागण्या सकारात्मक झाल्या आहेत. पारेवाडी रेल्वे स्थानकावर पुण्याच्या दिशेने जाण्यासाठी कुर्ला एक्सप्रेस, भिगवण रेल्वे स्थानकावर हैद्राबाद एक्सप्रेसला थांबा देण्यात यावा तसेच पॅसेंजर गाडीला पोफळज येथे थांबा देण्यात यावा या प्रामुख्याने मागण्या मांडण्यात आल्या. या मिटिंगसाठी अटेंडन्स म्हणून शहीद भगतसिंग प्रवासी संघटना करमाळा तालुका पदाधिकाऱ्यांना बोलवण्यात आले होत. विकली गाडीला सुद्धा जेऊर येथे थांबा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. झेडआरयुसी मेंबर म्हणून हर्षद मोरे यांची निवड करण्यात आली.

## मोडनिंब येथे गणेश जयंती सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १ फेब्रुवारी-**

मोडनिंब (ता. माढा) येथे गणेश जयंती सोहळा धार्मिक व भक्तिमय वातावरणात पार पडला. श्री गणेशाच्या दर्शनासाठी शहरातील दत्तनगर, श्रीराम चौक, आदर्श नगर, यमाई मंदिरांमध्ये भाविकांच्या सकाळपासूनच रांगा लागल्या.गणपती मंदिरात आकर्षक फुलांची सजावट तसेच विद्युत रोषणाई, रांगोळी करण्यात आली होती.सहस्त्रावर्तन, अभिषेक, महापूजा, कीर्तन, प्रवचन, अथर्वशीर्ष पठण अशा विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. भक्त मंडळांच्या वतीने शहरातील विविध मंदिरांमध्ये साग्रसंगीत पूजन, आरतीसह महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते.गणेश जयंतीनिमित्त मंदिरामध्ये फुलांची आरास करण्यात आली होती.

रंगीबेरंगी फुलांनी केलेली ही आरास भाविकांचे लक्ष अधिकच वेधून घेत होती. बाप्पाच्या मूर्ती समोर छोट्या पाळण्यामध्ये श्रीफळ रूपी बाप्पाला बसवून पारंपरिक पाळणा म्हणत बाप्पाचा जन्मोसत्व साजरा करण्यात आला.दुपारी बारा वाजता पुष्प वृष्टी करण्यात आली.फटाक्यांची आतषबाजी झाली नंतर महाआरती झाली. दिवसभर भजनकीर्तन व गणपती भक्तिगीतांचे कार्यक्रम सुरू होते. गजराज गणेश मंदिर येथे युवा किर्तनकार हभप किरण सूरवसे यांचे कीर्तन झाले.जन्मोत्सव सोहळ्याची सांगता महाप्रसादाने झाली. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी दत्तनगर गणेश मंडळ, श्रीराम चौक, आदर्शनगर गजराज गणेश मंडळ यांनी परिश्रम घेतले.



## अक्कलकोटमध्ये दामिनी पथक अस्तित्व दाखवेल का?

### रोडरोमियोंचा सुळसुळाट वाढला; विद्यार्थ्यांना भयमुक्त करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ फेब्रुवारी-**

अक्कलकोट शहरातील विविध महाविद्यालये, शाळा परिसरामध्ये रोड रोमियोंचा सुळसुळाट वाढला आहे. शहरात दामिनी पथकाने रोडरोमियोंना पोलिसी खाक्यासह वर्दीची जरब निर्माण करून विद्यार्थ्यांमध्ये भयमुक्त वातावरण निर्माण करावे, अशी मागणी पालकांसह नागरिकांतून केली जात आहे.



अक्कलकोट शहरातील श्री शहाजी हायस्कूल, मंगरूळे प्रशाला, कन्या प्रशाला, खेडगी कॉलेज, कल्याणशेट्टी महाविद्यालयासह विविध शाळा, प्रशाला आहेत. शाळा भरताना व सुटल्यानंतर काही रोडरोमियो दबा धरून थांबत असल्याने पालक वर्गातून चिंता व्यक्त होत आहे. शाळेभोवती व महाविद्यालयाभोवती येणाऱ्या-जाणाऱ्या किशोरवयीन विद्यार्थिनींना त्रास देणे, छेडणे, अश्लिल हावभाव करणे असे वारंवार करत आहेत. या घटना वारंवार घडत आहेत. यामुळे शालेय विद्यार्थिनी, महाविद्यालयीन विद्यार्थिनी यांच्यामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. भीतीपोटी बेअदबी प्रसंग टाळण्याकडे पालकांचा कल आहे. मात्र यामुळे रोडरोमियोंचे धाडस वाढत आहे.अक्कलकोट शहरात शाळा भरत असताना व सुटत असताना दररोज दामिनी पथक शाळेजवळ गस्त घालण्याची गरज आहे. तसेच शाळेभोवती घुटमळणाऱ्या रोडरोमियोंचा बंदोबस्त करावा, अशी मागणी पालक वर्गातून व विद्यार्थिनींमधून करण्यात येत आहे.

> **अप्रिय घटना घडण्याची भीती**
>
> पोलीस प्रशासनाने वेळीच याकडे लक्ष देऊन रोडरोमियोंवर आळा घालण्याची गरज निर्माण झाली आहे. अन्यथा एखादी अप्रिय घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अक्कलकोट शहरातील मुलींच्या शाळेजवळ दामिनी पथकाने विशेष लक्ष देण्याची गरज आहे. पण तसे दिसून येत नाही. यामुळे कधीतरी दामिनी पथक गस्त घालताना दिसत आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महेश इंगळे, प्रथमेश इंगळे महाकुंभमेळ्यात शाही स्नान करणार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ फेब्रुवारी-**

श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे मित्र परिवाराने उत्तर प्रदेशातील प्रयागराज त्रिवेणी संगम येथील महाकुंभमेळ्यातील शाही स्नानाकरीता रवाना झाले आहेत.



संतोष पराणे, अंकुश केत, श्रीकांत झिपरे, बाळासाहेब एकबोटे, सुनिल पवार, सुरेश वाले, श्रीशैल गवंडी, संजय पवार, मनोज इंगुले, सागर गोंडाळ, दर्शन घाटगे, ज्ञानेश्वर भोसले, तुषार मोरे, धनराज स्वामी, स्वामीनाथ मुसळे यांचा सहभाग आहे. अक्कलकोट ते प्रयागराज (व्हाया अयोध्या, काशी) असे सुमारे १८७० किलोमीटरचा प्रवास करून हा अमृत योग ते जुळवणार आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### तडवळे बीटचा मेळावा उत्साहात

**वैराग, दि. १ फेब्रुवारी-**

आरंभ उपक्रमांतर्गत प्रकल्प वैराग विभाग तडवळे बीटचा बालक-पालक मेळावा पार पडला. अध्यक्षस्थानी जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले होते. यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी रेश्मा पठाण, विस्तार अधिकारी शैलेश सदाफुले, विस्ताराधिकारी सूरज काटकर उपस्थित होते. तडवळे बीटमधील एकूण ११ गावातील ३०० ते ४०० महिला व बालके उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये अंगणवाडी सेविका मदतनीस यांनी बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आले होते. मुलांना कृतीतून तसेच कुटुंबाने वेळ देऊन बालकांचा विकास कसा साधला जातो, याबाबत प्रत्येक स्टॉलमधून वेगवेगळी माहिती मातांना दिली आहे. जिल्हा कार्यक्रमाधिकारी मिरकले यांनी मार्गदर्शन केले. या आरंभ उपक्रमातील मेळाव्याचे आयोजन पर्यवेक्षिका जयश्री गुंड यांच्यासह सेविका, मदतनीस यांनी केले होते.




### कवठेकर प्रशालेच्या स्नेहसंमेलनामध्ये पंढरपूरवासीय झाले मंत्रमुग्ध

**पंढरपूर, दि.१ फेब्रुवारी-**

येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या कवठेकर प्रशालेमध्ये स्नेहसंमेलन पार पडले. या कार्यक्रमांमध्ये प्रशालेच्या गेल्या ७५ वर्षाच्या परंपरेला व संस्कृतीला साजेसा असा उत्कृष्ट कलोत्कट व विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना वाव देणारा असा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. ४०० विद्यार्थ्यांनी अत्यंत उस्फूर्तपणे कलाविष्कार सादर केला. पण मर्यादित जागेच्या अभावी २९ व ३० जानेवारी या दोन दिवस कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये रंगीबेरंगी विद्युत रोषणाई, कर्णमधूर संगीत व प्रेक्षकांची अमर्याद दाद यामुळे कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. यावेळी मंदार केसकर, पोलिस उपनिरीक्षक घोडके, मिलिंद परिचारक, पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नानामालक कवठेकर, सचिव सु. र. पटवर्धन, सदस्य डॉ. मिलिंद जोशी, शांताराम कुलकर्णी, संजय कुलकर्णी, कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही. वाय. पाटील, उपमुख्याध्यापक एम. आर. मुंडे, पर्यवेक्षिका विश्वासे, मुख्याध्यापक व्ही. वाय. कुलकर्णी उपस्थित होते.

### ताडोबाच्या पाणथळ परिसरात पक्षीनिरीक्षण

**करमाळा, दि. १ फेब्रुवारी-**



यशकल्याणी संस्थेच्या सहकार्याने संस्थापक अध्यक्ष प्रा. गणेश करे-पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार चंद्रपुरातील ताडोबाच्या पाणथळ परिसरात पक्षीनिरीक्षण व अभ्यास दौरा पार पडला. यावेळी शॉवलर डक, ओपन बील स्टॉर्क, रीव्हर टर्न, स्टील्ट, ग्रे हेरॉन, कॉमन कूट, व्हाईट ब्रेस्टेड किंगफिशर, आस्प्रे, ट्रीपाय, हनी बझार्ड, जंगल बॅबलर, रेड स्टार्ट, अदिसह १५ प्रकारच्या ६७ पक्ष्यांची, पाणथळी व ग्रास लँडवर अवलंबून असणारे, स्पॉटेड डियर, अँटेलोप, बार्कींग डियर, जंगल बोअर, पट्टेरी वाघ आदी वन्यजीवांचे निरीक्षण नोंदविण्यात आले. यात प्रा. गणेरा करे-पाटील, प्रा. बाळकृष्ण लावंड, प्रा. जयेश पवार, प्रा. विष्णू शिंदे, अतुल दाभाडे, बर्डमॅन ऑफ ताडोबाचे सुमेथ वाघमारे सहभागी झाले होते.



### पंढरीत चौदाशे विद्यार्थ्यांचे गीत गायन

**पंढरपूर, दि. १ फेब्रुवारी-**

एक सुर एक ताल हा सुरसंगमाचा प्रत्यक्ष अनुभव गीतबहार या कार्यक्रमात पंढरपूरकरांना अनुभवायला मिळाला. निमित्त होते वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमातील समूहगान कार्यक्रमाचे. तब्बल चौदाशे विद्यार्थ्यांनी गीतबहार समूह गीत सादर केले. यावेळी डॉ. प्रसाद कुलकर्णी, आसावरी पटवर्धन, अध्यक्ष नानामालक कवठेकर, संस्थेचे सचिव सुधीर पटवर्धन, एस. पी. कुलकर्णी, डॉ. मिलिंद जोशी, संजय कुलकर्णी, वगरे, शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीच्या दीपाली सतपाल, महेश तेंडुलकर, कुलकर्णी उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी यांनी केले. यामध्ये देशभक्तीपर गीते, सामाजिक सद्भावना जपणारी गीते विद्यार्थ्यांनी सादर केली. यासाठी राजेश खिस्ते, उमेश केसकर, संजय गोसावी यांनी मार्गदर्शन केले. आभार पर्यवेक्षक आर. एस. कुलकर्णी यांनी मानले. मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी, उपमुख्याध्यापक सुनील रुपनर, पर्यवेक्षक आर. एस. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.

# अकलूजमध्ये होणार एफएम प्रक्षेपक केंद्र

## केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १ फेब्रुवारी-**

नुकतेच प्रसार भारतीने भारतभर एफएम स्टेशन स्थापित करण्याची घोषणा केली आहे. त्या अनुषंगाने माढा लोकसभा मतदारसंघातील अकलूज शहरात एफएम प्रक्षेपक स्थापित करण्याच्या मागणीसंदर्भात सूचना आणि प्रसारण (प्रसार भारतीचे) केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली.



अकलूज शहरात दूरदर्शन रिले सेंटर (५०० वेंट) कार्यरत होते. अकलूज शहर हे दूरदर्शन सेंटर डीएमसी सोलापूर (महाराष्ट्र) याच्या अधीन काम करत आहे. येथे दुरदर्शनचे साहित्य आणि टॉवर (मिनार) उपलब्ध आहे, ज्यातील एक एफएम प्रक्षेपकासाठी राखीव ठेवले गेले आहे. यासर्व गोष्ट लक्षात घेऊन अकलूजमध्ये १ कि. वेंट किंवा १०० वेंट एफएम प्रक्षेपक स्थापित करण्यास मान्यता द्यावी. यामुळे पूर्ण मतदारसंघाला फायदा होईल अशी मागणी खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली.

अकलूज आणि आसपासच्या पाच तालुक्यातील एकत्रित लोकसंख्येचा अंदाज १५ लाख आहे. जर अकलूजमध्ये १ कि. वेंट एफएम प्रक्षेपक कार्यरत झाला तर, सर्वाधिक शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल. लोकांना आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, मनोरंजन, राजकीय तसेच पंतप्रधानांच्या मन की बात' सारखी महत्वाची माहिती मिळू शकेल. अकलूज एफ एम प्रक्षेपक असल्यास ५० किमी अंतरातील पाच तालुक्यातील शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होईल.

### १५ लाख लोकांना होणार लाभ

शेतकऱ्यांना रेडिओद्वारे अधिक माहिती मिळाल्यास त्यांना फायदेशीर ठरू शकते. तसेच, पंतप्रधानांच्या 'मन की बात' चा सुमारे १५ लाख लोकांना लाभ मिळू शकतो. या सर्व गोष्टीं खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय मंत्र्यांना निदर्शनास आणून देत एफएम स्टेशन उभा करावे, अशी मागणी केली आहे.

## नातेपुतेत धारदारशस्त्र बाळगणाऱ्या पाच आरोपींना बेड्या

### मारण्याचा होता डाव; सापडले पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १ फेब्रुवारी-**

नातेपुते पोलीस ठाणे हद्दीमध्ये असलेल्या मार्केट यार्ड येथील रत्नप्रभा कन्याशाळे समोरील बाजार समितीजवळ शस्त्र बाळगणाऱ्या पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे.

अल्ताफ अखिर आत्तार (रा. नातेपुते), सूरज दिलीप वाघमारे (रा. तीन कॉलनी चाळ, वालचंदनगर, ता. इंदापूर), अनिकेत महिंद्र रणशिंग, निखिल तानाजी हुलगे (दोघे रा. रणगाव, ता. इंदापूर), अनिल मारुती कारंडे (रा. निमसाखर, ता. इंदापूर) यांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. यांनी बेकायदेशीर तलवारीसारखे धारदार शस्त्र बाळगल्या स्थितीत ते मिळून आल्याने त्यांच्या विरोधात पोलीस हेडकॉन्स्टेबल रणजित मदने यांनी फिर्याद दिली आहे. तपास सहाय्यक पोलीस फौजदार सत्यवान पाटकुलकर करीत आहेत.



नातेपुते येथील पोलीस पोकॉ रणजित मदने यांना नातेपुते बाजार समितीजवळ पाच इसम हे धारदार शस्त्र घेऊन कोणास तरी मारहाण करण्यासाठी येणार आहेत, अशी माहिती मिळाली. याबाबत प्रभारी अधिकारी महारुद्र परजणे, पोहेकॉ रणजित मदने, देविदास धोत्रे, बोराटे त्या ठिकाणी गेले असता आरोपी एकत्र बसलेले दिसून आले. अनिल मारुती कारंडे याच्या हातात एक लोखंडी तलवार होती. त्यावेळी त्यांच्याकडे तलवारीबाबत विचारपूस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याच्याकडे दोन मोटारसायलक मिळून आल्या. लाकडी मूठ असलेली स्टीलची तलवार, मोटारसायकल (क्र. एम. ए. ४२/ ए. बी. ३२६९), दुसरी एक गाडी असा ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर, सपोनि महारुद्र परजणे, पोहेकॉ देवीदास धोत्रे, पोकॉ रणजित मदने, पोकॉ नितीन पनासे, रमेश बोराटे यांनी केली आहे.



## बार्शी उपसा सिंचन आगळगाव रोड पुलाच्या कामाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ फेब्रुवारी-**

बार्शी उपसा सिंचन योजनेच्या उजवा कालवावरील कॅनॉलवरील सात पुले आणि उर्वरित कॅनॉलच्या सुमारे आठ कोटी रुपयांच्या कामाचे भूमिपूजन आ. दिलीप सोपल यांच्या हस्ते करण्यात आले.

आ. सोपल म्हणाले की, अपक्षांच्या पाठिंब्यावरील युती शासनाच्या काळात भीमा सीना जोड कालवा आणि त्यानंतर बार्शी उपसा सिंचन हे बार्शी तालुक्याच्या हरित क्रांतीचे स्वप्न प्रत्यक्षात २०१४ साली आले. रिधोरेस्थित पंप गृहातून प्रत्यक्षात पाणी समारंभपूर्वक सोडले होते. त्यानंतर सातत्याने नियमानुसार पाणी सोडले जात आहे. कॅनॉलचे पाणी आता जामगाववरुन रायझिंग मेनद्वारे तावडी तलावातून ढाळे पिंपळगाव मध्यम प्रकल्पात पाणी सोडण्यास युद्ध पातळीवर उर्वरित कामे सुरु आहेत. उजव्या तसेच डाव्या कालव्यावरील सर्व कामे पुर्ण करण्याचा कसोशीने पाठपुरावा प्रयत्न सुरु आह. कॅनॉल मार्गावरील सर्व तलाव भरुन घेतले जात आहेत आणि ते नियमितपणे घेतले जातील. यावेळी जलसंपदा विभागाचे कवठेकर गायत्री कन्स्ट्रक्शनचे गळवे, माजी जि. प. सदस्य पोपट डमरे, बाजार समिती संचालक मुन्ना डमरे, नागेश अक्कलकोटे, भास्कर काशीद घाडगे, गात उपस्थित होते.

## रक्तदान, महाप्रसाद वाटपाने गणेश जयंती साजरी

### अक्कलकोटच्या रिद्धी-सिद्धी संस्थेतर्फे विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१ फेब्रुवारी-**

सुभाष गल्ली येथील श्री रिद्धी-सिद्धी गणेश समाजसेवी संस्थाच्यावतीने गणेश जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर, महाप्रसादासह विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

अक्कलकोट विरक्त मठाचे श्रीमनिप्र बसवलिंग महास्वामी, आ. सचिन कल्याणशेट्टी, माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, श्री रिद्धी-सिद्धी गणेश समाजसेवी संस्थेचे अध्यक्ष मल्लिनाथ साखरे, सचिव दयानंद बिडवे, लोकमंगल पतसंस्थेचे सल्लगार मल्लम्मा पसारे, वीरशैव मंडळाचे उपाध्यक्ष लक्ष्मी आचलेर, वळसंगचे श्री स्वामी समर्थ सूतमिलचे संचालक सुवर्णा साखरे, जिल्हा परिषद माजी सदस्य आनंद तानवडे, माजी उपनगराध्यक्ष महेश हिंडोळे, आरपीआय तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे उपस्थित होते.

सकाळी ६ वाजता श्रींचा अभिषेक व महापूजा, सकाळी ७ वाजता होमहवन, सकाळी मंदिरात सामूहिक अथर्वशीर्ष पठण केले. सकाळी १० वाजता श्री स्वामी समर्थ सतसंग महिला भजन मंडळाकडून श्री गणेश भक्ती गीत आधारित भजन झाले. दुपारी १२ वाजता पाळणा आणि गुलाल कार्यक्रम मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. पौरोहित्य रेवणय्या स्वामी, इराय्या स्वामी यांनी केले. कार्यक्रमासाठी दयानंद रोडगे, राजू भरडे, राजेंद्र भुजंगे, प्रकाश थंब, राजू कलबुर्गी, प्रितेश किलजे, राजेंद्र लोकापुरे, सुरेश यळसंगी आदींनी परिश्रम घेतले.



# विषमुक्त शेती, रोगराईच्या नियंत्रणासाठी जालीम 'शेरा'

## जनजागृतीच्या अभावामुळे नष्ट होण्याच्या मार्गावर

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १ फेब्रुवारी-**

विषमुक्त शेती, पिकांवरील रोगराई नियंत्रणासाठी जालीम आणि रामबाण उपाय असलेले झाड म्हणजे शेरा. त्याचे महत्त्व समजून न घेता त्याच्याकडे दुर्लक्ष केल्याने हे झाड नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. मात्र या झाडाच्या संगोपनासाठी वृक्षप्रेमींनी पुढाकार घेण्याची गरज आहे.

पूर्वीच्याकाळी आजोबा पंजोबांकडून शेताच्या बांधावर शेराच्या झाडांची जोपासना केली जात होती.दोन दशकांपूर्वी शेताच्या बांधावर शेराच्या झाडांमुळे शेती पिकांवर पडणारे अनेक रोग अडविण्याचे अप्रत्यक्ष काम या झाडांमुळे होत असे. पूर्वीच्याकाळी शेताच्या बांधावर कुंपण आणि आयुर्वेदिक औषधी म्हणून हमखास जोपासले जाणारे शेराचे झाड आज दुर्मिळ झाले आहे. हे झाड कुठेतरी, कधीतरी दृष्टीस पडते. सततच्या हवामान बदलामुळे पिकांवर नवनवीन रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. त्यासाठी शेतकऱ्यांना हजारो रुपये खर्च करावे लागतात. तरीदेखील रोगांचा प्रादुर्भाव आटोक्यात येताना दिसून येत नाही. शेती पिकांवर पडणाऱ्या रोगांपासून संरक्षण करण्यासाठी व मानवासाठी औषधी गुणधर्म असलेल्या शेराच्या झाडांची शेतीच्या बांधावर नव्याने जोपासना करण्याची आवश्यकता आहे. शरीरासाठी घातक असणाऱ्या या झाडाची सावली मात्र आरोग्यदायी असते. जनावरांच्या गोठ्यातील डासांचा उपद्रव रोखण्यासाठीही शेतकरी शेराच्या झाडाची फांदी गोठ्यात ठेवायचे. शेतातील पिकांच्या मुळ्या खाणाऱ्या अळीचा बंदोबस्त करण्यासाठीही शेतकरी शेराच्या झाडाच्या फांदीचा उपयोग करूत. शेराचे झाड विषमुक्त शेतीसाठी आणि पिकांवरील रोगराईच्या नियंत्रणासाठी महत्त्वाचे आहे. याबरोबरच शेताच्या बांधावर गोड बाभळ, बोरीचे झाड, आवळा, शेर, रूट आदी झाडे असणे गरजेचे आहे.



शेर हा ६ मीटर उंचीचा बिनकाटेरी लहान वृक्ष असून त्याचे मूळ स्थान आफ्रिकेत आहे. भारतात बहुतेक सर्वत्र व इतरत्र वृक्श प्रदेशात आढळतो. नांग्या शेर कुंपण म्हणून लावतात. या झाडाच्या २००० प्रजाती असून त्यापैकी सुमारे ६० जाती भारतात आढळतात. शेर, निवळ, नेवाळी शेर, कांड्याशेर, सेहुंद, त्रिकंटक, वज्रदुम, गंदेरी असे अनेक प्रकारच्या शेराच्या झाडांचे प्रकार आहेत.

### बहुउपयोगी झाड

शेराच्या झाडांपासून लाल रंग मिळतो. चामखीळ, संधिवात, दातदुखी यावर बाहेरून तिळाच्या तेलातून हा चिक लावतात. पोटात घेतल्यास तो दाहक आणि वान्तिकारक ठरतो. ही वनस्पती मत्स्यविष असल्याने उंदीर घुशिंसाठी विषारी असते. बिहारमध्ये आंब्याच्या लहान रोपट्यांना प्रखर सूर्यप्रकाशापासून संरक्षण देण्याकरिता या झाडांची लागवड केली जाते. याचे लाकूड हलके, कठीण व बळकट असते. या झाडाचे लाकूड खेळणी, तराफे, कोळसा करण्यासाठी वापरतात हा कोळसा बंदुकीच्या दारूसाठीही उपयुक्त असतो.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अनुसूचित जाती जमाती आयोग सदस्य गोरक्ष लोखंडे उद्या जिल्ह्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे हे ३ फेब्रुवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. पुणे येथून शासकीय वाहनाने दुपारी १२ वाजता धाराशिव येथील शासकीय विश्रामगृह येथे आगमन. दुपारी १ ते दुपारी ३ वाजतापर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्यासोबत सामाजिक न्याय विभागाच्या योजनेबाबत आढावा बैठक घेतील.

दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजतापर्यंत मुख्याधिकारी, नगरपरिषद धाराशिव यांचे दालनात लाड पागे समिती, अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबत तसेच अनुसूचित जाती व जमातीच्या निधी व खर्चाबाबत आढावा घेऊन प्रत्यक्ष कामाची पाहणी करतील व सायंकाळी ६ वाजता शासकीय वाहनाने परभणीकडे प्रयाण करतील.



अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील कोणत्याही नागरिकांची काही तक्रार असल्यास त्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन लोखंडे यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### सेवानिवृत्तीबद्दल डिसले यांचा सत्कार

**परंडा, दि.१ फेब्रुवारी -**

परंडा सार्वजनिक बांधकाम उपविभागातील जीप चालक अशोक गणपत डिसले यांचा शुक्रवार सेवानिवृत्ती बद्दल परंडा कार्यालयाच्या वतीने सहाय्यक कार्यकारी अभियंता ऐश्वर्या वडगावे यांच्या हस्ते सपत्नीक, सहपरिवार सत्कार करण्यात आला. यावेळी शाखा अभियंता एस.व्ही. टोंपे, कनिष्ठ अभियंता जे.एस. पाटील, इंद्रजीत कांबळे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक डी.एच. ठोंगे, एम.जी. थोरात, बाबासाहेब खुने, सुवर्णा हजारे, अनिल बोराडे, नवनाथ खैरे, उमाकांत गोरे, सुरेश घाडगे, लक्ष्मण भानवसे, पोपट गोरे, मुस्तफा दखनी, नवनाथ ननवरे, जीवन बनसोडे, वैभव बोराडे आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांबळे यांनी केले.



### 'प्रयाग'ला बँको ब्ल्यू रिबन पुरस्कार प्रदान

**जळकोट, दि.१ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील प्रयाग मल्टीस्टेट को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटीला सलग दुसऱ्यांदा सहकार व बँकिंग क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरीबद्दल बँको ब्ल्यू रिबन पुरस्कार लोणावळा येथे कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. इनमा, पुणे व अविज पब्लिकेशन, कोल्हापूर यांच्यावतीने लोणावळा येथे आयोजित केलेल्या डवांटेज सहकार परिषद २०२५ मधील कार्यक्रमात रू. १ कोटी ते ५० कोटी रुपयाच्या ठेवी गटात सर्वोत्कृष्ट संस्था म्हणून प्रयाग मल्टीस्टेटला बँको ब्ल्यू रिबन पुरस्कार देऊन दुसऱ्यांदा सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते प्रयाग मल्टीस्टेटचे तज्ञ संचालक मोहन जाधव, अरविंद पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील कदम यांनी स्वीकारला. पुरस्कार प्रदान मिळाल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील कदम, मोहन जाधव, चेअरमन सचिन कदम, मनोज कदम, दिगंबर जाधव, सर्व कर्मचारी वर्ग यांचे अभिनंदन होत आहे.



### जगदाळे महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**वाशी, दि.१ फेब्रुवारी -**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे आयोजन सांस्कृतिक विभाग, गुणवत्ता हमी कक्ष, क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना (NSS), ग्रीन क्लब आणि राष्ट्रीय छात्र सेना (NCC) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन मुख्याध्यापक दिनकर गोरखनाथ चौधरी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गंभीरे होते. यावेळी डॉ. आनंद करडे, डॉ. बालाजी देवकाते, डॉ. अनंत पाटील, डॉ. रवी चव्हाण, ग्रीन क्लबचे चेअरमन प्रा. शामसुंदर डोके, राजगुरू कुकडे महाराज, रामभाई शहा रक्तपेढीच्या अनुराधा डोंगरे, रेणुका कोळी, शीतल जाधव, किरण जाधव, अर्जुन दळवी आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिरात एकूण २८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. महादेव उंद्रे यांनी केले.



### गोकर्णा ढगे आरोग्य सेवेतून निवृत्त

**जळकोट, दि.१ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सहायिका गोकर्णा ढगे ह्या ३८ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांच्या सेवापुर्तीनिमित्त सुनील माळगे यांच्या परिवारातर्फे सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांच्या सेवानिवृत्तनिमित्त सुनिल माळगे परिवाराच्यावतीने गोकर्णा ढगे यांचा पूर्ण आहे देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी तमणप्पा माळगे, मेघराज किलजे, सुनील माळगे, इंदुमती माळगे, भागिरथी माळगे, श्रीगंगा माळगे, सिंधु लोखंडे, मनस्वी मोकरकर, आशा सेविका रेणुका नळगे, नागम्मा स्वामी, श्वेता माळगे आदि उपस्थित होते.

### मन्मथ स्वामी जन्मोत्सवानिमित्त कार्यक्रम

**जळकोट, दि.१ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील किलज येथील बारा ज्योतिर्लिंग मन्मथेश्वर देवस्थान आश्रम संस्थांनवतीने श्री शिवयोगी संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराजांच्या यांच्या ४६७ व्या जन्मोत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी दि.२ फेब्रुवारी रोजी मन्मथ स्वामी यांच्या जन्मोत्सवानिमित्त सकाळी सात वाजता अभिषेक, सकाळी नऊ वाजता गौरीशंकर भजनी मंडळ यांचा शिवभजन कार्यक्रम व दुपारी बारा वाजता भस्म, बेल, फुल उधळण व पाळणा कार्यक्रम पार पडणार आहे.

# तुळजापूरच्या एमआरआय आणि सिटीस्कॅन मशीन लोणावळा, कोल्हापूरला हलविण्याचा घाट

**तुळजापूरकरांमध्ये तीव्र नाराजी... भाविकांसह तालुक्यातील गोरगरीब रुग्णांचे होणार हाल...**



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१ फेब्रुवारी -**

उपजिल्हा रुग्णालयातील अत्यावश्यक एम.आर.आय. आणि सिटी स्कॅन मशीन कोल्हापूर आणि लोणावळा येथे हलविण्याचा शासनाने निर्णय घेतल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

शासनाने निर्णय मागे घ्यावा म्हणून महाविकास आघाडीने जिल्हा चिकित्सक यांना निवेदन देऊन या मिशनी कुठेही हलवण्यात येऊ नये, अशी मागणी केली आहे.

अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सदरील निवेदनात देण्यात आला आहे. या उपरही हा निर्णय रद्द नाही झाल्यास आम्ही तुळजापूरकर व तुळजापूर तालुक्यातील महाविकास आघाडी आपल्या पद्धतीने समाचार घेऊत. वेळ प्रसंग या विरोधात तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा महाविकास आघाडीच्या व घटक पक्षाकडून देण्यात आले. तुळजापूर शहरातील रुग्णांसह संपूर्ण तालुक्यातील ग्रामीण भागातील रुग्णांसाठी सिटी स्कॅन ही महत्त्वाची वैद्यकीय सेवा आहे.

तसेच तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना देखील अचानक वैद्यकीय सुविधाची गरज भासू शकते. त्यामुळे भाविकांसह तालुक्यातील नागरिकांना एमआरआय आणि सिटीस्कॅन मशीनची अत्यावश्यकता आहे.

यासाठी जिल्हा रुग्णालय किंवा खासगी रुग्णालयात जावे लागल्यास वेळ आणि आर्थिक भुर्दंड गोरगरीब नागरिकांना सहन करावा लागतो.

मात्र, शासनाने अचानकपणे ही मशीन इतरत्र हलविण्याचा निर्णय घेतल्याने तुळजापूर तालुक्यातील गोरगरीब रुग्णांसाठी ही मोठी अडचण निर्माण होणार आहे.

सदरील निवेदनावर महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मशीन हलविण्याचा निर्णय रद्द करा : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील आरोग्य सुविधांकडे सरकारकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आमदार कैलास पाटील यांनी केला आहे. जिल्हा रुग्णालयातील एमआरआय मशीन इचलकरंजी येथे तर तुळजापूर उपजिल्हा रुग्णालयातील सीटी स्कॅन मशीन लोणावळा येथे हलविण्याच्या निर्णयाला त्यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे.



यासंदर्भात आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना पत्र लिहून आ. पाटील यांनी हा निर्णय तत्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. आधीच अपुरी आरोग्य व्यवस्था असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील रुग्णांना आवश्यक उपचारांसाठी सोलापूरपर्यंत जावे लागते. अशा परिस्थितीत उपलब्ध सोयीसुविधा बंद करण्याचा निर्णय घेतला जाणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दुष्काळाने होरपळणाऱ्या जिल्ह्यात आरोग्य व्यवस्थेची वाताहत होत असताना सरकार त्यावर उपाययोजना करण्याऐवजी उलट सुविधा काढून घेत आहे. सामान्य नागरिकांना खासगी रुग्णालयात महागडे उपचार परवडत नाहीत, त्यामुळे त्यांची मोठी गैरसोय होत आहे, असे आमदार पाटील यांनी नमूद केले. जिल्ह्यातील आरोग्य सेवा सक्षम करण्याऐवजी उपलब्ध यंत्रणा दुसऱ्या ठिकाणी हलवली जात असल्याने सरकारच्या भूमिकेवर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या निर्णयामुळे स्थानिक रुग्णांचे हाल वाढणार असून, तो तातडीने मागे घ्यावा, अशी ठाम मागणी त्यांनी आरोग्यमंत्र्यांकडे केली आहे.

## 'रुपामाता'ला 'बँको ब्लू रिबन २०२४' पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

रुपामाता अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीने अल्पावधीत ग्राहकासोबत व्यवसायापलीकडचे नाते जपून ऋणानुबंध कायम केले असून, उत्कृष्ट व अखंड सेवा देणे, ग्राहकहित जपणे, यासाठी बँको व अवीज प्रकाशन कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने २०० ते २५० कोटी गटात उल्लेखनीय कामगिरीसाठी प्रतिष्ठेचा 'बँको ब्लू रिबन २०२४' पुरस्कार रुपामाता अर्बन को. ऑप. क्रेडिट सो. लि. धाराशिवला बँको सहकार परिषद म्बी व्हॅली, लोणावळा येथे पुण्याचे माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते प्रदान केला.

हा पुरस्कार पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश शिवाजी बोधले, प्रशाशकीय व्यवस्थापक विशाल गुंड यांनी स्वीकारला.

यावेळी अविज पब्लिकेशन चे मुख्य संपादक अविनाश शिंत्रे, बँकोचे डायरेक्टर अशोक नाईक व इतर पथसंस्थेचे सी.ई.ओ., अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

संस्थेने आपल्या सभासदांना उत्कृष्ट सेवा देण्याचा कायम प्रयत्न केला असून, हा पुरस्कार सर्वांच्या कठोर परिश्रम व कार्यक्षमतेचे प्रतीक आहे.

संस्थेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व कर्मचारी व सदस्य सभासद परिवाराचे रूपामाता उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष व्यंकटराव गुंड यांनी अभिनंदन केले.

**गॅस टाकीच्या स्फोटात संसार उपयोगी साहित्य जळून खाक...**

## नुकसानग्रस्तांना आ. पाटील यांच्या हस्ते १ लाख रुपये अर्थिक मदत

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१ फेब्रुवारी -**

येथील मंगळवार पेठ भागातील जुने हैदराबाद बँकेच्या पाठीमागे दिनांक ३१ जानेवारी रोजी रहीम अब्दुल सय्यद, अलिम अब्दुल सय्यद, कलिम अब्दुल सय्यद यांच्या घरात गॅस टाकीच्या स्फोटात संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले असून माजी नगरसेवक विनोद गंगणे यांनी नुकसानग्रस्तांना आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते १ लाख रूपये अर्थिक मदत दिली आहे.

नुकसान ग्रस्त कुटुंबीयांना घर बांधणीसाठी व शासनाकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिले आहे.



यावेळी संताजी चालुक्य, रणजितसिंह राजेनिंबाळकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचिन पाटील, माजी नगरसेवक अंबरीश जाधव, चंद्रशेखर भोसले सोनू भिंगारे, मोशिम बागवान यांच्यासह आदी उपस्थित होते.

## देशाच्या आर्थिक प्रगतीला चालना देणारा अर्थसंकल्प : दत्ता कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसदेत २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात मध्यमवर्गीय, उद्योग, कृषी, पायाभूत सुविधा आणि डिजिटल क्षेत्रासाठी महत्वपूर्ण घोषणा करण्यात आल्या आहेत.

या अर्थसंकल्पानुसार, शेतकऱ्यांसाठी विशेष सवलती देण्यात आल्या असून लघु-मध्यम उद्योगांसाठी अनुदाने आणि नवीन तंत्रज्ञानाच्या विकासासाठी मोठी गुंतवणूक केली जाणार आहे. नागरिकांना कर सवलतीचा लाभ देखील मिळणार आहे. याबरोबरच डिजिटल क्षेत्राला चालना देणारी धोरणे यामध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. शेतीचे उत्पादन वाढीसाठी पूरक उपाययोजना करण्यात आल्या असून, किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ५ लाखापर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांना या अर्थसंकल्पातील एमबीबीएस तसेच आयआयटीच्या जागा वाढवण्याच्या निर्णयाने अधिक संधी निर्माण होत आहेत.



प्रामुख्याने मध्यमवर्गासाठी करसवलती, कृषी क्षेत्रासाठी मोठी तरतूद, स्टार्टअप्स आणि लघु-मध्यम उद्योगांना प्रोत्साहन, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात भरघोस गुंतवणूक, पायाभूत विकासाला चालना, देशाला डिजिटल महासत्ता बनवण्यासाठी डिजिटल इंडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) क्षेत्रात नवकल्पना अशा अनेक घटकांसाठी भरघोस तरतूद करण्यात आली आहे. हा अर्थसंकल्प आर्थिक वाढ, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि उद्योग क्षेत्राच्या विकासाला गती देणारा ठरणार आहे.

## जि.प. उर्दू शाळा बनली खाऊ गल्ली; गजबजला आनंद बाजार

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१ फेब्रुवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील पी.एम. श्री जिल्हा परिषद उर्दु प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये दि.१ फेब्रुवारी रोजी बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते विध्यार्थ्यांनी ५१ स्टॉल उभारले त्यातून ८० ते ९० हजार रूपयांची उलाढाल झाली.

या मेळाव्याचे उद्घाटन गट शिक्षणाधिकारी हाजी सय्यद असरार अहेमद यांच्या हस्ते करण्यात आले प्रमुख पाहुणे म्हणून विस्तार अधिकारी रामचंद्र शिंदे, मधुकर तोडकर, गोरोबा पाडूळे उपस्थित होते. जि.प. उर्दू शाळेत विद्यार्थ्यांनी खरी कमाई उपक्रमाचे आयोजन केले होते या उपक्रमात विविध प्रकारचे ५१ विक्री स्टॉल उभारले होते.

यावेळी शेख परवीन समद, मुकतार काझी, बापू नाईकवाडी, जुनेद मोमीन, आर्शद मुलानी, मुद्दसर शेख आदि उपस्थित होते.

## ट्रॅक्टर व ट्रेलर नावावर करून दे म्हणत एकास विष पाजले! : कौडगाव तांडा येथील थरारक घटना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

एकाने दुसऱ्याचे असलेले ट्रॅक्टर व ट्रेलर माझ्या नावावर का करून देत नाहीस? असे म्हणत चक्क त्याचे हातपाय धरून जमिनीवर आडवे पाडत चक्क विष पाजून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. ही थरारक व जिवघेणी घटना दि.३१ जानेवारीच्या रात्री सात ते रात्री आठ वाजण्याच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील तांबेवाडी तांडा येथील आकाश माणिक राठोड दि.३१ जानेवारी रोजी बार्शी येथील न्यायालयात तारीख असल्यामुळे मोटरसायकलवर गेले होते. सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास ते बार्शीहून कौडगाव येथे आले. कौडगाव येथून ते आपल्या गावाकडे मोटारसायकलवरुन जात होते.

या दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील महादेव अरुण मदने, विक्रम अरुण मदने तसेच मारुती बाबुराव राठोड व रेखा सुनिल चव्हाण (रा. येमाई तांडा ता. बार्शी) यांनी सायंकाळी सात ते रात्री आठ वाजण्याच्या दरम्यान गावाकडे जाणाऱ्या आकाश राठोड यांच्या मोटारसायकलसमोर त्यांच्या मोटारसायकली आडव्या लावून त्यांना अडविले.

तु तुझे ट्रॅक्टर व ट्रेलर चोरून नेल्याप्रकरणी महादेव मदने यांच्यावर पोलीस ठाण्यामध्ये कलम ३५४ चा गुन्हा दाखल केला आहेस. त्या दाखल केलेल्या गुन्ह्याची केस मिटवून घे असे म्हणत मारुती व विक्रम यांनी हाताला व पायाला धरून जमिनीवर आडवे पाडले. तर रेखाने आकाशचे तोंड हाताने दाबून उघडले व आकाशच्या तोंडामध्ये विषारी औषध ओतले. त्यानंतर ते तिथून निघून गेले.

यादरम्यान आकाशने त्याच्या फोनवरून घरी फोन केल्यानंतर त्याच्या घरची मंडळी दाखल झाली. त्यांनी तात्काळ धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

याप्रकरणी संबंधित आरोपींवर धाराशिव ग्रामीण पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणी आकाश राठोड यांच्यासह त्यांच्या नातेवाईकांनी केली आहे.

## मंगरुळ जि.प. प्रशालेत विद्यार्थ्यांसह पालक मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे सण २०२४-२०२५ दहावी बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त पार पडाव्यात यासाठी शनिवार १फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यांसह पालक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच गिरीश डोंगरे, पोलिस पाटील लक्ष्मण माळी, ग्रामपंचायत सदस्य आदमशा फकीर, आप्पासाहेब जेटीथोर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोज डोंगरे, पत्रकार चांदसाहेब शेख हे उपस्थित होते.

## उत्पन्नच नसेल तर त्या करमाफीच काय करावं? : खा. राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

बारा लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्याना आता करातून सूट मिळण्याची घोषणा करणाऱ्या सरकारने उत्पन्न वाढविण्यासाठी काय केल? उत्पन्नच नसेल त्यांनी करमाफीच काय करायच असा सवाल खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी उपस्थित केला. शेतकऱ्यांना समोर ठेवून कधीतरी धोरण ठरविणार आहात की नाही ? असाही प्रश्न ओम राजे यांनी मोदी सरकारला केला आहे.

खा. ओमराजे म्हणाले की, या सरकारचे आतापर्यंतचे सर्व अर्थसंकल्प हे आकड्याचे खेळ व घोषणाचा पाऊस एवढ्यापुरते मर्यादित आहेत.



शेतकऱ्यांच उत्पन्न दुप्पट करु म्हणणार हे सरकार आता त्याविषयी एक चकार शब्द काढत नाही, शेतकऱ्यांना वीज, पाणी व हमीभाव या तीन गोष्टी आवश्यक असतात. धोरण करताना या तीनही बाबीत कमालीचा निरुत्साह दिसतो. असा धोरण लखवा असल्यावर त्या शेतकऱ्यांच उत्पन्न कस वाढणार? शिवाय आता डाळीच्या उत्पादन वाढविण्यासाठी सरकार प्रयत्न करणार असं म्हणतंय पण पुन्हा मूळ मुद्दा येतो हमीभावाचा त्यावर अर्थमंत्री शब्दही काढत नाहीत.

सध्या शेतकरी कर्जबाजारी झाला आहे, तो अडचणीत आहे हे माहित असतानाही थोडीतरी संवेदनशिलता या सरकारने दाखवायला हवी होती.

उद्योगपतीच लाखो कोटीच कर्ज माफ होत पण आमच्या कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांना लाखाची कर्जमाफी मिळत नाही हे दुर्देवी आहे.

शेतकऱ्यांच जगणं हे सरकार कधीच मान्य करेल असं मला वाटत नाही अशी खंत ओमराजे निंबाळकर यांनी व्यक्त केली.

आजही आपल्या देशाच्या आर्थिक विकासाचं लक्ष साडेसहा टक्क्याच्या पुढे जात नाही, ही आकडेवारी कोविड काळानंतरची सर्वात कमी आहे. यावरून या सरकारच धोरण व वास्तव परिस्थिती यामध्ये मोठं अंतर असल्याच अधोरेखित होत असल्याची प्रतिक्रीया खा. ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी दिली आहे.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## मुख्य चौकातून दुचाकीची चोरी; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

तालुक्यातील ईट गावात भरदिवसा म ोटरसायकल चोरीची घटना घडली असून, वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी नवनाथ आप्पासाहेब हुंबे (वय ६५, रा. ईट, ता. भुम, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी २ वाजता ईट येथील मुख्य चौकात सयाज हुंबे यांच्या मोबाईल दुकानासमोर त्यांची अंदाजे ३० हजार रूपये किंमतीची हिरो एचएफ डिलक्स (काळ्या रंगाची, क्र. MH-२५-P-२९९४) ही दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केली.



याबाबत फिर्यादींनी ३० जानेवारी २०२५ रोजी वाशी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी भादंवि कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

पोलीस पुढील तपास करत असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व इतर पुराव्यांच्या आधारे आरोपीचा शोध घेतला जात आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### काटगाव येथे इन कॅमेरा ग्रामसभा

**इटकळ, दि.१ फेब्रुवारी -**

तुळजापुर तालुक्यातील काटगाव येथे ग्रामसभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. शुक्रवार दि. ३१ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता काटगाव येथील काटेश्वर मंदिर सभागृह येते सरपंच अशोक दगडू यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत काटगावची ग्रामसभा विविध विषयावर संपन्न झाली. ग्रामविकास अधिकारी नितीन कांबळे यांनी सभेची सुरुवात करून बालविवाह मुक्त जनजागृती टी.बी. मुक्त ग्रामपंचायत कुष्ठरोग महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना आदी विषयाचे वाचन करण्यात आले. विविध विषयाबाबत विविध विषयावर ग्रामसभा वादळी झाली. सदर सभेसाठी ग्रामपंचायत सदस्य नागिनी कांबळे, सागर पाटील, अल्लाउद्दीन घाटवाले, सूर्यकांत कांबळे, योगेश धुते, सूर्यकांत जोकार, बाबुराव गिराम, सतीश खोबरे, पोलीस पाटील, पशुवैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य कर्मचारी मुख्याध्यापक, अंगणवाडी कार्यकर्ते आशा कार्यकर्ती, गावातील १५० नागरिक सदर ग्राम सभेस उपस्थित होते. ग्रामसभा ही इन कॅमेरा व पोलीस प्रशासन यांच्या निगराणी खाली घेण्यात आली.



### सेवानिवृत्तीनिमित्त सरपे यांचा सत्कार

**उमरगा, दि.१ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभागात सेवेत कार्यरत असलेले उपविभागीय जलसंधारण अधिकारी संजय सरपे दि.३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्ती झाले. त्यामुळे शुक्रवारी (दि.३१) रोजी जि.प. लघु पाटबंधारे उपविभागाच्या वतीने लघु पाटबंधारे सभागृहात निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता शशिकांत गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून उप अभियंता एन.ए. भुसारे होते. याप्रसंगी विविध विभागातील आजी-माजी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विजय वाघमारे, महेश माशाळकर, विक्रम मस्के, अशोक बनसोडे, बालाजी कुडुबले, श्रीराम राठोड, प्रवीण कोराळे, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश पाटील यांनी यांनी केले.

## धाराशिव शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी चार एकरावर 'सारथी' भवन







### जागेचा प्रस्ताव शासनाला सादर करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश... आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडून जागेची पाहणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

लातूर विभागीय केंद्राच्या धर्तीवर धाराशिव शहरात चार एकरावर सारथीचे भव्य सारथी भवन नियोजित आहे. यात प्रशिक्षण केंद्र, सुसज्ज प्रशासकीय इमारत, मुलं आणि मुलींसाठी प्रशस्त वसतीगृह, अत्याधुनिक अभ्यासिका यासह भव्य ऑडीटोरियमचाही समावेश असणार आहे.

आनंदनगर भागातील पशुसंवर्धन विभागाची जागा 'सारथी'कडे वर्ग करण्याबाबत शासनाला प्रस्ताव पाठवण्याची सूचना आपण जिल्हाधिकाऱ्यांना केली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

धाराशिव शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या पशुसंवर्धन विभागाच्या ११ एकर जागेची पाहणी केली. यातील पोल्ट्री साठी एकेकाळी वापरात असलेली परंतु आता वापरात नसलेली ४ एकर जागा लातूर येथील विभागीय केंद्राप्रमाणे भव्य आणि अद्ययावत सोयी सुविधांनी युक्त असे सारथी भवन साकारण्यासाठी तसेच म ुलींच्या वसतिगृहासाठी सुरक्षित व योग्य असल्याचे लक्षात आल्याने निश्चित करण्यात आली असल्याची आ. पाटील यांनी माहिती दिली.

मराठा समाजातील विद्यार्थी आणि युवा पिढीच्या सर्वांगीण प्रगतीसह, आर्थिक उन्नतीसाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे अर्थात सारथीची स्थापना करण्यात आली आहे.

विविध पद्धतीने सारथीमार्फत मराठा समाजातील विद्यार्थ्यांसोबतच समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि आर्थिक सक्षम ीकरणासाठी व्यापक स्वरुपात उपक्रम आणि विविध योजना राबवण्यात येत आहेत. धाराशिव जिल्ह्यातील मराठा समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थी आणि युवकांना त्याचा लाभ मिळावा यासाठी हे केंद्र उभारण्यास आपल्या महायुती सरकारने अनुमती दिली असल्याचे आ. पाटील यांनी सांगितले.

लातूर विभागीय केंद्राच्या धर्तीवर अगदी त्याच पद्धतीने आपल्या धाराशिव शहरात अद्ययावत आशा सर्व बाबींचा अंतर्भाव असलेले सुसज्ज असे सारथी भवन उभारण्यात येणार आहे.

त्यासाठी सुरुवातीला १ एकर जागा घेण्याबाबत चर्चा चालू होती. मात्र सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांच्या सोबत झालेले चर्चेच्या अनुषंगाने धाराशिव येथे सारथी भवन उभारण्यासाठी ४ एकर जागा आवश्यक असल्याने आनंदनगर येथे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या पशुसंवर्धन विभागाच्या ४ एकर जागेची पाहणी केली.

मराठा समाज बांधवांसाठी म हायुती सरकारने घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयानुसार एक सुसज्ज सारथी भवन उभारण्यासाठी ही जागा सर्वार्थाने अनुकूल असून जिल्ह्यातील मराठा विद्यार्थी आणि युवकांसाठी अगदी मध्यवर्ती भागात असलेली ही जागा अत्यंत सोयीची असल्याने लवकरच जागा सारथीला मिळावी यासाठी प्रक्रिया राबविण्यात येईल असेही आ. पाटील यांनी म्हटले आहे.

यावेळी तहसीलदार मृणाल जाधव, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. यतीराज पुजारी, उपअभियंता मोरे, मराठा समाजाचे युवक कार्यकर्ते, सुनील काकडे, अमित शिंदे, भाजपाचे राजसिंहा राजेनिंबाळकर, अभय इंगळे, अक्षय ढोबळे, अमोल राजेनिंबाळकर, संदीप इंगळे, खंडू राऊत, रमण जाधव यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

## नळदुर्ग शहरात गणेश जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१ फेब्रुवारी -**

नळदुर्ग शहरात दि.१ फेब्रुवारी रोजी श्री गणेश जयंती मोठ्या उत्साहात व विविध धार्मिक कार्यक्रमाने साजरी करण्यात आली.. यावेळी श्री गणेश जतांतीनिमित्त सकाळपासुनच गणेश मंदिरात श्री गणेशाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

शहरातील विविध गणेश मंदिरात दि.१ फेब्रुवारी रोजी मोठ्या भक्तिमय वातावरणात श्री गणेश जयंती साजरी करण्यात आली. शिवशाही तरुण गणेश मंडळ, धर्मवीर संभाजी महाराज तरुण गणेश मंडळ, जय भवानी गणेश मंडळ, भोईराज गणेश मंडळ, लोकमान्य गणेश मंडळ याठिकाणी असणाऱ्या गणेश मंदिरात श्री गणेश जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सकाळी महाभिषेक,म




हापुजा, महाआरती, भजन, कीर्तन तसेच दुपारी पाळण्याचा कार्यक्रम आदी कार्यक्रम घेण्यात आले. या प्रत्येक गणेश मंदिरात श्री गणेशाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. प्रत्येक ठिकाणी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.श्री गणेश जयंतीनिमित्त शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते. त्याचबरोबर दुपारी बारा वाजता पाळण्याचा कार्यक्रम झाला या कार्यक्रमाला महिलांची मोठी उपस्थिती होती. दुपारी १ वाजता याठिकाणी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बलदेवसिंग ठाकुर, सरदारसिंग ठाकुर, जमन ठाकुर, राजेंद्र ठाकुर, विजयसिंग ठाकुर, याच्यासह संपुर्ण ठाकुर परीवाराने परीश्रम घेतले.

## ऑनलाइन फसवणुकीचा बळी : गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१ फेब्रुवारी -**

एका तरुणाची ऑनलाइन फसवणूक करून त्याच्याकडून २५,५०० रुपये उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलीस अधिक तपास करत असून, नागरिकांनी ऑनलाइन व्यवहार करताना अधिक सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## परिवर्तनची संविधान सन्मान परिषद; राज्यस्तरीय पुरस्काराचे आज वितरण

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१ फेब्रुवारी -**

परिवर्तन सामाजिक संस्था, नळदुर्ग यांच्यावतीने संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत.

त्यामुळे संविधान सन्मान परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे व त्याचबरोबर परिवर्तन राज्यस्तरीय पुरस्कार वितरणही याच समारंभात करण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय परिवर्तन पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यावर्षी पुण्याचे डॉ. मिलिंद वाकोडे, ॲड. मैना भोसले, विजय कांबळे व अन्य मान्यवरांना जाहीर करण्यात आला आहे.

गेली २३ वर्षे परिवर्तन सामाजिक संस्थेकडून कला, क्रीडा, साहित्य, समाजसेवा, युवक, पत्रकारिता आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत असते.

यावर्षी हा कार्यक्रम दि.२ फ ेब्रुवारी रोजी आपलं घर प्रकल्प, आलियाबाद येथे सकाळी ११.३० वाजता संविधान सन्मान परिषद व राज्यस्तरीय परिवर्तन पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सूराणा उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी प्रा.डॉ. सुरेश वाघम ारे, ज्येष्ठ विचारवंत (लातूर) हे मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती

परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारुती बनसोडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

## आर. पी. कॉलेज ऑफ फार्मसी, कॅम्पस टू कॉर्पोरेट एक दिवशीय कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ फेब्रुवारी -**

डॉ. वेदप्रकाश पाटील एज्युकेशनल कॅम्पस गडपाटी, धाराशिव येथील आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रातील नवीन रोजगाराच्या व व्यक्तिम त्व विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेचे विश्वस्त डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एकदिवशीय कॅम्पस टू कॉर्पोरेट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख गाझी यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच व्यक्तिमत्व विकास व औषध निर्माण क्षेत्रातील वेगवेगळ्या रोजगाराच्या संधी विषयी माहिती दिली. या कार्यशाळेत बोलताना आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ट्रेनर संतोष सांगवे, यांनी औद्योगिक क्षेत्रातील तसेच औषध निम र्ाण क्षेत्रातील वेगवेगळ्या रोजगाराच्या संधी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्यक्तिमत विकासाविषयी सखोल असे मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या रोजगाराच्या संधी मि ळण्यासाठी व व्यक्तिमत्व विकासासाठी बहुमोल असे उपयोगी ठरणार आहे.

या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील जवळपास १५० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा. विक्रांत नवले व प्रा. विजय सुतार यांनी परिश्रम घेतले.

## ग्रीस्टॅक योजना : शेतकऱ्यांसाठी वरदान

कृषी क्षेत्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास हा कृषी क्षेत्राच्या विकासामुळे शक्य होणार नाही. मात्र, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होत नसल्याने आणि अनेक व्यवस्थात्मक अडचणींमुळे शेतकरी अजूनही मोठ्या प्रमाणावर अडचणीचा सामना करत आहेत.

या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने ग्रीस्टॅक (griStack) या महत्वाकांक्षी योजनेची घोषणा केली आहे. ही योजना भारतीय शेतीच्या डिजिटल रूपांतरणाचा एक भाग आहे. शेतकऱ्यांना अत्याधुनिक कृषी तंत्रज्ञान, माहिती आणि सेवांचा लाभ देण्यासाठी तयार केली जात आहे.

**ग्रीस्टॅक म्हणजे काय...**

ग्रीस्टॅक हा भारतीय शेतीसाठी तयार करण्यात आलेला एक मोठा डिजिटल डेटा प्लॅटफॉर्म आहे. या अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याचा आणि त्यांच्या शेतीच्या माहितीचा एक स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार केला जात आहे.यामध्ये जमिनीचा प्रकार, हवामान, लागवडीचे पद्धती, पाणीपुरवठा, पीक प्रकार, उत्पादन आणि विक्रीशी संबंधित सर्व महत्त्वाच्या बाबीची माहिती असणार आहे.

ग्रीस्टॅक हे कृषी क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरून शासनाच्या विविध कृषीविषयक योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरीत्या पोहोचवण्यासाठी स्थापन स्थापित केले जाणारे डिजिटल फाउंडेशन आहे.शेतकऱ्यांना स्वस्त कर्ज, उच्च गुणवत्तेची कृषी निविष्ठा, विपणन स्थानिक आणि विशिष्ट तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत अधिक माहितीपूर्ण आणि सोयीस्कर प्रवेश मिळून देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना विविध कृषीविषयक योजनांचा लाभ जलदगतीने देण्यासाठी शेतकऱ्यांची ओळख पटविण्यासाठी पारदर्शक, सोपी आणि प्रामाणिकपणाची पद्धत विकसित करणे, शेतकऱ्यांना अधिक चांगल्या प्रकारे सेवा देण्यासाठी कृषी संलग्न विभाग यांच्यात विविध योजनांच्या अभिसरण प्रक्रियेत सुलभता आणणे आणि उच्च गुणवत्तेचा डेटा व ग्रोटेकद्वारे कृषी उत्पादने आणि सेवांमध्ये नवकल्पना वाढविणे आणि कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे हा ग्रीस्टॅक योजनेचा उद्देश आहे.

**योजनेची वैशिष्ट्ये...**

डिजिटल शेतकरी ओळखपत्र प्रत्येक शेतकऱ्याला एक विशेष डिजिटल ओळख क्रमांक (Unique Farmer ID) दिला जाणार आहे.

ज्यामुळे त्याच्या शेताचा आणि उत्पादनाचा संपूर्ण डेटा व्यवस्थित संग्रहित करता येणार आहे.

**डेटा अनालिटिक्स आणि पूर्वानुम ान...**

हवामानाचा अंदाज, जमिनीची सुपीकता, कीड व रोग यासारख्या माहितीचा अचूक अंदाज बांधून शेतकऱ्यांना योग्य सल्ला दिला जाणार आहे. कर्ज आणि विमा सुलभता शेतकऱ्यांचा डिजिटल डेटा बँका आणि विमा कंपन्यांशी जोडला जाईल. त्याम ुळे त्यांना सहज कर्ज व विमा योजनांचा लाभ मिळेल.

**ई-कॉमर्स आणि थेट विक्री...**

शेतकरी त्यांचा माल थेट डिजिटल प्लॅटफॉर्मवरून विकू शकतील, त्यामुळे दलालांची मध्यस्थी टाळता येईल आणि शेतकऱ्यांना अधिक नफा मिळू शकेल.

सरकारी योजनांचा थेट लाभ विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना अधिक सहज संधी मिळेल. अनुदाने आणि आर्थिक मदतीसाठी अनावश्यक कागदपत्रांची गरज भासणार नाही.

**शेतकऱ्यांना होणारे फायदे...**

शेतकऱ्यांना या योजनेमुळे जे फायदे होणार आहेत. ते पुढीलप्रमाणे आहे.

१. अधिक माहितीपूर्ण निर्णय शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य माहिती मिळाल्यास त्यांचे उत्पन्न वाढू शकते. हवामान, बाजारभाव, शेतीसाठी लागणाऱ्या कृषीविषयक निविष्ठा यांची माहिती सहज उपलब्ध होईल.

२. अधिक उत्पादन आणि उत्पन्न-सुधारित लागवड तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन आणि खतांचा अचूक वापर केल्याने उत्पादनवाढ होईल.

३. मध्यस्थांची साखळी कमी होणार-ई-कॉमर्स आणि थेट विक्री प्रणालीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा अधिक फायदा मिळेल.

४. कर्ज आणि विमा प्रक्रियेत पारदर्शकता - बँका आणि वित्तसंस्थांना शेतकऱ्यांचा डेटा उपलब्ध असल्यामुळे कर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद आणि सुलभ होईल.

५. नवीन तंत्रज्ञानाचा वापर - कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) आणि डेटा



ॲनालिटिक्सच्या मदतीने शेतकऱ्यांना शेतीविषयक अत्याधुनिक उपाय मि ळण्यास मदत होणार आहे.

६. किमान आधारभूत किमतींवर खरेदीमध्ये शेतकऱ्यांचे नोंदणीकरण ऑनलाईन पद्धतीने होईल.

७. शेतकऱ्यांना पिकासाठी कर्ज मिळविण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि कृषी इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्ज उपलब्ध करून घेण्यात सुलभता येईल.

ग्रीस्टॅक योजना ही भारतीय कृषी क्षेत्रात मोठी क्रांती घडविणार आहे.या योजनेमुळे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक उत्पादनक्षम आणि फायदेशीर शेती करता येईल.

ही योजना शेतकऱ्यांसाठी नक्कीच वरदान ठरणार आहे.

**- संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय**

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बालरंगभूमी परिषदेच्या वतीने तिरंगा ध्वज वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** महाराष्ट्राची कला व परंपरा जपताना बालमनावर संस्कार करत, कलासक्त पण सशक्त पिढी घडवण्याचे कार्य गेली अनेक वर्षे बालरंगभूमी परिषद करते आहे. त्याच अनुषंगाने यंदा आपल्या प्रजासत्ताक दिनाला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत.

याच दिवशी भारत सरकारने आपले पवित्र संविधान लागू केले. या दोन्हीचे अमृत महोत्सवी वर्ष परिषदेच्या राज्याध्यक्षा ॲड. निलम शिर्के - सामंत, राज्य उपाध्यक्ष ॲड. शैलेश गोजमगुंडे व प्रदेश कार्यकारिणीच्या सूचनेनुसार लातूर शाखा बालकांसोबत महत्वाचे कार्यक्रम करीत आहे.

जिल्ह्यातील २० शाळांमध्ये प्रत्यक्ष जाऊन ७५ ध्वज ७५ विद्यार्थ्यांना वाटप केले जात आहेत. सोबत आपल्या संविधानाच्या प्रस्ताविकेचे मुलांसोबत सामूहिक वाचन व शपथ असा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये संविधान व प्रजासत्ताक दिनाबाबत माहितीपूर्ण जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल.

सदरील उपक्रम म.न.पा. शाळा क्र. ६, लातूर, श्री पुरणमल लाहोटी पाठशाळा लातूर, म.न.पा. शाळा क्र. २८ लातूर, भगतसिंग विद्यालय आष्टा, जिल्हा परिषद विद्यालय आष्टा, शिवाजी विद्यालय आष्टा, रवीशंकर इंग्लिश स्कूल लातूर, रवीशंकर मराठी स्कूल लातूर, राजनंदा विद्यालय लातूर, व्यंकटेश विद्यालय लातूर, श्री. गोदावरीदेवी लाहोटी विद्यालय लातूर, स्टीम एज्युकेशन लातूर, नवभारत विद्यालय लातूर, अंकुर बालविकास केंद्र लातूर, जिल्हा परिषद नवीन चांडेश्वर येथे तिरंगा ध्वज वाटप करण्यात आले.



### संक्षिप्त वृत्त...

## दोन दिवसीय जिल्हास्तरीय महसूल क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** जिल्हास्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि अर्जुन पुरस्कार विजेत्या सारिका काळे यांच्या हस्ते झाले.

प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, शरद झाडके यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. खो-खो मधील माजी राष्ट्रीय खेळाडू असलेले महसूल कर्मचारी हनुमंत जक्कलवार यांनी उपस्थितांना क्रीडा शपथ दिली.जिल्हास्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक अशा एकूण ८० क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. लातूर, निलंगा, उदगीर, अहमदपूर, औसा-रेणापूर महसूल उपविभागातून प्रत्येकी एक आणि जिल्हाधिकारी कार्यालयाची एक अशा एकूण सहा संघांमध्ये या स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी सर्व संघांचे पथसंचलन झाले. यामध्ये निलंगा उपविभागीय संघाने प्रथम क्रमांक पटकाविला, तर लातूर उपविभाग आणि उदगीर उपविभागाला अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळाला.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयाला नॅक कडून 'ए प्लस' दर्जा प्राप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** दयानंद वाणिज्य महाविद्यालयाला नॅक या राष्ट्रीय मूल्यांकन समिती कडून ए प्लस दर्जा प्राप्त झाला असून, तसा रिपोर्ट महाविद्यालयास मिळाला आहे. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे २० आणि २१ जानेवारी २०२५ रोजी नॅक समितीकडून मूल्यांकन झाले. या मूल्यांकन समितीने महाविद्यालयास भेट देऊन तपासणी केली. ३१ जानेवारी रोजी महाविद्यालयास ए प्लस दर्जा मिळाल्याचा रिपोर्ट महाविद्यालयास प्राप्त झाला आहे.

३.३८ गुणांकन मिळवित महाविद्यालयाने हे यश संपादित केले आहे. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर यांच्या नेतृत्वाखाली हे यश महाविद्यालयाने संपादन केले आहे. या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, उपाध्यक्ष लालितभाई शहा, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, कोषाध्यक्ष संजय बोरा, नियामक मंडळाचे सदस्य विशाल अग्रवाल आदिंनी अभिनंदन केले.

## भाजपच्या जिल्हा महामंत्रीपदी रवी सुडे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** भाजपच्या लातूर जिल्हा महामंत्रीपदी रवी सुडे यांची निवड करण्यात आली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार भाजप जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी जिल्ह्यात भाजप पक्ष संघटन वाढीसाठी भाजपच्या लातूर जिल्हा सरचिटणीसपदी माजी नगरसेवक रवी सुडे व ॲड. प्रदीप मोरे यांची निवड केली आहे. जिल्हा भाजप कार्यालयात सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते रवी सुडे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष देविदास काळे, ग्रामीण जिल्हाधक्ष दिलीपराव देशमुख, शैलेश लाहोटी, सरचटणीस ॲड. प्रदीप मोरे, रागिणी यादव, संतोष पांचाळ, शिवा सिसोदिया, सुरेश राठोड, अनिल पतंगे, अतिश कांबळे, निर्मला कांबळे मधुसूदन पारिख व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## पार्किंग केलेल्या दुचाकीची चोरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** रोडच्या बाजूला लिंबाच्या झाडाखाली इसामनगर येथे पार्किंग केलेल्या दुचाकीची चोरी झाल्याची घटना घडली. (एम एच १३ एमएस ९४२) असा चोरी गेलेल्या दुचाकीचा क्रमांक असून जुन्या वापरातील ४२ हजार रुपये किंमत असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# लाडक्या बहिणींना आठवा हप्ता नाही मिळणार

### जिल्ह्यातील २५ हजार अर्ज रद्द

एकीकडे राज्यात विधानसभा निवडणुकांपूर्वी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा मोठा गाजावाजा करण्यात आला होता. लातूर जिल्ह्यातील ५ लाखांहून अधिक महिलांना योजनेचा निधीही मिळाला. पण, निवडणुकांच्या निकालानंतर या योजनेत पारदर्शकता आणली जात आहे. अर्जांची छाननी केल्यानंतर आता लातूर जिल्ह्यातील तब्बल २५ हजार १३६ लाडक्या बहिणींचे अर्ज रद्द करण्यात आले आहेत.

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** जिल्ह्यातील लाडक्या बहिणींचे २५ हजार १३६ अर्ज रद्द करण्यात आल्याचे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने जाहीर केले आहे. त्यामध्ये खोटी कागदपत्रे सादर करणे, उत्पन्न जास्त असणे यासारख्या कारणांमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना आठवा हप्ता मिळणार नसल्याचे यावरून स्पष्ट झाले आहे. सरकारचा या बहिणींना हा धक्का असल्याचे बोलले जात आहे.

राज्य सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील निकषांत अद्याप एकही बदल केला नाही, असे स्पष्टीकरण महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी दिले. तसेच ज्या लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा झाले, ते पैसे सरकार परत घेणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही लाडक्या बहिणींना या योजनेचा लाभ मिळतच राहणार असून ज्या बहिणींचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त आहे, पडताळणीनंतर त्यांना योजनेचा लाभ मिळणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

लाडक्या बहिणींना खात्यामध्ये दीड हजार रुपये कधी पडणार याची उत्सुकता असते. आतापर्यंत ७ महिन्यांचे दीड हजार रुपयांप्रमाणे पैसेही खात्यावर जमा झाले आहेत. पण काही ठिकाणी त्यामध्ये खोटी कागदपत्रे सादर करणे, उत्पन्न जास्त असणे आणि कागदपत्रांमध्ये छेडछाड असे प्रकार समोर येऊ लागले आहेत. तर काही अर्जांमध्ये कागदपत्रांची पूर्तताच झाली नसल्याचे उघडकीस येत आहे.त्यामुळे लातूर जिल्ह्यातील २५ हजार १३६ अर्ज हे रद्द करण्यात आल्याचे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने स्पष्ट केले आहे.

लातूर जिल्ह्यात योजनेच्या प्रारंभी पहिल्या टप्प्यात ३ लाख ४२ हजार १५२ अर्ज दाखल झाले होते. दुसऱ्या टप्प्यात २ लाख ५० हजार ६७ अर्ज आले होते. एकूण ५ लाख ९२ हजार प्राप्त झाले असताना दुसरीकडे छाननीचे काम सुरू होते.

या छाननीमध्ये अर्ज रद्द करण्यात आले आहेत. कारवाईच्या भीतीने काहींनी योजनेचा निधी नको, असा पत्रव्यवहारही केला आहे. निवडणुकीनंतरही राज्य सरकारने ही योजना सुरू ठेवली असली तरी नियमांवर बोट ठेवत अंमलबजावणी होत असल्याने आता अनेकांच्या खात्यावर ८ वा हप्ता जमा होणार की नाही, याची उत्सुकता लागली आहे.

## शहर बससेवेच्या फेऱ्या वाढविण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** मध्यवर्ती बसस्थानकात सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. पुणे- मुंबई, बार्शी, संभाजीनगर, धाराशिव, औसा, सोलापूर, उमरगा, पंढरपूर, कोल्हापूर, बीड, अंबाजोगाई, परभणी, जालना, हिंगोली, नाशिक येथे जाणाऱ्या सर्व बसगाड्या बसस्थानक क्र. २ जुना रेणापूर नाका येथून सुटणार आहेत. यामुळे शहरातील रिक्षा चालक रेणापूर नाका कडे जाण्यासाठी मनमानी भाडे आकारत आहेत.

यासाठी महानगर पालिकेने मध्यवर्ती बसस्थानक ते रेणापूर नाका बसस्थानकपर्यंत शहर बस सोडाव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने मनपा आयुक्तांकडे केली आहे. काही ऑटोरिक्षाचालक मनमानी प्रवास भाडे आकारून अरेरावी करत आहेत. निवेदनावर जिल्हाध्यक्ष संजय शेटे, डी.उमाकांत, बख्तावर बागवान, श्रीकांत मगर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

## दोन मुलांचा खून; आरोपीला जन्मठेप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** पैशाच्या व्यवहारातून झालेल्या भांडणाचा राग मनात ठेवून सात आणि चार वर्षीय बालकांचा गळा दाबून खून केल्याप्रकरणी लातूर जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश आर.बी. रोटे यांनी आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

आरोपी संतोष राठोड (रा. वसंतनगरतांडा, नळदुर्ग जि. धाराशिव ह.मु, लातूर) या ऊसतोड मुकादमाने तक्रारदार रेशमा अशफाक पठाण यांच्यासोबत पैशाच्या कारणावरुन भांडण झाले. यावेळी भांडणात आरोपीला मारहाण झाली होती. याचा राग मनामध्ये ठेवून तक्रारदार रेशमा पठाण यांची मुले इरफान (७) आणि जुनेद (४) यांना ठार मारण्याच्या उद्देशाने गाडीवर बसवून तो पेठ शिवारातील उसाच्या शेतात गेला. तेथे दोन्ही मुलांचा गळा दाबून खून केला. मृतदेह ओळखता येवू नये म्हणून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. याबाबत लातूर शहरातील शिवाजीनगर पोलिस ठाण्यातमध्ये आरोपी संतोष मानसिंग राठोड याच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणी संतोषला शिक्षा सुनावण्यात आली.

## मुलांच्या वस्तीगृहाची आ.देशमुखांनी केली पाहणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** आ.अमित देशमुख यांनी लातूर शहरातील महात्मा बसवेश्वर चौक परिसरात असलेल्या जनावरांच्या बाजारातील प्रस्तावित कांदा व बटाटा मार्केट स्थळ, तसेच जुने भाजी मार्केट जवळील यशवंतराव चव्हाण ग्रामीण विद्यार्थीमुलांचे वस्तीगृह, सचिव निवासस्थान जागाची पाहणी करून संबंधितांना आवश्यक सूचना केल्या.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, प्रभारी सचिव अरविंद पाटील, सहसचिव सतीश भोसले, संचालक सर्वश्री बालाप्रसाद बीदादा, सुधीर गोजमगुंडे, सुभाष घोडके, शिवाजी देशमुख, बळवंत पाटील, बालाजी वाघमारे, अनिल पाटील, युवराज जाधव, शिवाजी कांबळे, आनंद पवार, आनंद पाटील, लक्ष्मण पाटील, श्रीनिवास शेळके, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन रवींद्र काळे, राजकुमार पाटील, बी.एस पवार, गणेश एस.आर.देशमुख, गोविंद डुरे पाटील, आदिसह कृषी उत्पन्न बाजार समितीचे विविध पदाधिकारी, संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## शिवरायांच्या पुतळ्याचे सुशोभिकरण करावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवरायांच्या पुतळा परिसराचे सुशोभिकरण करावे, अशी मागणी लातूर जिल्हा मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.



लातूर येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा परिसरास महापालिका प्रशासनाच्या अनास्थेमुळे अवकळा येत आहे. पुतळ्याभोवतीच्या संरक्षण कठड्याचे पाइप सतत तुटत असतात. कठल्याला दार नसल्याने रात्री-अपरात्री मोकाट प्राणी तिथे जात आहेत. विजेच्या वायर अनेक ठिकाणी उघड्या आहेत. शिडी नसल्याने महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करणे कसरतीचे झाले आहे.

शिवकाळास साजेल असे या पुतळ्याचे सुशोभिकरण करावे, अशी मागणी गेली चार वर्षांपासून लातूर जिल्हा मराठा क्रांती मोर्चा महापालिका आयुक्तांकडे करीत आहे. यासाठी त्यांनी आयुक्तांची वेळोवेळी भेट घेऊन निवेदने दिली. आयुक्तांना वस्तुस्थितीही दाखवली आहे. सुशोभिकरण आराखडाही दिला आहे. तरीही आजतागायत त्यावर महापालिका प्रशासनाने काहीच कार्यवाही केली नाही. तेथील ध्वजस्तंभही शिवप्रेमींनी स्वखर्चातून उभारला आहे. वेळ मारुन नेण्यापुरती चर्चा व थातूर मातूर दुरुस्ती करायची, अशी मानसिकता महापालिका आयुक्तांनी या कामांबाबत अवलंबली आहे. याकामी आपण लक्ष देवून संबंधित विभागास पुतळा सुशोभिकरण करण्यासाठी सूचना द्यावी, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी पालकमंत्र्यांनी शिष्टमंडळासमवेत आस्थेवाईकपणे व सकारात्मक चर्चा केली व हा प्रश्न मार्गी लावू, असे सांगितले.

## पूर्वपरीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** महाराष्ट्र नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ ही परीक्षा लातूर शहरातील २५ परीक्षा केंद्रांवर रविवार, २ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ते दुपारी १२ या कालावधीत होत आहे. त्याअनुषंगाने निश्चित करण्यात आलेल्या परीक्षा केंद्राच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

लातूर शहरात बार्शी रोड येथील दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स न्ड बीसीए, अंबोजोगाई रोडवरील कॉलेज ऑफ कम्प्युटर सायंस अँन्ड इन्फॉरमेशन टेक्नालॉजी (कॉक्सिट), बार्शी रोडवरील दयानंद सायन्स कॉलेज, नांदेड रोडवरील यशवंत विद्यालय, जिजामाता कन्या प्रशाला, नारायण नगर येथील परिमल माध्यमिक विद्यालय, खाडगाव रिंगरोड येथील श्रीश्री रवीशंकर विद्यामंदिर, खाडगाव रोड येथील सरस्वती विद्यालय, दयाराम रोड येथील श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालय, शाहू चौक येथील ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, खाडगाव रोड येथील श्रीमती सुशिलादेवी देशमुख महाविद्यालय, बसवेश्वर चौक येथील राजर्षी शाहू ज्युनियअर सायन्स कॉलेज, सरस्वती कॉलनी येथील श्री शिवाजी विद्यालयात ही परिक्षा होत आहे.

## श्री सिध्देश्वरांच्या आशीर्वादाने लातूरकरांच्या अपेक्षा पूर्ण करणार

### पालकमंत्री भोसले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** लातूरचे पालकमंत्री पद मला मिळाले. यानिमित्त ग्रामदैवत श्री सिध्देश्वरांचे दर्शन व आशीर्वाद घेतला. श्री सिध्देश्वरांच्या आशीर्वादाने लातूरकरांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी काम करू, अशी ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली.



लातूरच्या दौऱ्यावर आलेले पालकमंत्री भोसले यांनी ग्रामदैवत श्री सिध्देश्वरांचे दर्शन घेऊन महाआरती केली. यानंतर देवस्थानच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, श्री सिध्देश्वर देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर, तहसीलदार सौदागर तांदळे, ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांच्यासह विश्वस्तांची उपस्थिती होती.

यावेळी ज्येष्ठ विश्वस्त गोजमगुंडे यांनी सिध्देश्वर देवस्थानला चारशे वर्षांचा इतिहास असल्याचे सांगितले. आपण छत्रपती आहात. पहिल्यांदाच देवस्थानमध्ये आला आहात. त्यामुळे आम्ही आपल्याकडे काही मागितले नाही आणि मागणारही नाही. आपले प्रेम लातूर आणि देवस्थानवर राहावे, ही अपेक्षा आहे. यात्रा कालावधीत येऊन आपण दर्शन घ्यावे, अशी विनंती त्यांनी केली.

यावेळी पालकमंत्री म्हणाले, छत्रपती घराण्यावर राज्यातील जनतेचे प्रेम आहे. आमच्या घराण्याकडे छत्रपतींचा वारसा आहे. माझे वडील अभयसिंह राजे भोसले व स्व. विलासराव देशमुख यांची गाढ मैत्री होती. लातूरमध्ये काम करण्याची संधी मला मिळाली आहे. श्री सिध्देश्वरांचे दर्शन व आशीर्वाद घेऊन मी काम सुरू करत आहे. सामान्य जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणारे हे सरकार आहे. याच धोरणाने लातूरकरांसाठी मी कार्यरत राहीन. याच महिन्यात असणाऱ्या महाशिवरात्री यात्रेसाठीही मी येणार आहे.

पहिल्याच भेटीत काहीही मागणार नाही, असे आपण सांगितले असले तरी देवस्थानच्या विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करू, असे आश्वासन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले.

यावेळी माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, अशोक भोसले, नरेश पंड्या, बाबासाहेब कोरे, अप्पासाहेब घुगरे, विशाल झांबरे आदी उपस्थित होते.

## रमाई आवास योजना : समितीची ५ हजार ७०० घरकुलांना मंजुरी




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१ फेब्रुवारी -** जिल्ह्यात रमाई आवास योजना ग्रामीण अंतर्गत नवीन ५ हजार ७६२ घरकुलांना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मंजुरी दिली आहे. त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील कुटुंबातील व्यक्तींचे स्वतःच्या हक्काचे पक्के घर बांधण्याचे स्वप्न साकार होणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय रमाई आवास योजना समितीच्या बैठकीला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

रमाई आवास योजनेसह इतर आवास योजनांमधून जिल्ह्यात उभारण्यात येत असलेल्या घरकुलांच्या कामांना गती द्यावी. घरकुलांचे प्रस्ताव स्वीकारताना प्रत्येक गरजू आणि पात्र लाभार्थ्याला घरकुल मिळेल, याची दक्षता घ्यावी. गतवर्षी मंजूर करण्यात आलेल्या घरकुलाच्या कामांपैकी अंतिम टप्प्यातील कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करावा. गतवर्षीचे आणि यावर्षीचेही घरकुल बांधणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना पालकमंत्री ना. भोसले यांनी दिल्या.

लातूर
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सैनिकांच्या प्रती सर्वांनीच कृतज्ञता बाळगावी : डॉ. सूर्यवंशी

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१ फेब्रुवारी -**
सैनिक हे आपले सर्वस्व पणाला लावून देशसेवा करतात प्रसंगी आपल्या प्राणाची आहुती देतात. त्यांच्या त्याग, बलिदान आणि समर्पणामुळेच आपण मूक्त पणे स्वातंत्र्याची फळे चाखतो आहोत स्वातंत्र्य उपभोगत आहोत.म्हणून समाजातील सर्वच घटकांनी सैनिक त्यांचे कूटूंब त्यांच्या विधवा पत्नी यांच्या प्रती कायम कृतज्ञता बाळगावी असे प्रतिपादन युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले.

माजी सैनिकांचा स्नेह संम्मेलन कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.अध्यक्षस्थानी लेफ्टनंट कर्नल बी.आर. हरणे होते तर माजी जिल्हाध्यक्ष अँड. अमित रेड्डी, मेजर डॉ. मधुसूदन चेरेकर, संघटनेचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव नलवाड, कॅप्टन माधव शिरसाठ, कॅप्टन गणपत दोडे, मेजर भानुदास कराड, गणेश मिल्ट्री फाऊंडेशनचे अनिरुद्ध केंद्रे, ज्ञानदीपचे संचालक उध्दवराव ईप्पर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास मधुकर पलमटे, विठ्ठल शिंद, माधव शिरसाठ, दत्ता गायकवाड, नाईक ज्ञानोबा अरनूरे, शिवाजी ईप्पर, पंडित केंद्रे, गोविंद सोळंके आदि उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



### जिल्हा युवा पुरस्काराने अॅड. दीपाली औटे सन्मानीत

**उदगीर, दि.१ फेब्रुवारी -**
क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणेच्या वतीने जिल्हा क्रीडा अधिकारी लातूरच्या वतीने दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा जिल्हा युवा पुरस्काराने उदगीर येथील राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या लातूर जिल्हा कार्याध्यक्षा अॅड. दीपाली औटे यांना प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जिल्हा क्रीडा संकुल लातूर येथे लातूर जिल्हाचे पालक मंत्री ना. शिवेंद्रराजे भोसले व लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे व जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अॅड. औटे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री आ. संजय बनसोडे, शिक्षक आ. विक्रम काळे राकाँपाचे प्रदेश सरचिटणीस अॅड. व्यंकट बेद्रे यांनी अभिनंदन केले आहे. यावेळी राजकुमार चव्हाणा, राकॉपा अल्पसंख्यक विभगाचे जिल्हाध्यक्ष शफी हाशमी, राकॉपा सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप जोंधळे व राकाँपा सांस्कृतिक विभागाचे लातूर जिल्हाध्यक्ष अभिजीत औटे आदी उपस्थित होते.



### औसा शिक्षक पतसंस्थेतर्फे सेवानिवृत्त हेंगणे यांचा सत्कार

**औसा, दि.१ फेब्रुवारी -**
सेवानिवृत्तीनंतर शैक्षणिक बांधिलकी जपत सामाजिक कार्य करणारे सेवानिवृत्त शिक्षक सुनील शिवानंद हेंगणे यांचा औसा तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. अहमदपुर तालुक्यातील हडोळतील येथील रहिवाशी असलेले सुनील शिवानंद हेंगणे यांनी १४ डिसेंबर १९८५ रोजी रेणापुर तालुक्यातील फावडेवाडी येथील जि.प. प्राथमिक शाळेतून शैक्षणिक सेवेला सुरुवात केली. ३९ वर्षाच्या कार्यकाळात एक आदर्श शिक्षक, मुख्याध्यापक आणि केंद्रप्रमुख पदावर आपल्या कामाचा ठसा उमटवून केंद्रप्रमुख पदावरून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या उल्लेखनीय कार्यामुळे त्यांना तालुकास्तरीय आदर्श पुरस्कार, राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले पुरस्कार आदी पुरस्कार मिळाले आहेत. सेवानिवृत्त सुनील शिवानंद हेंगणे यांचा औसा शिक्षक पतसंस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे कर्मचारी मल्हारी कांबळे, शिरीष पवार, विनय आयतनबोने व सेवानिवृत्त शिक्षक बांधव उपस्थित होते.



### उदगीरच्या भाऊसाहेब सहकारी बँकेस ब्लू रिबन पुरस्कार प्रदान

**उदगीर, दि.१ फेब्रुवारी -**
सहकार व बँकींग क्षेत्रात उत्तम प्रकारे, दर्जेदार सेवा देणाऱ्या सहकारी बँकेस देण्यात येणारा बँको ब्लू रिबन पुरस्कार- २०२४ हा पुरस्कार भाऊसाहेब सहकारी बँक लिं, उदगीरला लोणावळा येथील आंबी व्हॅली सिटीत आयोजित सोहळ्यात रिजर्व्ह बँकेचे माजी सीजीएम भार्गे श्वर बॅनर्जी, अविनाश शिंत्रे, नाईक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या समारंभास भाऊसाहेब सहकारी बँकेचे चेअरमन भगवानराव रामचंद्रराव पाटील तळेगावकर व संचालक दिनेश पाटील यांनी उपस्थित राहून हा पुरस्कार स्विकारला. हा पुरस्कार या बँकेने सलग दुसऱ्यांदा प्राप्त केला आहे.

# बसवेश्वरांच्या विचारांचे प्रतिक आमदार पवार : बसवराज पाटील

### जीवनात प्रेरणा देणार सत्कार : आ. अभिमन्यू पवार



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१ फेब्रुवारी -**
कोणत्याही जाती धर्माचा भेदभाव न करता सर्वांना सोबत घेऊन सर्वधर्म समभाव अशी बसवेश्वरांची प्रेरणा घेऊन राज्यात नवा औसा पटर्न निर्माण केला असून महात्मा बसवेश्वरांच्या विचाराचे प्रतिक आ. अभिमन्यू पवार आहेत. असे मत माजीमंत्री बसवराज पाटील यांनी व्यक्त केले.

औसा येथील नंदी मठात वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने शुक्रवार दि.३१ जानेवारी रोजी रात्री ८.३० वा. आ. अभिमन्यू पवार यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यानंतर किणीथोट, खरोसा, तपसेचिंचोली, माळकोंडजी, लामजना येथील वीरशैव समाज, महात्मा बसवेश्वर वीरशैव मंडळ, मन्मथस्वामी महिला भजनी मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यावेळी माजीमंत्री बसवराज पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. डॉ. अर्चना पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

वीरशैव समाजाचे अध्यक्ष सुभाष मुक्ता, भाजपाचे जेष्ट नेते तथा मुक्तेश्वर मंडळाचे अॅड. मुक्तेश्वर वागदरे, माजी नगराध्यक्ष तथा भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष किरण उटगे, माजी नगराध्यक्ष संगमेश्वर ठेसे, माजी नगराध्यक्ष सुनील मिटकरी, शहराध्यक्ष सुनील उटगे, विश्वेश्वरय्या शिक्षण संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, सामाजिक कार्यकर्ते सदानंद शेटे, डॉ. उटगे उपस्थित होते. महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमा पुजनानंतर कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यानंतर अमर उपासे यांनी प्रास्ताविक केले. माजीमंत्री बसवराज पाटील म्हणाले, आज स्पर्धेचा काळ आहे.

अशा स्पर्धेत टिकण्यासाठी विकास महत्वाचा असून कामाची, विकासाची आणि लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी काम करणाऱ्या माणसाची गरज आहे. निधी आणून विकासकामे करुन लोकप्रतिनिधी कसा असावा. हे आ. पवारांनी दाखवून दिले आहे आणि आपण चांगल्या माणसाची निवड केली. अशी निवड आपल्यासारखे सुज्ञ माणसं करतात. हे सत्कारमुर्तीनी आपल्या विचारातून मांडले आहे. ते अतिशय महत्वाचे आहे. त्यांच्या कार्याला शोभेल अशा मताधिक्याने आपण निवडून दिले आहे.

यामुळे यापुढील काळात औशाला कोणतीही कमतरता राहणार नसून वीरशैव समाजाने आ. अभिमन्यू पवार यांच्या पाठीमागे खंबीरपणाने उभा राहवे असे आवाहन माजीमंत्री बसवराज पाटील यांनी केले.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले, लिंगायत समाजाकडून सत्कार होणारा मी लातूर जिल्ह्यातील पहिला माणूस आहे.

यासाठी मोठे भाग्य लाभते. आणि ते मला मिळाले आहे. म्हणुन मी भाग्यवान आहे. माझ्या जिवनात नवी प्रेरणा देणारा सत्कार असून वीरशैव समाजाच्या या सत्कारामुळे मला १२ हत्तीचे बळ मिळाले आहे, असे भरभरुन प्रेम वीरशैव समाजाने मला दिले आहे. हे आयुष्यभर विसरु शकणार नाही. आणि आभार व्यक्त करुन समाजाचे ऋण फेडू शकणार नाही.

कामाच्या रुपातून जेवढं देता येईल तेवढं देणार आहे. पाटील बंधू भगिणीच्या भाजपातील आगमनाने संपुर्ण महाराष्ट्रात याचा परिणाम झाला आहे. समाजाच्या माझ्याकडून ज्या अपेक्षा आहेत. त्या सर्व पुर्ण करणार असल्याचे आश्वासन आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी दिले.

प्रा. युवराज हालकुडे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. तर शिवरुद्र मुर्गे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### औशात महात्मा बसवेश्वरांचा पुतळा उभा करावा : डॉ. अर्चना पाटील

महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाचा लाभ समाजातील मागासवर्गीयांनाच मिळतो. यासाठी सरकारकडून ५० कोटी रुपयांचा निधी मिळतो. या महामंडळातून सर्व वीरशैव समाजाला इतर महामंडळाप्रमाणे सहकारी आणि राष्ट्रीय बँकांच्या माध्यमातून लाभ मिळावा. यासाठी १००० हजार कोटी रुपये उपलब्ध करुन द्यावेत. याच प्रमाणे इतर महामंडळाप्रमाणे १५ लाख रुपयांचे अर्थसाह्य प्रत्येक लाभार्थ्यांना मिळावे, अशी मागणी डॉ. अर्चना पाटील केली. महात्मा बसवेश्वरांचा पुतळा मोठा इतिहास घडवितो हे लातूरात दाखवून दिले आहे. असा इतिहास घडविण्यासाठी औसा शहरात महात्मा बसवेश्वरांचा पुतळा उभा करावा. अशी मागणी समाजबांधवाच्या वतीने डॉ. अर्चना पाटील यांनी यावेळी केली.

## समाधानी व आनंदी राहणे हाच सुखी जीवनाचा मंत्र : आ. संजय बनसोडे



लिंगायत समाज स्मशानभुमीच्या सुशोभिकरणासाठी १ कोटींचा निधी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१ फेब्रुवारी -**
सद्याच्या धावपळीच्या जीवनात मनुष्य हा उदास होत आहे. धाकधकीच्या जीवनामुळे माणसाच्या आयुष्यातून समाधान निघुन जात आहे. वाढत्या गरजा आणि अपेक्षाच्या ओझ्याखाली माणूस दिवसेंदिवस असमाधानी होत आहे मात्र आपल्याला जगायला काहीच लागत नाही. थोड्या फार गरजा पुर्ण झाल्या की आपले हे आयुष्य सुखी होते. याचाच विचार करुन माणुस समाधानी व आनंदी राहिला की तो सुखी होतो हाच सुखी जीवनाचा मंत्र असल्याचे मत माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर शहरातील लिंगायत समाज स्मशानभुमी येथील महाप्रवेशव्दार, महादेव मुर्ती व कैलास धाम मधील सुशोभिकरण व लोकार्पण सोहळ्यात बोलत होते.

यावेळी डॉ. शंभूलिंग शिवाचार्य महाराज, शंकरलिंग शिवाचार्य महाराज हानेगाव, सिध्दलिंग शिवाचार्य महाराज देवणी, माजी आ.गोविंद केंद्रे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे,माजी सभापती सिध्देश्वर पाटील, वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापूरे, बसवराज पाटील नागराळकर, बस्वराज बागबंदे, बसवराज पाटील कौळखेडकर, भरत चामले, मन्मथ किडे, विजयकुमार चवळे, विजयकुमार हुंडेकरी, उत्तरा कलबुर्गे, कांताबाई कलबुर्गे, चंद्रकला बिरादार, सरोजा वारकरे, शामला कारामुंगे आदी उपस्थित होते.

यावेळी लिंगायत समाजातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हा नियोजन समितीच्या बैठकी आ. पवारांचा पाठपुरावा...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१ फेब्रुवारी -**
१७ विद्युत उपकेंद्रांसाठी प्रत्येकी २ पॉवर ऑन व्हील (फिरते डीपी) उपलब्ध करून देण्यात यावेत. वॉरंटी पिरेडमधील रोहित्र तातडीने दुरुस्त करुन देण्याची व्यवस्था उभारण्यात यावी. ६३ च्या डीपीचे १०० केव्हीचे करण्यात यावेत तसेच नवीन डीपी प्राधान्याने मंजूर करण्यात यावेत. गाव तिथे स्मशानभूमीसाठी प्रस्तावित स्मशानभूमींना मंजुरी देण्यात यावी, जागा उपलब्ध नसलेल्या ठिकाणी शासकीय जागा किंवा खासगी जागा संपादित करुन उपलब्ध करून देण्यात यावी. या प्रमुख मागण्यासह अनेक मागण्या आ. अभिमन्यू पवार यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे केल्या आहेत.

पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले महाराज यांच्या अध्यक्षतेखाली लातूर जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत आ. पवार यांनी लातूर जिल्ह्यासह मतदारसंघातील विकासाच्या दृष्टीने अनेक महत्वपर्ण विषयाचा पाठपुरावा केला. महाराष्ट्राचे शैक्षणिक हब लातूर असून क्लासेसच्या भागात अनेक चूकीच्या घटना घडत असून शिकणारी विद्यार्थी आहारी जाणार नाहीत. यासाठी संपुर्ण परिसर सीसीटीव्हीत नजरकैद करावा. तसेच पथकांची नेमणुक करुन शहरातील कफेची नियमितपणे तपासणी करावी. ३ कोटी रुपयांचा भरणा करुन लातूर जिल्हा रुग्णालयासाठी जागा हस्तांतरित करण्यात यावी. लातूर येथे सोयाबीन संशोधन केंद्र व देवणी गायींचे केंद्र उभारावे. जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये मुला, मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधून देण्यात यावेत. व सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आणाव्यात. कासार सिरसी ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यात यावे. औसा शहरातील बचत भवनची इमारत वापराविना पडून असून याची आवश्यक दुरुस्ती करुन इमारत महिला फार्मर प्रोड्युसर कंपन्यांना व महिला शेतकरी गटांना उपलब्ध करून देण्यात यावी. जलजीवन मिशन अंतर्गतची रखडलेली कामे तातडीने सुरू करण्यात यावीत. पाणीपुरवठा योजनांसाठी स्वतंत्र डीपी उपलब्ध करून टप्याटप्याने सर्व पाणीपुरवठा योजना सोलार सिस्टीमशी जोडण्यात याव्यात. खुल्या शासकीय जमिनींवर होणार्या अतिक्रमणाला आळा घालण्यासाठी कंपाऊंड वॉल बांधकाम करण्यात यावे. राज्य रोहयो योजनेतून जुन्या सिंचन विहीरींची पुनर्बांधणी करता येईल यासाठी योजना आणण्यात यावी. जिल्हा वार्षिक योजना निधीतून समाज मंदिर बांधकामासाठी ७ लक्ष रुपयांची मर्यादा वाढवून १५ लक्ष रु. करण्यात यावी. अशा मागण्या आ. पवार यांनी याबैठकीदरम्यान करण्यात आल्या.

दयानंद कॉलेजसमोरील रस्ता पूर्णपणे अतिक्रमण ग्रस्त झाला असून तो रस्ताही मोकळा करण्यात यावा, आदी विषयांसंदर्भात मागणी आ. पवारांनी या बैठकीत केली आहे.

## मतदारसंघाच्या विकासासाठी आमदारांचे पालकमंत्र्यांना साकडे



## महाराष्ट्र महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२ फेब्रुवारी -**
महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा येथे राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग तसेच तहसील कार्यालय निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात निबंध, वक्तृत्व, घोषवाक्य रांगोळी, भित्तिपत्रक या स्पर्धांचा समावेश होता. यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला यशस्वी विद्यार्थ्यांना नायब तहसीलदार विनोद करमानकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपुके यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ प्रदान करून गौरविण्यात आले. सक्षम लोकशाहीसाठी निवडणूक साक्षरता, मताधिकाराची सक्ती करावी का?, एका बोटावरच्या शाईची किंमत अशा विविध विषयावर आधारित या स्पर्धा घेण्यात आल्या.



भितीपत्रक स्पर्धेत पवार पद्माकर, घोसाळे अक्षय, सोमवंशी मोनिका. घोषवाक्य स्पर्धेत सय्यद सानिया, लंगोटे सरस्वती, काळे नंदिनी. निबंध स्पर्धेत कुलकर्णी गौरी, धुमाळ पूजा, सुरवसे शिवदीक्षा. रांगोळी स्पर्धेत पवार पद्माकर, साळुंखे भूमिका, घोसाळे अक्षय. वकृत्व स्पर्धेत हवा प्रगती, सोमवंशी मोनिका, वाडकर गीता या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपुके हे होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदानाचे महत्त्व काय आहे याची जाणीव त्यांनी करून दिली. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त घेण्यात आलेल्या या विविध स्पर्धांचे परीक्षण डॉ. भास्कर गायकवाड, डॉ. अजित मुळजकर, डॉ. मीनाक्षी बोंडगे, प्रा. पूनम सातपुते, प्रा. पृथ्वी फावडे यांनी केले. विचार मंचावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. शिवरुद्र बदनाळे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. पूनम सातपुते, प्रा. दत्ता पवार, प्रा. पृथ्वी फावडे, सुनील वाकळे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मतदान शपथ प्रा. शिवरुद्र बदनाळे यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कमल गोमसाळे, मोनिका सोमवंशी यांनी केले तर आभार प्रा. पौर्णिमा माने यांनी मानले.

## सामाजिक विषमता मातीत गाढायचे काम वारकरी संप्रदायाने केले : हभप. मधुकर महाराज बारूळकर

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२ फेब्रुवारी -**
रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज कीर्तन ऐकत होते असे इतिहासात अनेक दाखले आहेत. कीर्तनकार परिवर्तनवादी असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखा प्रजाहितदक्ष पराक्रमी राजा तयार होऊ शकतो एवढी ताकत कीर्तनात असून सामाजिक विषमता मातीत गाढायचे काम सुद्धा वारकरी संप्रदायाने केले आहे, असे प्रतिपादन मधुकर महाराज बारूळकर यांनी केले.



निलंगा येथील जिजाऊ सृष्टीत मराठा सेवा संघ प्रणित जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेच्या कीर्तन महोत्सवातील दुसऱ्या दिवशी ते बोलत होते.अध्यक्षस्थानी माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर होते. यावेळी उद्घाटक म्हणून जिल्हा परिषदेचे माजी सदस्य भरत गोरे, अनंतराव गायकवाड, विशेष सत्कारमूर्ती उद्योजक उदय पाटील, सतिष हानेगावे उपस्थित होते.

मधुकर बारूळकर महाराज म्हणाले वारकऱ्यांच्या झेंड्याखाली अठरा पगड जातींना एकत्र करून समाज प्रबोधन करण्याचे काम संतांनी केले आहे त्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचं आहे.वारकऱ्यांनी महिलांना प्रोत्साहन दिले म्हणून महिलांनी सामाजिक क्रांती केली. महिलांना कमी लेखण्याची चूक कोणीही करू नये महिला सक्षम झाल्या तरच राष्ट्राची प्रगती होऊ शकते असे ते म्हणाले. प्रास्ताविक सतिष हानेगावे यांनी केले. सूत्रसंचालन एम.एम. जाधव तर आभार विनोद सोनवणे यांनी मानले.

यावेळी बाळासाहेब शिंगाडे, डी.बी. बरमदे, दगडू सोळुंके, डॉ. अरविंद भातांब्रे, चक्रधर शेळके, ईश्वर पाटील, प्राचार्य रमेश मदरसे, चंद्रकांत पाचंगे, रोहित बनसोडे, रजनीकांत कांबळे, दत्ता शाहीर, अंकुश ढेरे, सदाशिव लोभे, बरमदे, नेलवाडे, दत्तात्रय बाबळसुरे, किरण धुमाळ, बालाजी जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

### माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांची उपस्थिती...

गेली सतरा वर्षांपासून मराठा सेवा संघाने अविरतपणे सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम सुरू ठेवल्याबद्दल माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी आयोजकांचे कौतुक केले व ही प्रबोधनाची परंपरा कायम ठेवावी अशी इच्छा व्यक्त केली. तुकोबारायांची भक्ती अन शिवरायांची शक्ती हा भक्ती-शक्तीचा संगम आहे असे ते म्हणाले. तसेच जिजाऊसृष्टीच्या संरक्षण व विकासासाठी अडचण येणार नाही असे ते म्हणाले.

## श्री प्रेमनाथ विद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१ फेब्रुवारी -**
शिरूर अनंतपाळ तालुक्यातील थेरगाव येथील श्री प्रेमनाथ विद्यालयात शुक्रवार दि.३१ जानेवारी या दिवशी दहावी वर्गाचा स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला. एक दिवस संपूर्ण शाळा चालवण्याची जबाबदारी इयत्ता दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना सोपवण्यात आली.

या मागचा हेतू असा होता की, विद्यार्थ्यांना अध्यापन करीत असताना शिक्षका विषयीची खूप आकर्षण असते व आदर असतो आपण ही एक दिवस शिक्षक व्हावे अशी विद्यार्थ्यांची इच्छा असते पण भविष्यामध्ये ही संधी प्रत्येक विद्यार्थ्याला मिळेलच असे नाही याची जाणीव ठेवून श्री प्रेमनाथ विद्यालय थेरगाव या विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने आज स्वयंशासन दिन साजरा केला. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रथमच शिक्षक म्हणून भूमिका पार पाडताना जबाबदारीने संपूर्ण दिवस शाळा साभांळली. मुख्याध्यापक प्रेम वाघमारे



शिक्षक म्हणून सृष्टी बंडगर, सृष्टी सोनवणे, नंदिनी विठुबोने, श्रुती पेठे, प्रगती सूर्यवंशी, प्रतीक सोनवणे, प्रेमसागर सोनवणे, सुमित भांगे, जान्हवी शिंदे, साक्षी सोनवणे, स्नेहा सोनवणे, आदेश सोनवणे, तन्मय सोनवणे, वैष्णवी, आदी मुलांनी दिवसभर अध्यापक ते शालेय कामकाजाची पाहणी केली. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपले अनुभव निरोपाच्या वेळी कथन केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक शंकर पाटील, मुख्याध्यापक तांदळे, सहशिक्षक पवार, कस्पटे, चिमणशेटे, बेल्लेवाड यांनी मार्गदर्शन केले. सुत्रसंचलन पांचाळ समर्थ यांनी केले तर आभार कार्तीक सोनवणे यांनी मानले

यावेळी संस्थेचे संचालक शंकर पाटील, तांदळे, पवार, कस्पटे, बेल्लेवाड, चिमणशेटे, सगर, नाबदे सचिन, माडे लिंबराज तसेच पालक उपस्थित होते.